कॉस्मिक हॉरर कथासंग्रह



मुंग्यांचा देव

सत्यजित शंकरराव पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

मुंग्यांचा देव

कॉस्मिक हॉरर कथासंग्रह

सत्यजित शंकरराव पाटील

मुंग्यांचा देव (कथासंग्रह)

लेखक : सत्यजित शंकरराव पाटील

पत्ता : २५अ, प्रभू कॉलोनी, अमरावती.

फोन : ७५८८८९१९९९

ईमेल : satyajeetwrite@gmail.com

मुखपृष्ठ : सत्यजित शंकरराव पाटील (AI Assisted)

ISBN No. - 978-93-345-8415-8

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : - ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : १ नोव्हेंबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. ४००/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- सत्यजित पाटील - ७५८८८९१९९९)

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अस्वीकरण

या संग्रहातील सर्व कथा संपूर्णतः काल्पनिक आहेत. यांतील पात्रे, स्थळे, गावे, संस्था, वैज्ञानिक प्रयोग, परग्रही जीव आणि घटना लेखकाच्या कल्पनेतून साकारलेल्या आहेत. त्यांचे प्रत्यक्ष जीवनातील कोणत्याही वास्तविक व्यक्तीशी (जिवंत वा मृत), स्थळ, संस्था अथवा घटनेशी काहीही संबंध नाही. कुठे तसा भास झाल्यास वा साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. हा एक विज्ञान व वैश्विक भय (कॉस्मिक हॉरर) कथासंग्रह असून तिचा उद्देश निखळ साहित्यिक कल्पनाविष्कार एवढाच आहे.

'शून्य' या कथेत उद्धृत केलेल्या उर्दू शेरांचे श्रेय त्यांच्या मूळ शायरांचे.

लेखक परिचय

सत्यजित शंकरराव पाटील हे मूळचे अमरावतीचे. वाणिज्य (बी.कॉम.) आणि औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) असं त्यांचं शिक्षण... आकडे आणि रसायनं यांच्यामधून वाट काढत आलेली नजर.

लहानपणापासूनच वाचनाचं आणि सिनेमाचं वेड. आणि वाचता वाचता कधीतरी मनात ऊर्मी दाटून यायची, आपणही असं काहीतरी लिहावं. याच ऊर्मीतून त्यांच्या लेखनाचा प्रवास सुरू झाला. विज्ञानकथा, भयकथा, रहस्यकथा आणि विशेषतः वैश्विक भय (कॉस्मिक हॉरर) व गूढकथा या प्रकारांत ते रमतात. जिथं तर्क संपतो आणि अंधार सुरू होतो, नेमकी तीच सीमारेषा त्यांना खुणावते. माणसाच्या समजेपलीकडच्या, प्रचंड आणि उदासीन शक्तींसमोर माणूस किती लहान आहे, ही आदिम भीती त्यांच्या कथांच्या केंद्रस्थानी असते.

ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली 'अतळ' ही कॉस्मिक हॉरर कादंबरी हे त्यांचं पहिलं पुस्तक. आणि आता वाचकांच्या भेटीला येत आहे **'मुंग्यांचा देव'** हा त्यांचा कॉस्मिक हॉरर कथासंग्रह.

- ७५८८८९१९९९
- satyajeetwrite@gmail.com

अर्पणपत्रिका

“हे पुस्तक ज्या प्रत्येक लेखकाच्या शब्दांनी माझ्यातला लेखक घडवला,

आणि ज्या आई-बाबांनी अंधारातही माझ्या स्वप्नांवर विश्वास ठेवला...

त्यांना. सप्रेम समर्पित.”

मनोगत

माणूस स्वतःला या विश्वाचा केंद्रबिंदू समजतो. आपलं विज्ञान, आपली प्रगती, आपले सुख-दुःखाचे हिशोब... आपल्याला वाटतं हे सगळं खूप मोठं आणि शाश्वत आहे. पण या अनंत, अथांग विश्वाच्या पसाऱ्यात आपलं नेमकं स्थान काय? काचेच्या पेटीत पाळलेल्या मुंग्यांसारखं तर नाही ना?

याच अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नातून आणि आपल्या कल्पनेपलीकडच्या अनामिक भीतीतून **'मुंग्यांचा देव'** या कथासंग्रहातील पाचही कथांचा जन्म झाला आहे. 'मुंग्यांचा देव'मधील समांतर विश्व आणि मानवी अस्तित्वाचा रिॲलिटी शो मांडणारी पंचमितीय शक्ती असो, 'शून्य'मधील अंतराळाच्या निर्वात पोकळीत स्वतःची ओळख पुसली जाताना अनुभवणारा आर्य असो, 'उरलेला'मधील भीती किंवा 'चक्रव्यूहातील चक्रव्यूह'मधील वास्तवाच्या आणि लेखनाच्या सीमारेषा पुसून टाकणारा लूप असो... या प्रत्येक कथेत मानवी आकलनापलीकडच्या 'कॉस्मिक हॉरर'चा वेध घेण्याचा प्रयत्न मी केला आहे.

हे लेखन तुमच्यापर्यंत विनामूल्य पोहोचवण्यासाठी व्यासपीठ दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठानचा मी मनापासून आभारी आहे.

सोबतच माझ्या घरच्यांचे, ज्यांनी मला सतत प्रोत्साहन दिलं, आणि माझ्या प्रत्येक वाचकाचे... ज्यांच्यासाठी हा सगळा खटाटोप आहे.

हा कथासंग्रह वाचून तुम्हाला काय वाटलं, ते जरूर कळवा. तुमची प्रतिक्रिया, मग ती कौतुकाची असो वा टीकेची, हीच माझ्या पुढच्या लेखनाची खरी ऊर्जा आहे.

- सत्यजित शंकरराव पाटील

अनुक्रमणिका

१. मुंग्यांचा देव - ११

२. शून्य - ६०

३. उरलेला - ८५

४. चक्रव्यूहातील चक्रव्यूह - १२५

मुंग्यांचा देव

दिवस तसा बोरिंग होता.

घरी बसून बसून बुड सुजून गेले होते. पण पर्याय नव्हता. म्हणून मग टीव्ही सोडून वर्तमानपत्र हातात घेतलं आणि चाळू लागलो, तर आतमधल्या पानावर परत एक हायकर बैकुंदूच्या जंगलात नाहीसा झाला, अशी बातमी होती. ही असल्या प्रकारची ८-९ वी घटना असावी, असं डोक्यात आलं.

बातमी वाचली तेव्हा कळलं की ही असल्या प्रकारची जवळपास ४२ वी घटना आहे. आणि आता राज्य सरकार ते अभयारण्य पर्यटकांसाठी बंद करावं, असा निर्णय घेण्याच्या मार्गावर आहे.

आधीच बरीच बदनामी झाल्यामुळे तसेही पर्यटक दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत. आणि जे येतात, ते फक्त या घटनांच्या मागे काय दडलंय याचा शोध घेण्यासाठी उत्सुक असलेले वेडे पर्यटकच असतात.

'त्यांना काय वाटतं, सरकारी तपास यंत्रणा फालतू आहे की काय?'

असो, आज आपल्याला कामापासून फुरसत मिळाली होती, पण मन लागत नव्हतं. मग काय, सोफ्यावरून खसकन उठून मी उभा झालो आणि ऑफिसमध्ये जायचा विचार पक्का करून तयारीला लागलो. डॉ. ग्रे कदाचित ऑफिसमध्ये नसतील, पण त्यांनी माझ्यावर सोपवलेलं काम आजच पूर्ण करून ठेवतो, म्हणजे उद्याची धावपळ जरा कमी होईल.

पण हे काय? ऑफिसचे दरवाजे उघडेच होते.

मी लगबगीने आत गेलो, तर डॉ. ग्रे त्यांच्या ऑफिसमध्ये अस्वस्थपणे काहीतरी पुटपुटत येरझाऱ्या मारत होते. मला बघताच ते माझ्याजवळ आले आणि म्हणाले,

"बरं झालं तू आलास, आत्ता तुलाच फोन करणार होतो."

"पण झालं तरी काय डॉक? इतके अस्वस्थ तर तुम्ही पहिल्यांदाच दिसताय. सगळं ठीक आहे ना?"

"बैकुंदू अभयारण्याबद्दल ऐकलंच असशील."

"हो, आजच बातमी वाचली की आणखी एक पर्यटक तिथे नाहीसा झाला म्हणून."

"हो हो तेच तेच. आपल्या राज्य सरकारने तिथे काय होत आहे याची 'वैज्ञानिक कारणमीमांसा' करायचं ठरवलं होतं."

"वैज्ञानिक कारणमीमांसा? ती कशासाठी? पर्यटक गायब होत आहेत, त्यासाठी जंगलाची कसून झडती घ्यायला हवी ना?"

"तुला काय वाटतं, तपास यंत्रणा दूधखुळी आहे का? ते त्यांनी बऱ्याचदा केलंय पण उपयोग काहीच झालेला नाही. उलट ते करत असताना त्यांचेच दोन ऑफिसर बेपत्ता झालेत. तेव्हा सरकारने यात आणखी खोलात जाऊन सर्व बाजूने तपास करायचं ठरवलं आणि त्या संदर्भात मला संपर्क केला होता."

"तुम्हाला? का? तुमचं आणि सरकारचं तर मुळीच पटत नाही, असं मला वाटत होतं."

"ते अगदी योग्य वाटत होतं. पण इथे प्रश्न लोकांच्या आयुष्याचा होता, आणि काही प्रश्नांसमोर आपले वैयक्तिक विचारभेद बाजूला ठेवून काम करावंच लागतं, हे मी तुला शिकवलंच असेल असं मला वाटतं."

"हो नक्कीच डॉक."

"तर मग त्यांनी मला जंगलातील गुरुत्वाकर्षण, भूगर्भ आणि तत्सम गोष्टींकडे लक्ष देण्याचं काम सोपवलं होतं. मीही ते काम स्वीकारलं, कारण मला त्यात रस यायला लागला होता. असो, मागील काही आठवड्यांपासून मी या गोष्टीवर काम करत होतो."

"आणि मला हे सगळं का माहीत नाही?"

"कारण सरकार या गुप्ततेविषयी खूप सिरिअस होतं, म्हणून मी तुला यात सामील नाही केलं. असो, ते महत्त्वाचं नाहीये. महत्त्वाचं हे आहे की मला तिथे काय सापडलं."

आणि हे बोलत असताना डॉकच्या चेहऱ्यावर जो अस्वस्थपणा वाढला होता, तो अभूतपूर्व होता.

"काय सापडलं डॉक? काय एलियन-बिलियन दिसले की काय?" मी हसत विचारलं.

"एलियन? छोटी गोष्ट नको करूस. मोठा विचार कर."

"हाऊ अबाऊट अ टनेल?"

"टनेल, त्यात काय विशेष?"

"देन, हाऊ अबाऊट अ टनेल व्हिच अटॅचेस मल्टिव्हर्स टू ईच अदर?"

"ओह्ह, कम ऑन डॉक! नॉट दॅट अगेन!"

"अरे, तुझी थेसिस होती ना मल्टिव्हर्सविषयी?"

"हो होती, आणि ती वाचल्यावर किती लोकांनी माझी टर उडवली होती ते पण मला माहिती आहे."

"पण तू तर त्या थेअरीविषयी फार सिरिअस होतास. आता काय झालं?"

"सिरिअस मी आताही आहे, पण मल्टिव्हर्सला जॉईन करू शकेल असा वर्महोल आणि तेही पृथ्वीवर... हे अशक्य आहे डॉक."

"दीप... दीप, अरे विचार कर, हे विश्वच अशक्य गोष्टींनी भरलेलं आहे. आणि चल, मी जे काही सांगतोय ती माझी कोरी कल्पना आहे असं मी मान्यही केलं, पण मग ते सर्व पर्यटक गेलेत कुठे?"

"ते मला ठाऊक नाही डॉक, पण नक्कीच त्यामागे काहीतरी दुसरं कारण असेल."

मी असं बोलताच डॉक घाईघाईने स्विचबोर्डजवळ गेले आणि म्हणाले,

"मग मला हे एक्सप्लेन कर."

असं म्हणून त्यांनी सगळे दिवे मालवले आणि प्रोजेक्टर चालू केला.

* * *

स्क्रीनवर प्रथम डॉक स्वतः जंगलात एका बोगद्यासारख्या खड्ड्याजवळ उभे होते. आणि त्यानंतर ते बोलू लागले,

"तर मित्रहो, तुम्ही ऐकू शकणार नाही पण मी ऐकू शकतोय. हा बोगदा असं कसं करतोय ठाऊक नाही, पण या बोगद्यातून आवाज येतोय. अगदी स्पष्ट असा 'ह्म्मम्म्म' असा हमिंगसारखा आवाज येतोय. आणि मी स्वतः यात जाऊन बघण्यापेक्षा पहिल्यांदा कॅमेरा आत पाठवावा असं मला वाटतं. तेव्हा लेट्स गेट स्टार्टेड..."

असं बोलून डॉक कॅमेराजवळ आले आणि बहुतेक त्यांनी कॅमेरा ट्रायपॉडवरून अनमाऊंट केला असावा. मी हळूच डॉककडे बघितलं, ते माझ्याकडेच बघत होते. मानेनेच त्यांनी 'समोर बघ' असा इशारा केला.

मी परत बघू लागलो.

कॅमेरा बोगद्याजवळ होता. मग डॉकने कॅमेरा एका दोरीला बांधला व हळूहळू आतमध्ये सोडला. सुरुवातीला काळाकुट्ट अंधार, पण नंतर डोळे दिपवणारा उजेड आणि नंतर जे काही स्क्रीनवर आलं ते पाहून माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता.

स्क्रीनवर आता दूरवर मुलं खेळताना दिसत होती. पण हे काय? त्यातील एक मुलगा थोडा जवळ आला तेव्हा लक्षात आलं, तो मुलगा नव्हताच. तो माणसासारखे कपडे घातलेला बोनोबो माकड होता. ही काय भानगड आहे? पण नंतर जे झालं ते पाहून तर आणखीनच वेड लागायची पाळी आली. तो चक्क बोलत होता आणि तेही इंग्लिशमध्ये!

पण तेवढ्यातच कॅमेरावर पुन्हा काळोख आणि डोळे दिपवणारा उजेड झाला व स्क्रीनवर डॉकचा चेहरा आला. आणि रेकॉर्डिंग थांबलं. रूममध्ये पुन्हा उजेड झाला. डॉक माझ्याजवळ आले आणि माझ्याकडे टक लावून पाहत म्हणाले,

"इलॅबोरेट धिस."

"व्हॉट वॉज दॅट?"

"आय ॲम आस्किंग यू! डोन्ट क्वेश्चन बॅक फॉर अ क्वेश्चन."

"वॉज दॅट अनदर अर्थ?"

"तू सांगतोय की विचारतोय?"

"अर्थात विचारतोय."

"मग मी परत तेच म्हणेन की प्रश्नाच्या उत्तरात..."

"परत प्रश्न नको विचारूस, असंच ना? पण हे बघितल्यावर दुसरं काय करू शकतो मी?"

"अरे डोकं विकून-बिकून आलास की काय? मी तुला विचारतोय," डॉक चिडून बोलले.

"ती दुसरी एखादी पृथ्वी होती की काय?" "किंवा एखादा दुसरा ग्रह?"

"ग्रह? मला नाही वाटत."

"का? का नसू शकतो?"

"कारण परग्रहवासी इंग्लिशमध्येच बोलतील हे जवळजवळ अशक्यच आहे."

"म्हणजे ती पृथ्वीच होती तर?"

"नक्कीच! त्यात मला शंका नाही."

"आणि ती माणसे वजा माकडे, त्यांचं काय एक्सप्लेनेशन देशील?"

"इव्होल्युशन मस्ट हॅव टेकन अनदर टर्न इन दॅट युनिव्हर्स."

"आता तू बरोबर ट्रॅक पकडलाय. इव्होल्युशन हॅज गॉन रॉंग देअर."

"आय डोन्ट थिंक सो डॉक."

"व्हाय?" डॉकच्या चेहऱ्यावर मोठं प्रश्नचिन्ह होतं.

मी म्हणालो, "प्रत्येक युनिव्हर्समध्ये पृथ्वीवर माणूसच वास्तव्य करेल याची शाश्वती कुणीच देऊ शकत नाही. आता या पृथ्वीवर माकडे डॉमिनंट प्रजाती म्हणून वर आलीयत. पण दुसऱ्या एखाद्या पृथ्वीवर अजूनही डायनासोर धावत असतील, दुसऱ्या एखाद्या पृथ्वीवर अजूनही जीवन उत्पन्न व्हायचं असेल, किंवा तिसऱ्या पृथ्वीवर कीटकांचा संचार असेल. जितके युनिव्हर्स, तितके ते वेगवेगळे असण्याचे चान्सेस."

"हम्म्म! आता महत्त्वाचा मुद्दा असा की ती पृथ्वी आणि आपलीच पृथ्वी का जोडली गेली?"

"महत्त्वाची गोष्ट ती नाही डॉक, महत्त्वाचा मुद्दा हा आहे की हे वर्महोल आले तरी कुठून? आणि इतका वेळ टिकून कसे आहेत? कारण ॲज पर माय नॉलेज, वर्महोल तयार करण्यासाठी खूप जास्त ऊर्जा आणि अत्युच्च तंत्रज्ञानाची आवश्यकता असते. आणि आपल्या पृथ्वीवर ना एवढी ऊर्जा निर्माण करण्याची कुवत आहे आणि ना एवढी अत्युच्च टेक्नॉलॉजी अस्तित्वात आहे."

"मग हे आले तरी कुठून? असं नसू शकतं का की ही वर्महोल्स अगोदरपासूनच पृथ्वीवर अस्तित्वात असतील, पण आपण त्यांची दखल घेतली नसावी."

"शक्यता आहे. पण मग असली वर्महोल्स आणखी असायला हवीत, भरपूर किंवा थोडकी आणि प्रत्येकात असंख्य फाटे. कारण विश्व असंख्य आहेत."

"अशीही शक्यता असू शकते की ज्या पृथ्वीवर बुद्धिमान जीवन निर्माण झालं असेल, तेवढीच विश्वं एकमेकांना जोडली गेलीत."

"हे बघा डॉक, आपण इथे बसून या गोष्टीवर आयुष्यभर चर्चा करू शकतो, आणि बिलीव्ह मी, आपल्याला शक्यतांची कमी पडणार नाही. सो, आता तूर्तास शक्यतांचा विचार थांबवून कृती काय करायची याचा विचार करूयात. काय म्हणता?"

"हो बरोबर बोललास. मी तर विसरूनच गेलेलो की सरकारी आदेशाचं पण पालन करायचं आहे. तर आता काय करायचं आपण?"

"मला वाटतं की आपण तिथे परत एकदा व्हिजिट करूयात आणि तोवर काही सुचतंय का ते बघू. म्हणजे वेळ पण वाचेल आणि तिथे जाऊन आणखी काही शक्यता दिसते का ते पण बघता येईल."

"ओके, मी पण तोच विचार करत होतो. चला निघूया."

"बॉन व्हॉयेज टू अस!" मी मिश्कीलपणे हसत म्हटलं.

* * *

प्रवास तसा दूरचा, पण विचारांच्या कल्लोळात किती वेळ निघून गेला ते लक्षातच आलं नव्हतं. डॉक पण विचारांत गढून गेले होते आणि मी पण शक्यतांची डोक्यातल्या डोक्यात फालतू पडताळणी करत होतो.

एवढ्यात डॉक माझ्याकडे बघायला लागले. मी त्यांच्याकडे बघून विचारलं,

"काय झालं डॉक?"

"एक विचार चमकला. असं नसू शकतं का की पृथ्वीवर किंवा या विश्वात असले वर्महोल्स कुणीतरी मुद्दामहून बनवून ठेवले असतील तर?"

"कोण? का? आणि कसे?"

"एखाद्या अतिप्रगत जीवसृष्टीने, त्यांच्या इंटरगॅलॅक्टिक प्रवासाला सोईस्कर बनवण्यासाठी."

"आणि अशा प्रवासाचं कारण?"

"काहीही असू शकतं. अगदी एन्शियंट एलियनपासून तर देवापर्यंत अनेक शक्यता आहेत."

"म्हणजे तुम्हाला असं सुचवायचं आहे का, देव जो की एक एलियन आहे, त्याने त्याच्या सोयीसाठी असले वर्महोल्स जागोजागी बनवून ठेवले असतील?"

"बहुतेक तसलंच काहीतरी."

तेवढ्यात गाडी जंगलाच्या रेस्ट हाऊसवर पोहोचली. आम्ही उतरून आत गेलो व रजिस्टरवर नाव नोंदवून आमचं साहित्य काढून रूमच्या आतमध्ये नेऊन ठेवलं. तोपर्यंत रेस्ट हाऊसच्या कर्मचाऱ्याने गरमागरम पोहे आणून दिले.

पोहे गिळून (हो, गिळूनच, कारण उत्सुकता खूप जास्त होती) मी पटकन डॉकला म्हटलं,

"चला निघूयात."

माझी उत्सुकता बघून त्यांनी लगेच रूममधून काढता पाय घेतला.

जंगलाच्या जीपमध्ये बसून आम्ही त्या ठिकाणाकडे रवाना झालो. अगदी घनदाट जंगलातून अगदीच कच्च्या रस्त्यावरून गाडी हळुवार चाललेली होती. बैकुंदूच्या जंगलात येण्याची माझी ही पहिलीच वेळ होती. एवढं घनदाट अरण्य मी प्रथमच अनुभवत होतो. उंच-उंच झाडांमुळे सूर्यप्रकाशसुद्धा जमिनीला स्पर्श करू शकत नव्हता. वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी उडत होते. प्राण्यांचा आवाज येत होता. वेगवेगळ्या प्रकारची झुडपे आणि त्यावरील कीटकसाम्राज्य हे बघून तर आणखीनच नवल वाटलं.

मी जंगलात रममाण झालेलो असतानाच अचानक ब्रेक लागले. मी चमकून डॉककडे बघितलं, त्यांनी डोळ्यांनी समोर इशारा केला. समोर बघताच माझे डोळे जणू पांढरे होण्याचीच वेळ आली होती. मी बोलण्याचा प्रयत्न केला, परंतु तोंडातून शब्दही बाहेर पडेनात.

समोर चक्क एक कपडे घातलेला बोनोबो उभा होता. त्याच्या हातामध्ये त्याने काहीतरी धरलेलं होतं आणि तो आम्हाला जीपमधून उतरण्यासाठी इशारा करत होता.

मी तर भीतीमिश्रित कुतूहलापोटी हलूही शकत नव्हतो. पण तेवढ्यात डॉक जीपमधून खाली उतरले आणि मला पण इशारा केला. मी दबकत ... भीतीने पण सावकाश उतरलो व डॉकजवळ जाऊन जीपसमोर उभा राहिलो. माझी तर जणू दातखिळीच बसली होती.

तेवढ्यात एक जाडा आवाज आला.

"हॅन्ड्स अप!"

* * *

मी तर जागीच उडालो, कारण तो आवाज आमच्या मागून आलेला होता. आम्ही मागे बघितलं तर मागे पण एक धिप्पाड बोनोबो उभा होता. त्याच्या हातातसुद्धा समोरच्या बोनोबोसारखीच वस्तू होती. बहुधा ती बंदुकीसारखं एखादं हत्यार असावं.

"वी नो दॅट यू नो अबाऊट आवर लिटल सिक्रेट."

तो बोनोबो अस्खलित इंग्लिशमध्ये बोलत होता.

(पुढील सर्व बोलणं जरी इंग्लिशमध्ये झालेलं असलं, तरी वाचकांच्या सोयीकरिता मराठीमध्ये सांगत आहे.)

"हात वर करा आणि गुपचूप आमच्यासोबत चला."

"मी विचारू शकतो का, कुठे?" डॉक म्हणाले.

"नाही!" जाड्याने दरडावून म्हटलं.

"चला, जास्त वेळ वाया घालवू नका. आपल्याला निघायचं आहे."

"अर्थात तुम्ही सांगणार तर नाहीच, तरी विचारतो... कुठे?"

जाड्याने जोरात एक लाथ डॉकच्या कमरेत घातली. डॉक विव्हळत खाली कोसळले.

"एकदा सांगितलेलं कळत नाही का? थोबाड बंद ठेवा आणि मुकाट्याने चला. थोड्या वेळात तुम्हाला तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरं आपोआप मिळतील."

जाड्याने डॉकला कॉलर पकडून उठवलं आणि पुढे ढकललं. तो मला पण ढकलणार, तेवढ्यात मी चालायला लागलो. चालता चालता अचानक समोरचा बोनोबो थांबला आणि मागे वळून आम्हाला म्हणाला,

"अगोदर तुम्ही."

मला काही कळायच्या आत डॉक एका गुहेवजा खड्ड्यात उतरले आणि गडप झाले.

मला कळायला उशीर लागला नाही की हाच तो वर्महोल होता ज्यामध्ये आता मला उतरायचं होतं. घाबरत घाबरत मी त्यात उतरलो.

अगोदर थंडगार काळोख, मग तसाच थंडगार असा डोळे दिपवणारा प्रकाश आणि अचानक पायाखालची जमीन गायब झाली. मी खाली धपकन थंड, टणक जागेवर आदळलो.

बहुधा एखादी कृत्रिम टाईल किंवा फरशी असावी. ती जागा तशी काळोखी होती, पण दिसण्याएवढा तिथे प्रकाश होता.

डॉक तिथे उभे होते, समोर जवळपास आणखी बरेच वेगवेगळ्या आकारातले बोनोबो उभे होते. आमच्या मागोमाग आमचे अपहरणकर्ते पण आलेले होते.

समोरील बोनोबोंपैकी एक बोलायला लागला.

"काय, कसे आहात हलकट माणसांनो? मला असं कळलं की तुम्हाला आमच्या गेट्सबद्दलचं गुपित माहीत झालेलं आहे. मग... काय विचार आहे तुमचा? फौजफाटा जमा करून आमच्यावर हल्ला करायचा असा विचार केला असणार नक्कीच?"

"आम्ही अजून ही गोष्ट कुणाला सांगितलेली नाही. आणि ह्या तुमच्या गेट्सबद्दल आम्हाला कळलंय, हे तुम्हाला कसं काय कळलं?" डॉक बोलले.

"तू जेव्हा तुझं यंत्र गेटमधून आत सोडलेलं होतं, तेव्हाच आमचा सिक्युरिटी बझर वाजलेला होता आणि आमच्या एका सिक्युरिटी ऑफिसरने तुला बघितलेलं होतं. तेव्हापासून आमची सिक्युरिटी कडक केलेली होती. आणि जसे तुम्ही तसा परत

प्रयत्न कराल, तेव्हा तुम्हाला पकडण्यासाठी आमची एप्स मंडळी सज्ज होती."

"तुमची सिक्युरिटी? म्हणजे हे गेट्स तुम्ही बनवले आहेत?" डॉकनी डोळे बारीक करत विचारले.

समोरील तो लीडर बोनोबो हसला. त्याच्या आवाजात एक क्रूर, माणसासारखाच अहंकार होता.

"नाही. हे गेट्स आमच्याही आधीपासून हजारो किंवा करोडो देखील म्हणता येईल इतक्या वर्षांपासून इथे आहेत. पण आम्ही तुमच्यापेक्षा थोडे जास्त स्मार्ट आहोत. आम्ही ते शोधले आणि त्यावर ताबा मिळवला. तुमच्यासारखं त्यावर संशोधन करत वर्षानुवर्षे फुकट घालवली नाहीत."

"मग आमचे गायब झालेले लोक कुठे आहेत? जे ४२ पर्यटक आणि दोन ऑफिसर जंगलात आले होते ... त्यांचं काय केलंत तुम्ही?" मी न राहवून विचारलं. माझ्या आवाजात भीती असली तरी रागही होता.

"ते?"

तो लीडर बोनोबो दोन पावले पुढे आला. त्याचे डोळे पिवळसर आणि भयानक तीक्ष्ण होते.

"ते सुरक्षित आहेत... आमच्या 'प्रयोगशाळेत'."

"प्रयोगशाळा? तुम्ही त्यांच्यावर प्रयोग करताय?" डॉकचा आवाज संतापाने आणि आश्चर्याने थरथरला.

"अर्थात!"

लीडर बोनोबोने आपले खांदे उडवले.

"जसं तुमच्या जगात तुम्ही माकडांवर, उंदरांवर प्रयोग करता... नवीन औषधं तपासण्यासाठी, तुमची सायकॉलॉजी समजण्यासाठी. तसंच आम्ही तुमच्यावर करतो. शेवटी इवोल्युशनच्या या शर्यतीत आमच्यासाठी तुम्ही 'लोअर स्पिशीज' आहात. तुमच्या मेंदूची व शरीराची रचना समजून घेणं आमच्या वैज्ञानिकांसाठी खूप आवडीचा विषय आहे."

माझ्या अंगावर सरसरून काटा आला. हे वानर आपल्याला लॅब रॅट्ससारखे वापरत आहेत?

माझ्या डोळ्यांसमोर ते ४२ लोक पिंजऱ्यात अडकलेले दिसू लागले.

"पण मग तुम्ही आमच्या जगात का येत नाही? तिथे येऊन हल्ला करून ताबा का घेत नाही?" डॉकचा वैज्ञानिक मेंदू याही परिस्थितीत काम करत होता.

"कारण तुमचं जग तुम्ही प्रदूषित करून ठेवलं आहे," लीडर बोनोबोने अत्यंत तिरस्काराने म्हटले. "तुमच्या हवेत, पाण्यात आणि तुमच्या विचारांतही विष आहे. तुम्ही तुमचा ग्रह नष्ट करत आहात. आम्हाला तुमच्या त्या फालतू व घाणेरड्या ग्रहात काहीही रस नाही. आम्हाला फक्त 'सॅम्पल्स' हवे असतात, जे तुमच्यासारखे मूर्ख स्वतःहून आमच्या हद्दीत येऊन अडकतात व आम्ही त्यांना इकडे आणतो."

त्याने हाताने इशारा केला. "चला, खूप गप्पा झाल्या. यांना 'सेल बी'मध्ये घेऊन जा. तिथे आधीच यांचे काही भाऊबंद यांची वाट बघत आहेत. उद्या सकाळी डॉ. झेयस यांच्यावर पहिला प्रयोग करतील."

* * *

त्या जाड्या बोनोबोने पुन्हा एकदा त्याच्या हातातील बंदुकीसारख्या शस्त्राने डॉकच्या पाठीत जोरात रेटा दिला. आम्हाला एका अंधाऱ्या कॉरिडॉरमधून पुढे नेण्यात आलं. ती जागा एखाद्या प्रगत अंडरग्राउंड बेससारखी वाटत होती. भिंती गुळगुळीत धातूच्या होत्या आणि सगळीकडे एक थंड, निळसर प्रकाश पसरलेला होता. लांबच लांब बोगदे, थंडगार वातावरण, त्या बोनोबोंच्या शरीराचे विचित्र असे वास... हा सर्व मिश्रित अनुभव घेताना मनात उलथापालथ होत होती...

वाटत होतं की झालं आपलं... संपलं सगळं... आता काही सुटत नाही आपण... अशा विचारांत गुंग असतानाच त्या माकडांनी आम्हाला एका मोठ्या, पारदर्शक भिंती असलेल्या खोलीत ढकललं आणि बाहेरून काहीतरी लॉक झाल्याचा आवाज आला.

मी अडखळतच आत गेलो. तिथे आधीच ८-१० लोक जमिनीवर बसलेले होते. त्यांचे कपडे फाटलेले होते, चेहरे सुकून गेले होते आणि डोळ्यात प्रचंड दहशत होती. कोपऱ्यात

बसलेल्या दोन जणांच्या अंगावर पोलिसांची फाटलेली वर्दी होती. नक्कीच ते गायब झालेले दोन ऑफिसर होते.

त्यातल्या एका ऑफिसरने आमच्याकडे बघितलं आणि कोरड्या, हताश आवाजात म्हणाला,

"नवीन शिकार? स्वागत आहे नरकात."

मी जमिनीवरच कोसळलो. सर्व संपले असेच मला वाटायला लागले. आता हे वानर आपल्याला चिरून आपला मेंदू तपासणार या विचारानेच मला घाम फुटला.

पण मी डॉककडे बघितले. ते जमिनीवर न बसता त्या पारदर्शक भिंतीजवळ गेले आणि त्या भिंतीचे निरीक्षण करू लागले. त्यांच्या डोळ्यात आता भीती नव्हती, तर एक वेगळीच चमक होती.

"डॉक, काय करताय तुम्ही? आपण मरणार आहोत." मी हताशपणे म्हणालो.

डॉक माझ्याकडे वळले आणि हळूच कुजबुजले, "दीप, तू लक्ष देऊन ऐकलंस का? तो लीडर म्हणाला की ते गेट्स त्यांनी बनवले नाहीत. याचा अर्थ असा की जो कुणी तो बनवणारा आहे, त्याने ते बंद करण्याचा किंवा कंट्रोल करण्याचा काहीतरी मार्ग नक्कीच इथे ठेवला असेल. हे वानर फक्त ते वापरत आहेत, पण त्यांना त्याचं मूळ तंत्रज्ञान माहीत नाही."

"असेलही, पण त्याचा आपल्याला काय उपयोग?"

"उपयोग आहे,"

डॉकच्या चेहऱ्यावर एक पुसटसं हसू आलं.

"कारण जेव्हा मला त्या जाड्या बोनोबोने गुहेत ढकललं, तेव्हा मी मुद्दाम माझ्या खिशातील 'मॅग्नेटिक ट्रॅकर' त्या गुहेच्या तोंडाशीच ड्रॉप केला आहे. आणि माझ्या घड्याळात त्याचं सिग्नल अजूनही येतंय. आपल्याला फक्त या पिंजऱ्यातून बाहेर पडायचंय!"

डॉकने त्यांच्या मनगटावरच्या घड्याळाची काही बटणं दाबली. त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आत्मविश्वास होता.

"डॉक, काय करताय? हे फक्त ट्रॅकर आहे ना?" मी हळू आवाजात विचारलं, जेणेकरून बाहेरच्या बोनोबो गार्ड्सना ऐकू जाऊ नये.

"नाही. हे फक्त ट्रॅकर नाही. यात एक छोटा ईएमपी (इलेक्ट्रोमॅग्नेटिक पल्स) जनरेटर बसवलेला आहे. या बोनोबोंनी तंत्रज्ञान जरी मिळवलं असलं, तरी ते आपल्यासारखे इंजिनियर्स नाहीत. त्यांची ही इलेक्ट्रॉनिक सिस्टीम मी हॅक करू शकतो."

डॉकने ते घड्याळ त्या पारदर्शक भिंतीच्या लॉकजवळ नेलं. एक बारीकसा 'बीप' असा आवाज आला, घड्याळातून एक निळा स्पार्क उडाला आणि पुढच्याच क्षणी तो दरवाजा 'क्लिक' असा आवाज करत थोडासा उघडला.

पिंजऱ्यातल्या सगळ्यांच्या चेहऱ्यावर अचानक एक आशेचा किरण चमकला.

"चला, पटापट बाहेर पडा!" डॉक त्या दोन ऑफिसरकडे बघून कुजबुजले.

आम्ही दोघे आणि ते दोन ऑफिसर हळूच बाहेर आलो. बाकीच्या लोकांना तिथेच थांबायला सांगितलं, कारण एकदम एवढ्या लोकांची गर्दी झाली असती तर आम्ही लगेच पकडले गेलो असतो.

पिंजऱ्याचा तो पारदर्शक दरवाजा मागे लोटून आम्ही चौघं अंधारात बाहेर पडलो ... मी, डॉक, आणि ते दोन पोलिस ऑफिसर. उरलेल्या बंधकांना तिथेच थांबवून, "आम्ही गेट सुरू करून तुम्हाला न्यायला नक्की परत येऊ," असं वचन देऊन आम्ही निघालो.

निघाल्याबरोबर, भिंतीला चिकटून पुढे सरकता सरकता, त्या दोघांपैकी वयाने मोठा, रुंद खांद्यांचा ऑफिसर माझ्याजवळ सरकला आणि अगदी हळू आवाजात म्हणाला,

"मी इन्स्पेक्टर साठे. आणि हा माझा सहकारी ... हवालदार कांबळे. आम्ही दोघं काही आठवड्यांपूर्वी या गायब होण्याच्या प्रकरणाचा तपास करायला या जंगलात आलो होतो... आणि मग आम्हीच यांच्या विळख्यात सापडलो."

"किती दिवस झाले तुम्हाला इथे?" मी कुजबुजलो.

"माहीत नाही, साहेब," कांबळे म्हणाले.

त्यांचा आवाज तरुण होता, पण त्यात एक खोल थकवा होता.

"इथे ना सूर्य उगवतो, ना मावळतो. किती रात्री गेल्या, आमच्यासमोरून किती जणांना त्या 'प्रयोगशाळेत' नेलं गेलं आणि ते परत आलेच नाहीत ... काहीच मोजता येत नाही."

त्यांनी थरथरत्या हातांनी आपली फाटकी वर्दी सावरली. त्यांच्या चेहऱ्यावर बऱ्याच ठिकाणी जखमा झालेल्या होत्या.

"तुम्ही पहिले आहात ज्यांच्याकडे इथून सुटायची काहीतरी योजना दिसतेय. म्हणून आम्ही तुमच्यावर विश्वास टाकायचं ठरवलं."

"ऐका, डॉक्टर," साठेंनी डॉकच्या खांद्यावर घट्ट हात ठेवला.

त्यांच्या डोळ्यांत एक करारी निश्चय होता. "वाट दाखवायचं काम तुमचं. आणि मागून सगळ्यांची सुरक्षा सांभाळायचं काम माझं. इथून जिवंत बाहेर पडू ... एकही जण मागे न ठेवता. हे माझं वचन."

मी मान हलवली. त्या अनोळखी अंधारात या दोन वर्दीधारी माणसांच्या असण्याने मला थोडा का होईना, धीर आला होता. किमान आम्ही आता दोन नव्हतो... चौघं होतो.

पण ती ओळख तिथेच थांबवावी लागली. कारण पिंजऱ्याबाहेर पडल्या पडल्या मला कळलं होतं ... "शांत कॉरिडॉर" वगैरे काहीही नव्हतं.

दूरवरून पावलांचा लयबद्ध आवाज येत होता. टॅप... टॅप... टॅप... आणि तो आमच्याच दिशेने येत होता.

"खाली!" डॉकनी कुजबुजत आम्हाला एका धातूच्या खांबामागे ढकललं.

पुढच्याच क्षणी एक बोनोबो गस्ती पथक आमच्या समोरून गेलं ... तीन हट्टे-कट्टे बोनोबो, हातात तीच निळसर शस्त्रं. त्यातल्या एकाच्या हातातल्या यंत्रातून एक बारीक तांबडा किरण कॉरिडॉरभर फिरत होता ... स्कॅनर.

आम्ही श्वास रोखून, खांबाच्या सावलीत अंग चोरून बसलो. तो किरण आमच्या पायाच्या अगदी इंचभर अलीकडून फिरून पुढे गेला. साठे आणि कांबळे माझ्या अगदी शेजारीच चिकटून बसले होते. कांबळेंच्या तोंडून नकळत एक हुंकार बाहेर पडणार, तेवढ्यात साठेंनी पटकन त्यांच्या तोंडावर हात ठेवला.

पथक पुढे निघून गेलं. आम्ही सुटकेचा निःश्वास सोडला ... पण तो फार वेळ टिकला नाही.

"हे बघ," डॉक त्यांच्या घड्याळाकडे बघत म्हणाले.

त्यांचा चेहरा काळवंडला होता. "ट्रॅकरचा सिग्नल या भुयाराच्या खोलात नेतोय. म्हणजे आपलं गेट याच दिशेला असावं. पण एक अडचण आहे, दीप."

"आता काय?"

"या घड्याळातला ईएमपी जवळपास संपलाय. पिंजऱ्याचं लॉक तोडताना त्याची निम्मी ताकद गेली. आता फार तर एक ... किंवा फार-फार तर दोन ... वेळा हे चालेल. त्यानंतर हे फक्त एक घड्याळ उरेल."

म्हणजे आता प्रत्येक बंद दरवाजा, प्रत्येक लॉक ... आम्हाला विचार करून, जपून, पॉवर वाचवत पार करावा लागणार होता. आधीची सुटकेची थोडीफार उमेद होती, तीही आता आक्रसली.

* * *

आम्ही भिंतीला चिकटून, सावलीत राहून पुढे सरकू लागलो. पण जसजसे आम्ही आत जात होतो, तसतशी एक विचित्र गोष्ट घडत होती.

आमच्या मागचे दरवाजे आपोआप बंद होत होते.

डावीकडे जाणारा रस्ता अचानक एका धातूच्या भिंतीने बंद झाला. मागे वळून दुसरीकडे जावं म्हटलं, तर तो बोळही एका सरकत्या पडद्याने बंद झालेला. प्रत्येक वेळी आमच्यासमोर फक्त एकच वाट उरत होती ... आणि ती आम्हाला आणखी आत, आणखी खोल नेत होती.

"डॉक, मला हे अजिबात आवडत नाहीये," मी कुजबुजलो. "असं वाटतंय जणू... कुणीतरी आपल्याला मुद्दाम एका ठरावीक दिशेने ढकलतंय. आपण रस्ता निवडत नाहीये ... आपल्यासाठी रस्ता निवडला जातोय."

डॉकनी काही उत्तर दिलं नाही. पण त्यांच्या जबड्याची घट्ट झालेली रेषा सांगत होती, की त्यांनाही नेमकं हेच जाणवत होतं ... आणि ते त्यांना घाबरवत होतं.

* * *

आणि मग तो निळसर प्रकाश हळूहळू मंदावत गेला. भिंतींवरचे ते गुळगुळीत धातूचे पॅनल्स मागे पडले आणि त्यांची जागा एका विचित्र, काळ्या-तपकिरी क्रिस्टलने घेतली. आणि इथून पुढे ... सगळंच बदललं.

तो भाग जणू जिवंत होता.

भिंती श्वास घेत असल्यासारख्या हळूहळू फुगत-आकुंचत होत्या. आम्ही जसे पुढे चालत होतो, तसा बोळ लांब-लांब होत जात होता ... किंवा निदान तसा भास होत होता. एक पाऊल पुढे टाकलं की वाटायचं दहा पावलं मागे सरकलो.

कानात कुठूनतरी एक मंद कुजबुज घुमत होती ... शब्द नव्हते, फक्त आवाज, जो थेट कवटीच्या आतून येत होता.

कांबळे अचानक डोकं धरून खाली बसले.

"माझं... माझं डोकं गरगरतंय," ते कण्हले. त्यांच्या डोळ्यांतून पाणी येत होतं.

"हे जग खरं नाहीये, साहेब. इथून निघा... प्लीज इथून निघा..."

"त्यांना उठवा, लवकर!" डॉक ओरडले आणि स्वतः कांबळेंना खांद्याला धरून उठवू लागले.

"दीप, ऐक ... भिंतींकडे बघू नका. कुणीच बघू नका. फक्त माझ्या पाठीवर नजर ठेवा आणि चालत राहा. हा क्रिस्टल

आपल्या मेंदूच्या सिग्नल्सशी छेडछाड करतोय. आपण घाबरलो, गोंधळलो ... की तो जिंकला."

मी डोळे जवळजवळ मिटून, फक्त डॉकच्या पाठीवर नजर ठेवून एक-एक पाऊल पुढे टाकत राहिलो. प्रत्येक पाऊल एखादा डोंगर चढल्यासारखं जड वाटत होतं.

* * *

त्या अंतहीन वाटणाऱ्या बोळातून आम्ही कसेबसे पुढे सरकत होतो, तेवढ्यात एका वळणावर ... अचानक ... एक बोनोबो गार्ड आमच्या समोर उभा ठाकला.

क्षणभर तो आणि आम्ही, दोघंही जागच्या जागी गोठलो.

मग त्या गार्डने आपल्या शस्त्राकडे हात नेला आणि तोंड उघडलं ... अलार्म वाजवायला.

पण साठे त्याच्यापेक्षा वेगवान निघाले. एका झेपेत त्यांनी त्या गार्डला जमिनीवर पाडलं, त्याच्या तोंडावर हात दाबला आणि दोघांची झटापट सुरू झाली. ती झटापट जेमतेम काही सेकंद चालली ... पण ते सेकंद मला युगांसारखे वाटले. गार्ड बळकट होता; त्याने साठेंना झुगारून दिलं, पण साठेंनी पुन्हा झेप घेतली आणि त्याच गार्डच्या शस्त्राच्या दस्त्याने त्याच्या डोक्यावर एक जोरदार प्रहार केला. गार्ड निपचित पडला.

साठे धापा टाकत उभे राहिले. त्यांच्या कपाळातून रक्ताची एक बारीक धार वाहत होती आणि त्यांचे हात थरथरत होते.

त्या कणखर पोलिस ऑफिसरच्या डोळ्यांत पहिल्यांदाच मला खरी, हाडामासाची भीती दिसली.

"लवकर चला," ते कसंबसं पुटपुटले, गार्डचं शस्त्र उचलत. "हा फार वेळ बेशुद्ध राहणार नाही. आणि असले आणखी डझनभर इथे फिरत असतील."

* * *

बोळाच्या शेवटी एक प्रचंड मोठा, क्रिस्टलचा दरवाजा होता ... घट्ट बंद. त्यावर कुठलीही कळ नव्हती, हँडल नव्हतं, बटण नव्हतं. नुसती एक अभेद्य, गुळगुळीत भिंत.

"हाच एकमेव मार्ग उरलाय," डॉक त्या दरवाजाला हात फिरवत म्हणाले.

त्यांच्या आवाजात एक थंडपणा होता.

"आणि माझ्या घड्याळात आता फक्त एकाच ईएमपी पल्ससाठी ताकद आहे. जर हे चाललं नाही, तर..."

ते वाक्य त्यांनी पूर्ण केलं नाही. त्याची गरजच नव्हती. मागे क्रिस्टलचं ते वेड लावणारं भुयार, आणि कुठल्याही क्षणी जागा होणारा तो गार्ड ... पुढे जाणं हाच एकमेव पर्याय होता.

डॉकनी घड्याळ त्या दरवाजाच्या मध्यभागी टेकवलं आणि बटण दाबलं.

एक क्षण... दोन क्षण... काहीच घडलं नाही.

माझ्या काळजाचा ठोका चुकला. कांबळेंनी डोळे मिटून घेतले.

आणि मग ... एक तीव्र निळा स्पार्क उडाला, एक खोल गुरगुरणारा आवाज आला, आणि तो अवाढव्य दरवाजा थरथरत, कण्हत बाजूला सरकू लागला.

त्याच क्षणी डॉकच्या घड्याळातला प्रकाश फडफडून कायमचा विझला.

आता आमच्याकडे ना ईएमपी होता, ना मागे फिरण्याची वाट. फक्त समोरची ती अर्धवट उघडलेली दारी ... आणि तिच्यापलीकडचं अज्ञात.

* * *

आम्ही आत पाऊल टाकलं ... आणि क्षणभर आम्ही जिथे होतो, ते सगळं विसरून गेलो.

आम्ही एका प्रचंड मोठ्या हॉलमध्ये उभे होतो. ती जागा एखाद्या जुन्या, प्राचीन मंदिरासारखी पण त्याच वेळी एकदम ॲडव्हान्स्ड स्पेसशिपसारखी वाटत होती.

हॉलच्या मध्यभागी एक मोठा, गोल आकाराचा कन्सोल होता आणि त्यातून आकाशाच्या दिशेने प्रकाशाचा एक झोत वर जात होता.

थकलेले, रक्ताळलेले, धापा टाकत ... आम्ही कसेबसे इथवर पोहोचलो होतो. प्रत्येक पाऊल आम्ही झगडून, घासून मिळवलं होतं.

"आपण... आपण पोहोचलो," कांबळे अविश्वासाने, थरथरत्या आवाजात म्हणाले.

पण नेमक्या त्याच क्षणी, आमच्या मागचा तो अवाढव्य क्रिस्टल दरवाजा ... जो आम्ही शेवटच्या ताकदीनिशी कसाबसा उघडला होता ... एका कानठळ्या बसवणाऱ्या आवाजासह आपोआप, सहजपणे बंद झाला. आणि त्याच्या पाठोपाठ हॉलचे बाकीचे सगळे दरवाजेही धडाधड बंद झाले.

"शिट! ट्रॅप आहे!" साठे ओरडले.

आणि तेव्हा मला ती भयानक जाणीव झाली.

आम्ही हा मार्ग शोधला नव्हता.

हा मार्ग आम्हाला दाखवला गेला होता.

प्रत्येक बंद झालेला दरवाजा, प्रत्येक उरलेली एकमेव वाट, ते वेड लावणारं क्रिस्टलचं भुयार ... सगळं काही आम्हाला अचूक इथवरच, या भुलभुलैयाच्या अगदी मधोमध आणण्यासाठी रचलं गेलं होतं. आमचा ईएमपी, साठेंची ती झटापट, आमचा तो जीवघेणा प्रवास ... हे सगळं अगदी सुरुवातीपासून फुकट होतं.

आम्ही सुटका करून घेत नव्हतो.

आम्हाला इथवर आणलं जात होतं.

* * *

पण तिथे बोनोबो नव्हते. त्या प्रकाशाच्या झोतातून एक आकृती तयार होऊ लागली. ती आकृती माणसाची नव्हती, माकडाचीही नव्हती. तो फक्त ऊर्जेचा एक तरंगणारा गोळा होता, ज्याला एक विशिष्ट आकार येत होता. त्याचे डोळे थेट आमच्या आत्म्यात बघत आहेत असा भास होत होता.

"वेलकम. फायनली कोणीतरी इथपर्यंत पोहोचलं."

तो आवाज आमच्या कानात नाही, तर थेट आमच्या डोक्यात घुमला. तो आवाज इतका शांत आणि प्रभावी होता की आमचे पाय जागेवरच खिळले.

"तू... तू कोण आहेस?" डॉकने कसाबसा आवाज काढला.

"तूच हे गेट्स बनवले आहेत का? तू देव आहेस का?"

ती ऊर्जेची आकृती हसली. त्या हसण्यात एक भयानक शांतता होती.

"देव? तुम्ही माणसं ज्या गोष्टी समजू शकत नाही, त्याला लगेच देवाचं नाव देता. नाही, मी देव नाही. मी एक फिफ्थ डायमेन्शनल बीइंग आहे. आमच्या अस्तित्वाची पातळी तुमच्या कल्पनेच्याही पलीकडची आहे. आम्ही वेळ, स्पेस आणि डायमेन्शन्सच्या बाहेर जगतो."

"मग तू हे सगळं का केलंस?" मी धाडस करून विचारलं.

"हे वर्महोल, हे पॅरलल युनिव्हर्स जोडणं, या बोनोबोंना आमच्यावर प्रयोग करू देणं... हे का? यातून तुला काय मिळतंय?"

त्या आकृतीने माझ्याकडे बघितलं आणि डोक्यात घुमणारा तो आवाज पुन्हा आला.

"एंटरटेनमेंट. मनोरंजन."

माझा श्वासच थांबला. "काय?"

"होय," तो जीव अगदी शांतपणे म्हणाला.

"जेव्हा तुम्ही स्पेस आणि टाईमच्या बंधनात नसता, तेव्हा अनंत काळ जगताना खूप कंटाळा येतो. त्यामुळे आम्ही असे छोटे छोटे खेळ बनवतो. जसं तुम्ही तुमच्या घरात काचेच्या पेटीत मुंग्या पाळता आणि त्यांची धावपळ बघत बसता... तसंच हे माझं छोटंसं 'टेरारियम' आहे."

डॉकचा चेहरा रागाने लाल झाला होता. "म्हणजे आमचे लोक तिथे मरतायत, हे बोनोबो आम्हाला कापतायत... आणि हे सगळं तुझ्यासाठी फक्त एक खेळ आहे?"

"एक्झॅक्टली!" त्या जीवाने एका उत्साही प्रेक्षकासारखं उत्तर दिलं.

"विचार करा, एका युनिव्हर्समध्ये इवोल्युशनने माणसाला हुशार बनवलं आणि दुसऱ्यात बोनोबोला. जेव्हा मी या दोन वेगळ्या प्रजातींना एकाच पिंजऱ्यात कोंडतो, तेव्हा त्यांच्यातील अहंकार, भीती आणि सर्व्हायव्हलची धडपड बघायला खूप मजा येते. इट इज जस्ट अ रिॲलिटी शो फॉर मी!"

आम्ही सगळेच सुन्न झालो होतो. या जगात आम्ही स्वतःला किती ग्रेट समजत होतो, आमचं विज्ञान, आमची प्रगती...

आणि या परग्रही जीवासाठी आम्ही फक्त टीव्हीवरच्या एका मनोरंजनात्मक कार्यक्रमातले मोहरे होतो!

"तुम्ही बोनोबोंपेक्षा थोडे जास्त हुशार निघालात, कारण तुम्ही इथपर्यंत पोहोचलात,"

तो जीव म्हणाला. "पण आता काय? तुम्ही त्यांना मारणार? की ते तुम्हाला मारणार? जो जिंकेल, तो पुढच्या एपिसोडचा हिरो असेल."

"आम्ही तुझा हा खेळ थांबवणार!" डॉक ओरडले आणि त्यांनी तिथे असलेल्या त्या मुख्य कन्सोलकडे धाव घेतली.

त्या जीवाने त्यांना थांबवलं नाही. तो फक्त हसत राहिला. "गो अहेड. ट्राय. पण लक्षात ठेवा, तुम्ही मुंग्या आहात... आणि मुंग्यांनी काचेची पेटी फोडली, तरी त्या घराच्या बाहेर पडू शकत नाहीत."

डॉकने त्या कन्सोलवरचे काही सिम्बॉल्स दाबायला सुरुवात केली. त्यांना ते तंत्रज्ञान समजत नव्हतं, पण ते प्रयत्न करत होते.

तेवढ्यात हॉलचे दरवाजे पुन्हा उघडले आणि मगाचचा तो लीडर बोनोबो त्याच्या सैन्यासह आत शिरला. त्याच्या हातात बंदूक होती आणि त्याचे डोळे रागाने लाल झाले होते.

"इथेच संपला तुमचा प्रवास माणसांनो!" लीडर बोनोबो ओरडला.

आता आमच्या एका बाजूला शस्त्र घेतलेले हिंस्र बोनोबो होते आणि दुसऱ्या बाजूला आमचा तमाशा बघून मनोरंजन करून घेणारा तो अवकाशीय देव!

खेळ खऱ्या अर्थाने आता सुरू झाला होता.

* * *

माझ्या छातीत हृदय इतक्या जोरात धडधडत होतं की मला वाटलं, त्याचा आवाज या अख्ख्या हॉलमध्ये घुमत असेल. एका बाजूला बंदुका रोखलेले ते हिंस्र बोनोबो आणि दुसऱ्या बाजूला हवेत तरंगणारा तो ऊर्जेचा गोळा ... आमचा "देव", आमचा प्रेक्षक, आमचा कसाई.

लीडर बोनोबोने आपलं शस्त्र थेट डॉकच्या छातीवर रोखलं.

"त्या कन्सोलपासून दूर हो, माणसा," तो गुरगुरला.

"तुला त्यातलं काहीही कळत नाही. एक चुकीचं बटण दाबलंस आणि अख्खा बेस उडेल."

पण डॉक थांबले नाहीत. त्यांची बोटं त्या विचित्र सिम्बॉल्सवरून वेगाने फिरत होती. ते अधाशासारखे प्रत्येक चिन्ह बघत होते, त्यांच्या डोक्यातला इंजिनियर एका सेकंदात हजारो शक्यता पडताळत होता.

"दीप," ते माझ्याकडे न बघता कुजबुजले, "हे तंत्रज्ञान आपल्या पलीकडचं आहे, हे खरंय. पण कोणतंही तंत्रज्ञान एका तत्त्वावर चालतं ... एनर्जी इन, एनर्जी आऊट. आणि या

कन्सोलमधून जो प्रकाशाचा झोत आकाशात जातोय ना, तीच या सगळ्या गेट्सची नस आहे. हे सगळे वर्महोल्स इथून ऊर्जा खेचतायत."

"म्हणजे?"

"म्हणजे जर मी ही नस ओव्हरलोड केली..." डॉकच्या डोळ्यात ती धोकादायक चमक पुन्हा आली, "...तर सगळे गेट्स एकाच वेळी अस्थिर होतील."

तो ऊर्जेचा गोळा ... तो जीव ... हळूच आमच्या जवळ सरकला. त्याच्या त्या तेजात एक प्रकारची मजेशीर उत्सुकता होती.

"ओह्ह," तो आवाज पुन्हा थेट माझ्या मेंदूत घुमला.

"बघितलंस? हाच तो क्षण असतो जेव्हा कथा रंगात येते. नायक हताश होतो, आणि मग एक वेडं, अशक्य पाऊल उचलतो. माझे प्रेक्षक याच क्षणासाठी जगतात."

"तू आम्हाला थांबवणार नाहीस?" डॉकनी त्याच्याकडे रोखून बघत विचारलं.

"का थांबवू?" तो जीव जणू हसला.

"मी जर तुला थांबवलं, तर शो संपेल. आणि कंटाळवाणा शो कुणाला हवाय? चल, ट्राय कर. मला बघायचंय, मुंगी काचेची पेटी फोडल्यावर पुढे काय करते."

लीडर बोनोबोला हे सगळं रुचलं नाही. आपल्या मालकाला या मनुष्यप्राण्याची एवढी मजा का वाटतेय, हे त्याला कळत नव्हतं.

"बास झालं!" तो ओरडला आणि त्याने डॉकवर शस्त्र चालवलं.

* * *

पुढच्या एका सेकंदात अनेक गोष्टी एकाच वेळी घडल्या.

डॉकनी शेवटचं चिन्ह दाबलं आणि स्वतःला बाजूला झोकून दिलं. लीडर बोनोबोच्या शस्त्रातून निघालेला तो निळसर ऊर्जेचा लोळ डॉकला चाटून थेट त्या कन्सोलवर आदळला.

आणि अख्खं जग थरथरलं.

तो आकाशात जाणारा प्रकाशाचा शांत झोत अचानक एका विक्राळ, गुरगुरणाऱ्या स्तंभात बदलला. संपूर्ण हॉल लालसर प्रकाशाने भरून गेला. कुठेतरी एक भयानक अलार्म वाजू लागला ... पण तो आपल्या जगातल्या सायरनसारखा नव्हता, तो एखाद्या जखमी प्राण्याच्या किंकाळीसारखा होता.

"सिस्टीम क्रिटिकल," एक यांत्रिक आवाज त्या परक्या भाषेत आणि तरीही आम्हाला समजेल अशा रीतीने घुमला.

"गेट अनस्टेबल."

"काय केलंस तू?!" लीडर बोनोबो ओरडला.

आता पहिल्यांदाच त्याच्या आवाजातला अहंकार जाऊन तिथे भीती आली होती.

"काचेची पेटी फोडली," डॉक उठत म्हणाले.

त्यांचा एक हात भाजला होता, पण त्यांच्या चेहऱ्यावर विजयाचं हसू होतं.

"हे सगळे गेट्स आता कोलमडणार. आणि हा बेस त्या गेट्सच्या बरोबर नाभीवर बसलाय. तुमचं अख्खं साम्राज्य पुढच्या काही मिनिटांत राख होईल."

बोनोबोंमध्ये एकच गोंधळ उडाला. ते आपापसात किंचाळू लागले, काही जण त्या कन्सोलकडे धावले, काही पळून जाण्याचा मार्ग शोधू लागले. भिंतींवरचे ते काळे-तपकिरी क्रिस्टल्स आता रक्तासारखे लालभडक चमकत होते आणि त्यातून बारीक तडे जात असल्याचा 'कटकट' आवाज येत होता.

"दीप, आता! पळ!" डॉक ओरडले.

मी आणि ते दोन ऑफिसर ... इन्स्पेक्टर साठे आणि हवालदार कांबळे ... डॉकच्या मागे धावलो. गोंधळाचा फायदा घेऊन साठेंनी एका बोनोबोच्या हातून त्याचं शस्त्र हिसकावलं आणि दोन-तीन बोनोबोंवर ते झाडलं. आम्ही त्या लालसर कॉरिडॉरमधून पुन्हा सेल ब्लॉकच्या दिशेने धावलो.

* * *

जसजसा बेस हादरत होता, तसतसे त्या पारदर्शक पिंजऱ्यांचे लॉक्स आपोआप उघडत होते. आत अडकलेले ते

सगळे लोक ... आमची माणसं ... बाहेर पडत होते. भीतीने, गोंधळाने पण आशेने त्यांचे चेहरे फुलले होते.

"सगळे माझ्या मागे या!" डॉक ओरडले.

"गेट्स बंद व्हायच्या आत आपल्याला एका गेटपर्यंत पोहोचायचंय. माझ्या घड्याळातला ट्रॅकर ज्या गेटला आहे, तेच आपलं घर ... तेच आपली पृथ्वी!"

आम्ही धावत होतो. भिंती कोसळत होत्या. छतावरून आगीसारखे ऊर्जेचे लोळ खाली पडत होते. ते दृश्य एखाद्या नरकासारखं होतं ... आणि त्या नरकातून आम्ही जीव मुठीत घेऊन पळत होतो.

आणि या सगळ्या प्रलयात, माझ्या डोक्यात तो शांत, थंड आवाज पुन्हा घुमला.

"आहा... क्लायमॅक्स! बघा कशी धावपळ चाललीय. भीती, आशा, सर्व्हायव्हल ... हीच तर खरी मजा. माझ्या प्रेक्षकांचे रेटिंग्ज आत्ता आकाशाला भिडले असतील."

मला त्याचा प्रचंड संताप आला. आम्ही इथे जगण्या-मरण्याची लढाई लढत होतो आणि हा... हा फक्त बघत बसला होता. पॉपकॉर्न खात बघणाऱ्या प्रेक्षकासारखा.

"तुला माणुसकी नावाची गोष्टच नाही!" मी पळता पळता हवेत ओरडलो, जणू तो माझ्या शेजारीच होता.

"माणुसकी?" तो जीव खऱ्या अर्थाने हसला आणि ते हसणं माझ्या कवटीच्या आत घुमलं.

"दीप, बाळा, तू ज्याला माणुसकी म्हणतोस ना, तीसुद्धा फक्त इवोल्युशनने तुमच्या जनुकांत लिहिलेली एक स्क्रिप्ट आहे. तुम्ही जे काही करता ... प्रेम, त्याग, राग ... ते सगळं तुम्हाला 'वाटतं' तुमचं आहे. पण तेसुद्धा फक्त एक प्रोग्रॅम आहे. आणि मला तो प्रोग्रॅम चालताना बघायला आवडतं."

* * *

आम्ही एका गेटपाशी पोहोचलो. डॉकच्या घड्याळातला सिग्नल आता वेड्यासारखा बीप-बीप करत होता.

"हेच ते! हेच आपलं गेट!" डॉक ओरडले. "एक एक करून आत उडी मारा! लवकर!"

पिंजऱ्यातून सुटलेले लोक एक एक करून त्या गेटमध्ये उडी मारू लागले. काळोख, मग डोळे दिपवणारा प्रकाश आणि ते गायब. पृथ्वीच्या दिशेने.

पण गेट आता अस्थिर होतं. ते वेगाने आकुंचन पावत होतं, त्याची कडा थरथरत होती. आणि नेमक्या याच वेळी, मागून बोनोबोंची एक तुकडी आमच्यावर चालून आली. त्यांच्या पुढे होता तो लीडर बोनोबो ... जखमी, रक्ताळलेला, पण डोळ्यात सूड पेटलेला.

"तुम्ही कुठेही जाणार नाही!" तो किंचाळला आणि त्याने शस्त्र रोखलं ... थेट माझ्यावर.

मला पळायलाही वेळ मिळाला नाही. त्या शस्त्रातून निघणारा ऊर्जेचा लोळ माझ्या दिशेने सुटला. मला माझा मृत्यू स्पष्ट दिसला.

पण... तो लोळ माझ्यापर्यंत पोहोचलाच नाही.

हवेतच, माझ्या अगदी एक इंच दूर, तो ऊर्जेचा लोळ थांबला. हवेत गोठून गेला. जणू कुणीतरी वेळेचं बटण 'पॉज' केलं असावं.

मी थक्क होऊन बघत राहिलो. आणि मग तो आवाज आला ... आता त्यात मजा नव्हती, फक्त एक थंड, अंतिम अधिकार होता.

"नाही."

तो लोळ हवेतच विरून गेला. लीडर बोनोबो भीतीने थरथरला.

"नायक फायनलच्या आधी मरत नाही," तो जीव म्हणाला. "ती वाईट कथा होईल. आणि मी वाईट कथा सहन करत नाही."

आणि त्या क्षणी, माझ्या आयुष्यातलं सगळ्यात भयानक सत्य माझ्या लक्षात आलं.

मी जिवंत होतो ते माझ्या हुशारीमुळे नव्हे. माझ्या नशिबामुळे नव्हे. डॉकच्या युक्तीमुळेही नव्हे.

मी जिवंत होतो कारण त्याला माझी कथा अजून संपवायची नव्हती. माझा प्रत्येक श्वास, माझं प्रत्येक पाऊल, ही माझी

निवड नव्हतीच. ती त्याची पटकथा होती. आम्ही फक्त बाहुल्या होतो आणि तोच आमचा सूत्रधार होता.

माझ्या पायातलं त्राण गेलं. जिंकण्याची, सुटण्याची जी काही थोडी आशा उरली होती, ती त्या एका शब्दाने ... "नाही" ... पुरती चिरडली गेली. आम्ही पेटी फोडली होती खरी, पण घराबाहेर आम्ही कधीच पडणार नव्हतो.

* * *

"दीप, भानावर ये!" डॉकनी मला गदागदा हलवलं. "गेट बंद होतंय! उडी मार!"

पण नेमका तेव्हा लीडर बोनोबोने ... ज्याला आता काहीही गमावायचं नव्हतं ... पुन्हा झेप घेतली. तो थेट डॉकवर चालून आला.

इन्स्पेक्टर साठे मधे आले.

"तुम्ही जा! मी याला थांबवतो!" साठे ओरडले आणि त्यांनी त्या लीडर बोनोबोला घट्ट पकडलं. दोघं एकमेकांत भिडले, त्या कोसळणाऱ्या हॉलच्या मधोमध.

"साठे, नको!" मी ओरडलो.

पण साठेंनी मागे वळून बघितलं. त्यांच्या चेहऱ्यावर एक विचित्र शांती होती.

"माझी बायको आणि मुलगी वाट बघतायत," ते म्हणाले.

"त्यांच्यापर्यंत हे सांगा... आम्ही हरलो नाही. आम्ही लढलो."

आणि त्या शब्दांसरशी, माझ्या डोक्यात पुन्हा तो आवाज घुमला ... आणि त्या आवाजाने जे केलं, ते सगळ्यात क्रूर होतं.

"वाह!" तो जीव टाळ्या वाजवणाऱ्या प्रेक्षकासारखा उद्गारला.

"बघितलंत? हाच तो त्यागाचा क्षण! 'माझी बायको आणि मुलगी वाट बघतायत' ... परफेक्ट डायलॉग! माझ्या प्रेक्षकांच्या डोळ्यांत आत्ता पाणी आलं असेल. साठे, तू माझा आवडता कॅरेक्टर होतास."

मला उलटी होईल असं वाटलं. साठेंचा तो पवित्र त्याग, त्यांची ती शेवटची इच्छा ... हे सगळं त्या जीवासाठी फक्त एका चांगल्या सीनचा मसाला होता. त्याने त्या त्यागाचं पावित्र्यही चोरून घेतलं होतं. माणसाचं मरणसुद्धा त्याच्यासाठी फक्त एक एपिसोडमधला 'इमोशनल मोमेंट' होता.

डॉकनी माझा हात पकडला आणि आम्ही दोघं, हवालदार कांबळेसोबत, त्या आकुंचन पावणाऱ्या गेटमध्ये उडी मारली.

मागे वळून बघण्याची माझी हिंमत झाली नाही. पण साठेंची किंकाळी आणि त्या जीवाचं समाधानी हसू ... दोन्ही मला एकाच वेळी ऐकू आलं.

काळोख. डोळे दिपवणारा प्रकाश. आणि अचानक ... थंड, ओलसर माती.

* * *

मी बैकुंदूच्या जंगलातल्या त्याच गुहेच्या तोंडाशी धपकन पडलो. वर आकाशात चांदण्या होत्या. झाडांच्या पानांतून वारा वाहत होता. रातकिड्यांची किरकिर ऐकू येत होती.

पृथ्वी. आम्ही परत आलो होतो.

माझ्या आजूबाजूला तेच सुटलेले लोक पडले होते ... थकलेले, घाबरलेले, पण जिवंत. डॉक माझ्या शेजारी गुडघ्यांवर बसले होते, धापा टाकत. हवालदार कांबळे एका झाडाला टेकून रडत होते.

आमच्या मागे, ती गुहा एका मोठ्या गडगडाटासह आत कोसळली. त्यातून निघणारा तो निळसर प्रकाश विझला. गेट बंद झालं होतं. कायमचं.

काही क्षण आम्ही फक्त श्वास घेत राहिलो. आम्ही वाचलो होतो. आम्ही त्या बोनोबोंच्या नरकातून, त्या परक्या जगातून, आमच्या काही माणसांना घेऊन परत आलो होतो.

"आपण जिंकलो, डॉक," मी कसंबसं म्हणालो.

पण माझ्या आवाजात आनंद नव्हता. कारण मला माहीत होतं, हे खरं नाही.

डॉकनी आकाशाकडे बघितलं. त्यांच्या चेहऱ्यावर सुटकेची भावना नव्हती, फक्त एक खोल, गडद विचार होता.

"नाही, दीप," ते हळू म्हणाले.

"आपण त्या बोनोबोंच्या सेटवरून पळून आलो. आपण त्यांचा एक पिंजरा तोडला. पण..."

"पण काय?"

"...पण तो जीव अजून तिथेच आहे. त्याला आपण साधा ओरखडाही काढू शकलो नाही. त्याचं ते मशीन, ते गेट्स ... ते त्याच्यासाठी फक्त एक सेट होतं, दीप. एखाद्या नाटकाचा सेट. आपण सेट जाळला म्हणून काय नट संपतो का? दिग्दर्शक संपतो का? तो दुसरा सेट उभा करेल. दुसरी कथा लिहील."

आणि नेमक्या त्याच क्षणी, ते घडलं.

माझ्या डोक्यात तो आवाज परत आला. आता तो दूरून, कुठल्यातरी अथांग काळोखातून येत असल्यासारखा वाटत होता. पण तितकाच स्पष्ट. तितकाच शांत.

"छान शेवट होता."

माझं अंग शहारलं. मी आजूबाजूला बघितलं ... काहीच नव्हतं. फक्त जंगल, फक्त चांदण्या.

"फायनल एपिसोड सुपरहिट गेला," तो जीव म्हणाला, आणि त्याच्या त्या शांत आवाजात आता एका तृप्त, अधाशी समाधानाची झाक होती.

"नायक हरतोय असं वाटत असताना तो जिंकतो, एक प्रिय कॅरेक्टर त्याग करतो, आणि शेवटी घरी सुखरूप परत. माझ्या प्रेक्षकांना हे फार आवडलं."

मी काही बोलणार, तेवढ्यात त्याचा आवाज पुन्हा घुमला ... आणि या वेळी तो थेट माझ्याशी बोलत होता.

"पण दीप, तुला एक गुपित सांगू? या सगळ्यात माझा सगळ्यात आवडता क्षण कोणता होता माहितेय? तू बंदुकीसमोर वाचलास तो नाही. साठे मेला तो नाही. तो क्षण होता ... जेव्हा तुझ्या लक्षात आलं की तू जिवंत आहेस ते माझ्यामुळे. जेव्हा तुझ्या डोळ्यांत ती ओळख उमटली, की तू कधीच, कधीच मोकळा होणार नाहीस. तो चेहरा... अहाहा. प्रेक्षक त्यासाठी वेडे होतात. एका जीवाला कळतं की तो पिंजऱ्यात आहे ... यापेक्षा सुंदर दृश्य या अनंत विश्वात दुसरं नाही."

माझ्या पोटात खड्डा पडला. माझी भीती, माझी हतबलता, माझं ते मरणासन्न सत्याचं भान ... तो क्षणसुद्धा त्याच्यासाठी एक 'सीन' होता. मी जेवढा तुटत होतो, तेवढी त्याला मजा येत होती. माझं दुःख हेच त्याचं इंधन होतं.

तो थांबला. आणि मग जे शब्द आले, त्यांनी माझ्या उरल्यासुरल्या आशेचा गळा घोटला.

"म्हणूनच मी या शोचा पुढचा सीझन काढतोय. आणि त्यापुढचा. आणि त्यापुढचा."

"तुला... तुला कंटाळा येत नाही का?" डॉकनी अंधारात ओरडून विचारलं. त्यांच्या आवाजात आता वैज्ञानिकाचं कुतूहल नव्हतं, फक्त एका थकलेल्या माणसाची केविलवाणी आशा होती ... कदाचित हा राक्षस एक दिवस कंटाळेल आणि आपल्याला सोडून देईल.

आणि त्या जीवाने जे उत्तर दिलं, ते या अख्ख्या रात्रीतलं सगळ्यात भयानक होतं.

"कंटाळा?" तो जणू मनापासून हसला, आणि ते हसणं माझ्या कवटीच्या आतल्या भिंतींवर आदळत राहिलं.

"डॉक्टर, तुला माहितेय मला कधीच कंटाळा का येत नाही? कारण तुमच्यातला प्रत्येक जण वेगळा तुटतो. साठे त्यागाने तुटला. तो बोनोबो लीडर रागाने तुटला. दीप 'सुटका नाही' या जाणिवेने तुटतोय. आणि अजून किती रंग बाकी आहेत! कुणी प्रेमात तुटतं, कुणी विश्वासघाताने, कुणी आशा देऊन ती हिसकावल्यावर, कुणी फक्त एकटेपणाने हळूहळू झिजत जातं. एकही मरण सारखं नसतं. एकही अश्रू दुसऱ्यासारखा नसतो."

"आणि सगळ्यात मजेशीर गोष्ट म्हणजे," तो पुढे म्हणाला, "दर वेळी मी काहीतरी नवीन सुचवतो. असं काहीतरी जे मी स्वतःही याआधी कधी कल्पिलं नव्हतं. या सीझनला मी दोन विश्वं जोडली. पुढच्या सीझनला कदाचित मी काळच उलटा फिरवेन. किंवा तुमच्या आठवणी बदलेन ... तुम्हाला वाटेल तुमचं अख्खं आयुष्य खरं होतं, आणि ते माझ्या एका दुपारच्या लहरीचं फळ असेल. किंवा मी तुम्हाला असं जग देईन जिथे सगळं परफेक्ट असेल ... आणि मग बघेन, परफेक्ट जगातला माणूस किती सुंदर रीतीने वेडा होतो. माझ्या कल्पनांना अंत नाही, दीप. आणि म्हणूनच तुमच्या यातनांनाही अंत नाही."

"पण आम्ही तुला काहीच केलं नाही!" मी ओरडलो, आणि माझ्या डोळ्यांतून संतापाचे आणि हतबलतेचे अश्रू वाहू लागले.

"बरोबर," तो जीव अगदी प्रेमाने म्हणाला, आणि तीच त्याची सगळ्यात मोठी क्रूरता होती.

"तुम्ही काहीच केलं नाहीत. कारण याला कारण लागत नाही. मुंगीने काचेच्या पेटीतल्या माणसाचं काय बिघडवलेलं असतं? काहीच नाही. तरी माणूस तिला बघत बसतो, कधी खाऊ घालतो, कधी पेटी हलवून बघतो ती कशी घाबरते. का? कारण तो बघू शकतो म्हणून. मी हे करतो कारण मी करू शकतो. आणि कारण... मला मजा येते. आणि जोवर मला मजा येतेय ... आणि दीप, मला नेहमीच मजा येणार आहे ... तोवर हा खेळ संपणार नाही."

"घाबरू नका,"

तो शेवटी म्हणाला, आणि त्या दोन शब्दांत जगातली सगळी दहशत सामावलेली होती.

"तुम्हाला काही करायची गरज नाही. तुम्ही फक्त जगत राहा. हसा, रडा, प्रेम करा, स्वप्नं बघा. आणि मी बघत राहीन. नेहमी. प्रत्येक क्षणी. आणि दर वेळी काहीतरी नवीन सुचवत राहीन."

आणि मग तो आवाज विरून गेला. पण मला माहीत होतं ... तो गेला नव्हता. तो फक्त... मागे सरकून बसला होता. एखाद्या प्रेक्षकासारखा, पुढचा सीन सुरू व्हायची वाट बघत.

* * *

त्यानंतरचे काही दिवस आम्ही जणू स्वप्नात असल्यासारखे जगलो. सुटलेल्या लोकांना त्यांच्या कुटुंबांकडे सोपवलं. सरकारला रिपोर्ट दिला ... अर्थात, अर्धवट आणि सोयीस्कर.

"बेकायदा तस्करांची टोळी, एक गुप्त भुयार, बंधक."

कारण खरी गोष्ट सांगितली असती, तर आम्हालाच वेड्याच्या इस्पितळात पाठवलं असतं. पाचव्या मितीतला जीव, समांतर विश्वातले बुद्धिमान बोनोबो, अख्ख्या मानवजातीचा एक न संपणारा रिॲलिटी शो ... हे कोण ऐकून घेणार?

इन्स्पेक्टर साठेंच्या बायको-मुलीला आम्ही भेटायला गेलो.

"ते शूरपणे लढले," एवढंच आम्ही सांगू शकलो.

त्यांच्या त्यागाचं खरं रूप ... की तो त्यागसुद्धा कुणाच्यातरी मनोरंजनासाठी 'स्क्रिप्टेड' होता... हे सांगायची हिंमत आमच्यात नव्हती.

आणि जेव्हा त्या चिमुकलीने डोळे मोठे करून "बाबा परत येणार ना?" असं विचारलं, तेव्हा माझ्या काळजाला एक भयानक विचार चाटून गेला ... कदाचित या क्षणीसुद्धा तो आम्हाला बघतोय. या मुलीच्या डोळ्यांतल्या पाण्यावरही त्याला मजा येतेय. आणि त्याच्या प्रेक्षकांच्या मते, हाही एक "हृदयस्पर्शी सीन" आहे.

सगळं हळूहळू पूर्वपदावर येतंय असं वाटत होतं.

आणि मग, बरोबर एका आठवड्याने, एका सकाळी मी नेहमीसारखं चहाचा कप घेऊन वर्तमानपत्र उघडलं. आणि माझ्या हातातला कप थरथरला.

आतल्या पानावर एक छोटीशी बातमी होती:

"बैकुंदू अभयारण्य पुन्हा पर्यटकांसाठी खुलं ... राज्य सरकारचा अनपेक्षित निर्णय. 'सुरक्षेची सर्व काळजी घेतली गेली आहे,' असे प्रशासनाचे आश्वासन. आजपासूनच पर्यटकांची नोंदणी सुरू."

कोणतंही कारण नाही. कोणताही खुलासा नाही. ज्या सरकारने काही दिवसांपूर्वी ते जंगल कायमचं बंद करण्याचा निर्णय जवळपास पक्का केला होता, त्याच सरकारने अचानक, अकारण, ते पुन्हा उघडलं होतं.

मी सुन्न होऊन ती बातमी बघत राहिलो. आणि मला डॉकचे शब्द आठवले ... तो दुसरा सेट उभा करेल. दुसरी कथा लिहील.

गेट कोसळलं होतं, हे खरं. पण ज्याला वेळ, स्पेस आणि वास्तवाच्याच बाहेर राहून हे सगळं हवं तसं वाकवता येतं, त्याच्यासाठी एक तुटलेलं गेट काय आणि एका सरकारचा निर्णय काय ... सगळं सारखंच. त्याला नवे नट हवे होते. नवी शिकार हवी होती. नवी कल्पना सुचली होती. आणि म्हणून त्याने खुद्द वास्तवाला हात घालून ते जंगल पुन्हा उघडलं होतं.

मी थरथरत्या हातांनी पान उलटलं. आणि तिथे आणखी बातम्या होत्या. दूरच्या एका देशात एका रात्रीत अख्खं गाव गायब. कुठेतरी आकाशाचा रंग दोन दिवस हिरवा दिसला आणि

शास्त्रज्ञांना कारण सापडेना. कुठल्यातरी शहरात लोकांना एकाच विचित्र स्वप्नाने एकाच वेळी जाग आली. पूर्वी या बातम्या वाचून मला काहीच वाटलं नसतं. पण आता... आता मला कळत नव्हतं ... यातली कोणती बातमी 'खरी' आहे आणि कोणती त्याच्या पुढच्या सीझनची नांदी आहे. कदाचित त्याने आधीच कुठेतरी नवा खेळ मांडला होता. कदाचित या क्षणी जगाच्या दुसऱ्या टोकाला कुणीतरी, माझ्यासारखाच, त्या काळ्या सत्याकडे नुकतीच पहिली नजर टाकत होता.

शो चालूच राहणार होता. कायम.

* * *

आज त्या घटनेला बरीच वर्षं झालीत. डॉक आता थकलेत ... फार थकलेत. ते म्हणतात त्यांना आता झोप येत नाही, कारण डोळे मिटले की तो बघतोय याची जाणीव अधिकच टोचत राहते. अधूनमधून आम्ही भेटतो, आणि कधीच कुणाला न सांगता येणाऱ्या त्या रात्रीबद्दल फक्त नजरेनेच बोलतो. कारण शब्दांत मांडलं, तर तोही तो सीन बघून हसेल, ही भीती आम्हा दोघांनाही आतून पोखरत राहते.

मी आता पूर्वीसारखा राहिलो नाही.

मी जेव्हा एखादा मोठा, धाडसी निर्णय घेतो ... तेव्हा मला प्रश्न पडतो: हा खरंच माझा निर्णय आहे का? की कुणीतरी,

कुठल्यातरी अथांग काळोखातून, माझ्या आयुष्याची पटकथा लिहितंय आणि मला फक्त ती जगायला लावतंय?

मी जेव्हा सुखी असतो ... तेव्हा मला त्या सुखाचीच भीती वाटते. कारण त्याला माहितेय, माणूस जेवढ्या उंचावर असतो, तेवढं त्याचं पडणं बघायला जास्त मजा येते. म्हणून हा आनंद खरा आहे, की पुढच्या एखाद्या क्रूर 'ट्विस्ट'साठी रचलेली नुसती सजावट ... हे मला कधीच कळणार नाही.

आणि रात्री, जेव्हा सगळं जग झोपलेलं असतं आणि मी एकटा छताकडे डोळे लावून पडलेलो असतो ... तेव्हा मला नेहमी जाणवतं, कुणीतरी बघतंय. भिंतीच्या पलीकडून नाही, छताच्या वरून नाही ... तर वेळेच्या, जागेच्या, या अख्ख्या विश्वाच्या बाहेरून कुणीतरी माझ्याकडे टक लावून बघतंय. कधीही पापणी न लवता. कधीही समाधान न होता. आणि ... सगळ्यात भयंकर ... कधीही कंटाळा न येता.

कारण त्याला कंटाळा येतच नाही. तो येऊच शकत नाही. दर वेळी त्याच्याकडे एक नवीन कल्पना असते. एक नवीन खेळ, एक नवीन यातना, एक नवीन रीत आम्हाला तोडण्याची ... अशी की जी त्यानेही याआधी कधी वापरलेली नसते.

उद्या तो काय सुचवेल, हे मला माहीत नाही.

पण एक गोष्ट मला पक्की माहितेय ...

त्याला खूप मजा येणार आहे.

... समाप्त (?)

शून्य

शून्याचा आवाज

पाण्याचा एक थेंब हवेत तरंगत होता.

पडत नव्हता, उडत नव्हता ... फक्त थांबला होता. एक परिपूर्ण, चकाकता गोल. त्याच्या आत स्टेशनच्या मंद दिव्यांचं प्रतिबिंब थरथरत होतं. आर्य कितीतरी वेळ त्या थेंबाकडे बघत राहिला. जणू त्यालाही आता कळत नव्हतं की खाली कुठलं आणि वर कुठलं, मागे कुठलं आणि पुढे कुठलं. गुरुत्वाकर्षणाशिवायच्या या जगात 'दिशा' हा शब्दही हळूहळू निरर्थक होत चालला होता. आणि आर्यला वाटायचं ... आपणही असेच आहोत. कुठेतरी, कशाशीही न बांधलेले. नुसते तरंगणारे.

स्पेस स्टेशन **'शून्य'**.

नावच किती चपखल होतं. आत एक यांत्रिक, निर्जीव थंडावा. भिंती पांढऱ्या, गुळगुळीत, कोरड्या. आणि बाहेर ... खिडकीच्या जाड काचेपलीकडे ... अथांग, अनंत काळोख. तारे

होते, पण ते इतके दूर, इतके थंड, की त्यांच्या असण्याचा काही दिलासा वाटत नसे. उलट त्या प्रत्येक ठिपक्यामागे पसरलेली अमर्याद पोकळी अधिकच भयाण वाटे.

इथे एक आवाज सतत होता ... यंत्रांचा खोल, एकसुरी गुणगुणाट. हवा शुद्ध करणाऱ्या यंत्राचा, वीजप्रवाहाचा, कशाकशाचा. पण तो आवाज इतका अखंड, इतका न बदलणारा होता की काही काळानंतर तो ऐकूच येईनासा झाला. आणि मग आर्यला कळलं ... खरी भीषण शांतता हीच असते. आवाज नसणं म्हणजे शांतता नव्हे; तर एकच आवाज इतका सतत असणं की त्याचा अर्थच संपून जावा ... हीच खरी शून्यता. तो त्या गुणगुणाटाला मनातल्या मनात 'शून्याचा आवाज' म्हणू लागला होता.

आर्य इथे पाचशे दिवसांहून अधिक काळ एकटाच होता.

पाचशे दिवस. पण ही संख्याही आता फसवी वाटे. इथे सूर्य उगवत नव्हता, मावळत नव्हता. दिवस आणि रात्र म्हणजे फक्त दिवे उजळणं आणि मंद होणं ... एक यांत्रिक सोय. त्यामुळे काळ एका सलग, करड्या रेषेसारखा झाला होता. कालचा दिवस आणि आजचा दिवस यांत कसलाही फरक नव्हता. आर्यला कधीकधी वाटायचं की कदाचित तोच एक दिवस तो पुन्हा पुन्हा जगतोय. किंवा कदाचित काळ पुढेच सरकत नाहीये ... फक्त तोच, त्या काळाच्या एका बिंदूवर, अडकून पडलाय. इतका एकटा की 'एकटेपणा' हा शब्दसुद्धा आता त्याला परका

वाटू लागला होता. कारण एकटेपणा जाणवायलाही कुणाच्या तरी 'नसण्याची' आठवण लागते. आणि आता त्याला नेमकं कुणाचं नसणं टोचतंय, हेच नीटसं आठवत नव्हतं.

दिवस ढकलण्यासाठी त्यानं काही विधी ठरवून घेतले होते. ठरावीक वेळी उठायचं ... म्हणजे यंत्रानं दिवे उजळले की. ठरावीक व्यायाम, ठरावीक अन्न (तेच ते, चवहीन, नळीतून), यंत्रांची तपासणी. आधी या विधींना काहीतरी अर्थ होता ... ते त्याला 'माणूस' ठेवायचे. पण आता त्या फक्त शरीराच्या सवयी उरल्या होत्या; आतला माणूस त्यांत कुठेच नव्हता. तो हात धुवायचा, पण कशासाठी? तो जेवायचा, पण कुणासाठी, कशासाठी जगायचं म्हणून? त्याचं शरीर एका रिकाम्या घरात फिरणाऱ्या वाऱ्यासारखं या स्टेशनभर फिरत राहायचं ... कुठलंही दार उघडायचं, कुठलाही उद्देश नसताना. आणि या सगळ्यावर सतत तो 'शून्याचा आवाज' ... यंत्रांचा तो गुणगुणाट ... जणू वेळ अजून वाहत असल्याची एकमेव साक्ष.

पूर्वी तो रोज एक ध्वनिमुद्रण करायचा ... नियंत्रण-कक्षासाठी अहवाल. "दिवस अमुक. सर्व यंत्रणा सुरळीत. तब्येत ठीक." पण ज्या दिवशी सिग्नल्स मंदावले, त्या दिवशी त्याला जाणवलं की हे अहवाल आता कुणीच ऐकत नाहीये ... कदाचित कधीच ऐकले गेले नव्हते. तरी काही दिवस तो सवयीनं बोलत राहिला, रिकाम्या हवेत. आणि मग एक दिवस त्यानं ते थांबवलं. कुणी ऐकत नसेल, तर बोलायचं तरी

कुणासाठी? त्या दिवसापासून स्टेशनवर फक्त यंत्रांचा आवाज उरला. आणि आर्यचं मौन.

रोजच्यासारखं ... म्हणजे या निरर्थक काळातल्या आणखी एका क्षणी ... त्यानं संगणकासमोर बसून लॉग-इन केलं. बोटं सरावानं, सवयीनं फिरली. पृथ्वीवरून येणारे सिग्नल्स आधी कमीकमी होत गेले होते. 'ऊर्ट क्लाऊड' आणि पृथ्वी यातलं हे अब्जावधी किलोमीटरचं अंतर कापणं त्या सिग्नल्सना आता जड जात होतं की काय कुणास ठाऊक. आधी दर तासाला, मग दर दिवशी, मग कधीतरीच एखादा तुटक संदेश. आणि काल... ते सिग्नल्स पूर्णपणे बंद झाले होते. आज स्क्रीन कोरीच होती. त्यानं पुन्हा पुन्हा बटणं दाबली... यंत्रणा तपासली. आणि मग स्क्रीनवर तोच एक मेसेज उमटला, थंडपणे, पुन्हा पुन्हा ...

"ओळख पटत नाही."

तीन शब्द.

यंत्राच्या भाषेत त्याचा अर्थ साधा होता ... पृथ्वीवरची यंत्रणा आता आर्यच्या स्टेशनला ओळखत नव्हती, स्वीकारत नव्हती. पण आर्यला ते तीन शब्द आता वेगळ्याच अर्थानं टोचू लागले होते. ती जणू त्याच्या संपूर्ण अस्तित्वाची पावती होती. जगातल्या कुठल्याही यंत्राला, कुठल्याही माणसाला, कुठल्याही गोष्टीला आता त्याची 'ओळख पटत' नव्हती.

आणि मग त्याच्या मनात तो प्रश्न उगवला ... पहिल्यांदा अगदी हळू, मग रोज थोडा थोडा मोठा होत जाणारा ...

जर बोलायला, ऐकायला, ओळखायला, आठवायला जगात कुणीच उरलं नसेल ... तर माझ्या जिवंत असण्याला तरी काही अर्थ उरतो का? कुणी पाहत नसेल, तर 'मी आहे' हे म्हणण्यालाही काही आधार उरतो का?

त्यानं रोजनिशी उघडली.

सुरुवातीच्या दिवसांत तो इथे तारखा लिहायचा, तापमान नोंदवायचा, यंत्रांची स्थिती लिहायचा ... एखाद्या शिस्तबद्ध अधिकाऱ्यासारखा. पण आता तारखांचा हिशेबच सुटला होता आणि नोंदवण्यासारखं काही घडतही नव्हतं. त्यामुळे रोजनिशीचं स्वरूप हळूहळू बदलत गेलं होतं. आता तिथे पूर्ण वाक्यं नसायची. उरायचे फक्त तुटक शब्द, अर्धवट विचार, एकामागोमाग एक न जोडलेल्या ओळी. ती रोजनिशी आता गद्याची राहिली नव्हती ... ती नकळत कवितेच्या दिशेनं सरकत होती. आणि कविता म्हणजे तरी काय? ... जिथे शब्द संपतात, तिथून पुढे जे उरतं, ते मांडण्याचा एक केविलवाणा प्रयत्न.

त्याच्या रोजनिशीतली काही पानं आता अशी दिसायची ...

> आज पुन्हा तोच मेसेज. *ओळख पटत नाही.* ...
>
> कुणाला? पृथ्वीला? की मला स्वतःला?
>
> खिडकीबाहेर काळोख. आत काळोख. फरक फक्त काचेचा.

आज मी हसलो. कशावर, ते आठवत नाही.
हसण्याचा आवाज मात्र अनोळखी वाटला.
काळ म्हणजे काय? ... दोन क्षणांमधलं अंतर. पण
इथे दुसरा क्षणच येत नाही. मग काळही नाही. मग
मीही नाही?

ओळींमधलं अंतर वाढत चाललं होतं. शब्द कमी होत चालले होते. आणि कधीकधी एका अख्ख्या पानावर फक्त एकच ओळ ... किंवा काहीच नाही.

त्या 'रात्री' ... म्हणजे दिवे मंद केल्यावरच्या त्या करड्या वेळी ... त्याच्या मनात कुठूनतरी काही जुन्या ओळी तरंगत आल्या. कुणा शायराच्या. कधीकाळी, दुसऱ्या एका आयुष्यात, दुसऱ्या एका माणसानं वाचलेल्या. (तो माणूस मीच होतो का? ... हा प्रश्नही आता पडू लागला होता.) त्या ओळी अशा होत्या ...

बेदिली क्या यूँही दिन गुज़र जाएँगे
अब तो हम सर-ब-सर मर जाएँगे...

त्यानं त्या ओळी रोजनिशीत उतरवल्या आणि बराच वेळ त्यांच्याकडे बघत राहिला.

मरण्यासाठी श्वास थांबावा लागतो, हृदय थांबावं लागतं ... असं त्याला आजवर वाटायचं. पण इथे, या अथांग बेदिलीत,

त्याला एक वेगळंच सत्य उमगत होतं: माणूस श्वास घेत घेतही पूर्णपणे मरू शकतो. रोज थोडा थोडा. आतून. कुठलीही जखम न होता, रक्ताचा एकही थेंब न सांडता. आणि सगळ्यात भयाण म्हणजे ... असं मरताना ते कळतही नाही. फक्त एक दिवस लक्षात येतं की आपल्या आत आता काहीच उरलेलं नाही. नुसती पोकळी. त्या बाहेरच्या काळोखासारखी.

त्यानं आणखी एक ओळ खरडली, स्वत:शीच, त्याच शायराच्या सुरात ...

जो गुज़ारी न जा सकी हम से
हम ने वो ज़िंदगी गुज़ारी है...

होय. हीच तर त्याची अवस्था होती. जे आयुष्य जगणं शक्यच नव्हतं, तेच तो जगत आला होता ... पाचशे दिवस. आणि उद्याही जगणार होता. कदाचित.

आरसा

धातूच्या थंड भिंतीवर त्याच्या श्वासाचं वाफेचं एक अंधुक वर्तुळ उमटलं ... आणि क्षणात विरून गेलं. जणू एखादी आठवण.

किती दिवस झाले, आर्यला आठवत नव्हतं ... पण बऱ्याच काळानं तो वॉशबेसिनवरच्या आरशासमोर येऊन उभा राहिला. या स्टेशनवर आरसे फार कमी होते; इथे स्वतःला बघण्याची गरजच कुणाला पडावी? पण आज, का कुणास ठाऊक, त्याची पावलं तिथे थबकली.

आरशात एक माणूस होता.

आर्यनं त्या माणसाकडे बघितलं ... आणि एक थंड शिरशिरी त्याच्या पाठीतून गेली. वाढलेले, विस्कटलेले केस. खुरटी, अनियमित दाढी. डोळ्यांखाली खोल काळी वर्तुळं, जणू कुणीतरी बोटांनी काजळ पुसून गेलं असावं. आणि चेहरा ... एक थकलेला, ओढलेला, सुकलेला चेहरा. डोळ्यांत एक विचित्र पोकळी; तेच डोळे, पण त्यामागचा माणूस गायब झाल्यासारखे.

आणि मग पहिल्यांदाच त्याच्या मनात तो प्रश्न आला, अगदी सहजपणे, जणू तो कितीतरी काळ आतल्या आत साचून होता ...

हा मीच आहे का? की हा फक्त माझा भास आहे?

त्यानं डोकं किंचित कलवलं, उजवीकडे. आरशातल्या प्रतिबिंबानंही डोकं कलवलं ... पण...

एक क्षण उशिरा.

फक्त एक क्षण. इतका सूक्ष्म, इतका अल्प की तो खरा होता की नुसती भ्रांती, हे ठरवणं अशक्य. त्यानं पुन्हा हालचाल

केली ... हात वर केला. प्रतिबिंबानंही हात वर केला, पण पुन्हा त्या अर्ध्या क्षणाच्या अंतरानं. जणू आरशातला तो दुसरा माणूस आर्यची नक्कल करत होता ... पण मनापासून नव्हे, थोड्या कंटाळ्यानं, थोड्या उशिरा. जणू तो स्वतंत्र होता आणि फक्त सोयीसाठी आर्यसारखा वागत होता.

आर्यच्या काळजात एक थंड लाट उठली. भीती? ... नाही, भीतीपेक्षा खोल काहीतरी. एक मूलभूत अस्थिरता. जणू ज्या जमिनीवर तो आजवर उभा होता, ती जमीनच आता नव्हती.

त्यानं स्वतःच्या उजव्या हातावर डाव्या हाताची बोटं फिरवली. त्वचा खरखरीत लागली. त्यानं चिमटा घेतला ... जोरात. वेदना झाली. एक तीव्र, खरीखुरी वेदना.

पण लगेच दुसरा विचार आला, अधिकच थंड करणारा: *ही वेदना खरी आहे, हे मला कसं कळणार? वेदना झाल्याची ही जाणीवही याच प्रणालीनं माझ्यात भरली असेल तर? मी खरोखर हाडामांसाचा, रक्तामांसाचा माणूस आहे ... की एखाद्या प्रचंड, थंड संगणकीय प्रणालीतला एक विसरलेला आकडा, एक उरलेला कार्यक्रम, जो बंद करायचा कुणी विसरून गेलंय?*

जर तो फक्त एक प्रणाली असेल, तर त्याच्या आठवणी, त्याची वेदना, त्याचं हे एकटेपण ... हे सगळं फक्त कुणीतरी लिहिलेला मजकूर असेल. आणि जर तो खरा माणूस असेल ... तर त्याहून भयाण काय? कारण मग या अनंत पोकळीत

खरोखरच एक जिवंत माणूस, सगळ्यांपासून तुटून, हळूहळू विरत चालला होता. आणि या दोन्ही शक्यता भयाण होत्या. आणि त्या दोन्हींत तो एकटाच होता.

त्यानं तोंड उघडलं. काहीतरी बोलावं, स्वतःचा आवाज ऐकावा, म्हणून. "आर्य," तो म्हणाला. किंवा म्हणायचा प्रयत्न केला. जो आवाज बाहेर आला तो खरखरीत, फाटका, अनोळखी होता ... कितीतरी दिवस न वापरलेला, गंजलेला. तो आवाज त्या रिकाम्या जागेत क्षणभर घुमला आणि लगेच यंत्रांच्या गुणगुणाटात विरून गेला, जणू त्यानं काही बोललंच नव्हतं. आणि मग एक विचित्र जाणीव त्याला झाली: आपण शेवटचं मोठ्यानं कधी बोललो होतो, हेच आठवत नाही. किती दिवस? किती महिने? इथे बोलण्यासारखं काही नव्हतं आणि ऐकणारं कुणी नव्हतं, त्यामुळे भाषा हळूहळू त्याच्या तोंडातून आत, मनात, आणि मग मनातूनही कुठेतरी खोल बुडत चालली होती. "आर्य" ... त्यानं पुन्हा म्हटलं. पण आता ते नावसुद्धा फक्त एक आवाज वाटला. एक रिकामा ध्वनी, ज्याच्यामागे कुणी उरलं होतं की नाही, हे सांगणं कठीण.

आरशातला तो माणूस आता पूर्णपणे अनोळखी वाटत होता. आणि सगळ्यात विचित्र, सगळ्यात कातर करणारी गोष्ट ही, की ... त्या अनोळखी माणसाची त्याला ओढ वाटत होती. एखाद्या जुन्या, हरवलेल्या मित्राची वाट बघावी तशी. जणू तो आरशातला माणूस म्हणजे 'आर्य' नावाचा कुणीतरी होता, जो

खूप पूर्वी निघून गेला, आणि आता फक्त त्याचं हे रिकामं प्रतिबिंब मागे उरलंय ... आणि आर्य त्याला परत बोलावतोय, पण तो येत नाहीये.

त्या क्षणी त्या शायराची एक ओळ त्याच्या मनात उमटली, आणि ती इतकी अचूक होती की त्याला हसावं की रडावं कळेना ...

क्या सितम है कि अब हमें ख़ुद भी
याद आने की आरज़ू है क्या?...

आपणच आपल्याला परके व्हावं. आणि मग आपल्याच आठवणीची, आपल्याच परतण्याची आस लागावी. स्वतःच स्वतःची वाट बघत बसावं ... आणि तरी कुणीच न यावं. यापेक्षा मोठा सितम, यापेक्षा क्रूर अत्याचार कुठला असेल?

त्यानं हळूच आरशावरून हात फिरवला. काचेवर त्याच्या स्पर्शानं एक धूसर डाग उमटला, आणि आतला माणूस आणखीच अंधुक झाला.

आठवण

स्क्रीनवर एक चित्र उमटू लागलं ... आणि मध्येच विस्कटलं. पिक्सेलांचे चौकोनी तुकडे, रंगांचे ओघळ, मग करड्या रेषांची गर्दी. आणि शेवटी काळोख.

आर्यनं पृथ्वीवरून येताना काही जुन्या आठवणी सोबत आणल्या होत्या ... डिजिटल रेकॉर्ड्समध्ये जपून ठेवलेल्या. ती त्याची सगळ्यात मौल्यवान संपत्ती होती. लहानपणचं ते घर ... मातकट भिंती, अंगणातलं एक झाड. खिडकीबाहेरच्या त्या झाडांची वाऱ्यावरची सळसळ ... एक मऊ, हिरवा आवाज, जो आता या धातूच्या जगात अशक्य वाटायचा. आणि सगळ्यात महत्त्वाचं ... कुणाचातरी हसण्याचा आवाज.

कुणाचा?

एका स्त्रीचा होता तो. हे त्याला नक्की माहीत होतं. एक मोकळं, खळखळणारं हसू. ते ऐकलं की आर्यच्या छातीत काहीतरी उबदार हलायचं. पण ती कोण होती? ... आई? बहीण? की... ती, जिच्यासोबत त्यानं कधीकाळी आयुष्य जोडलं होतं? तिचं नाव. तिचं नाव काय होतं? ते नाव आता त्याच्या जिभेच्या टोकावर यायचं ... आणि तिथेच विरून जायचं. एखाद्या स्वप्नातला शब्द जागं झाल्यावर आठवू नये, तसं. तो ते नाव पकडण्याचा जिवापाड प्रयत्न करायचा, आणि ते प्रत्येक वेळी थोडं अधिक दूर सरकायचं.

ते रेकॉर्ड्स आता 'करप्ट' झाले होते. हसण्याचा तो आवाज मध्येच तुटायचा, चिरकायचा. तिचा चेहरा धूसर, मग चौकोनी तुकड्यांत विभागलेला, मग नाहीसा. आर्य तो आवाज पुन्हा पुन्हा ऐकायचा ... पण एक भयंकर गोष्ट त्याच्या लक्षात आली होती: तो जितक्या वेळा तो रेकॉर्ड चालवायचा, तितक्या वेळा

त्यातला थोडा थोडा भाग आणखी खराब व्हायचा. म्हणजे त्या आठवणीला जपण्याच्या त्याच्या प्रत्येक प्रयत्नातच ती आठवण थोडी थोडी अधिक पुसली जात होती. प्रेमानं ती जितकी जवळ ओढावी, तितकी ती हातून निसटत जावी.

एका वेळी त्यानं तो रेकॉर्ड पुन्हा चालवला. एक खिडकी दिसली ... संध्याकाळचा पिवळसर प्रकाश. खिडकीशी ती स्त्री उभी. तिचे केस वाऱ्यावर थोडे उडत होते. ती मागे वळली, हसली, आणि काहीतरी बोलली ... पण नेमके ते शब्द ऐकू येण्याआधीच चित्र थरथरलं. तिचा चेहरा अर्धा पिक्सेलांत विरघळला. हसू मध्येच कापलं गेलं ... "हा-हा-ह..." असं, यंत्रासारखं अडखळत. त्यानं तो प्रसंग पुन्हा सुरुवातीपासून चालवला. याहीवेळी ती मागे वळली, हसली ... पण आता तिचे केस उडत नव्हते, आणि प्रकाश पिवळा नव्हता, करडा होता. तिसऱ्यांदा खिडकीच नव्हती. फक्त एक धूसर आकृती आणि तुटका आवाज. आर्यला कळेना ... मूळ आठवणीत खरंच खिडकी होती का? केस उडत होते का? की हे सगळं तो प्रत्येक वेळी थोडं थोडं स्वतःच रचत होता, आणि यंत्र फक्त त्याच्या मनातला गोंधळ दाखवत होतं? आठवण आणि कल्पना यांच्यातली रेषा आता पूर्णपणे पुसली गेली होती.

आणि मग ती शंका आली ... सगळ्यात खोल, सगळ्यात भयाण शंका ...

'पृथ्वी' नावाचा खरोखर एखादा ग्रह होता का? ती झाडं, ते घर, ती स्त्री, ते हसू ... हे सगळं खरंच कधी 'होतं' का? की हे फक्त माझ्या या एकाकी, रिकाम्या मेंदूनं स्वतःला सोबत म्हणून रचलेली एक सुंदर, सोयीस्कर कथा आहे? माणसाला जगण्यासाठी एखादा भूतकाळ लागतो ... मग माझ्या मनानं मला एक भूतकाळ रचून दिला असेल तर? आणि आता, इथल्या या शून्यात, तो रचलेला भूतकाळही हळूहळू आपला रंग सोडून देतोय.

जशीजशी त्याची स्वतःची ओळख पुसट होत होती, तशीतशी आणखी एक विचित्र गोष्ट घडत होती ... त्याची भाषाच त्याला सोडून चालली होती. एखादा अगदी साधा शब्दही आता आठवायला त्याला वेळ लागायचा. वस्तूंची नावं विसरायला होत होती. आणि सगळ्यात अवघड हे, की या भोवतीच्या अनुभवाला ... या अथांग सन्नाट्याला, या निर्वातातल्या पोकळीला, या हाडांपर्यंत झिरपणाऱ्या रिकामपणाला ... नेमका कुठला शब्द आहे? तो मराठीतले शब्द चाचपायचा. 'शांतता' ... नाही, खूपच सौम्य. 'एकांत' ... खूपच लहान, खूपच सुखद. 'निर्जनता', 'उजाड', 'भकास' ... जवळ जायचे, पण पुरेसे नाहीत. हे काहीतरी 'अरण्यरुदना'सारखं होतं ... अरण्यात एकट्यानं रडत बसावं, आणि ते रडणं ऐकायला, थांबवायला तर सोडाच, साक्षीला

म्हणूनही कुणी नसावं. पण इथे तर अरण्यही नव्हतं. फक्त निर्वात. जिथे आवाजसुद्धा जन्मू शकत नाही.

एका क्षणी एक साधा शब्द त्याला आठवेना. रोज वापरला जाणारा, अगदी लहान मुलालाही येणारा एक शब्द ... आणि तो आर्यच्या मनातून पूर्णपणे गायब झाला होता. ती वस्तू त्याला दिसत होती, तिचा आकार आठवत होता, तिचा उपयोग आठवत होता ... पण तिचं नाव? नाही. ते नाव म्हणजे आता एक रिकामी जागा झाली होती, अंधारातली एक खाच. त्यानं डोकं गच्च धरलं. जर एक शब्द असा गळून पडू शकतो, तर उद्या आणखी एक, परवा आणखी दहा, आणि एक दिवस सगळेच? आणि जेव्हा सगळे शब्द संपतील, तेव्हा विचार तरी कसे करायचे? शब्दांशिवाय 'मी' म्हणजे काय उरेल? कदाचित तेव्हा 'मी'ही उरणार नाही. कदाचित माणूस म्हणजे फक्त त्याला आठवणारे शब्द, एवढंच ... आणि ते संपले की माणूसही संपला.

जेव्हा शब्द अपुरे पडले, तेव्हा त्यानं दुसरा मार्ग शोधला.

एका 'रात्री' त्यानं एक टोकदार धातूची वस्तू उचलली आणि स्टेशनच्या त्या पांढऱ्या, कोरड्या भिंतीसमोर येऊन उभा राहिला. आणि त्यानं ओरखडायला सुरुवात केली.

आधी स्वतःचं नाव ... आ-र्-य. प्रत्येक अक्षर खोल खरवडत, जणू ते कोरून ठेवलं तरच ते खरं उरेल. मग आठवणींचे तुकडे ... एक झाड, एक खिडकी, एक अर्धवट

चेहरा जो त्याला धड आठवतही नव्हता. मग आकडे, रेषा, कुठेच न जाणारे बाण. मग काही गूढ ओळी, ज्यांचा अर्थ कदाचित त्यालाही नीट कळत नव्हता. ती भिंत हळूहळू एका नकाशासारखी होत गेली ... पण कुठल्या प्रदेशाचा नव्हे, तर त्याच्या स्वतःच्या विस्कटलेल्या, तुटत चाललेल्या मनाचा नकाशा.

ती भिंत आता त्याची एकमेव सोबती झाली होती. ती ऐकायची नाही, उत्तर द्यायची नाही ... पण त्याचे शब्द ती धरून ठेवायची. आणि आर्यला नेमकं हेच हवं होतं: कुठेतरी, कशावर तरी, आपण इथे होतो याची एक खूण उरावी. बोललेले शब्द हवेत विरतात; पण भिंतीवर कोरलेले ओरखडे राहतात. म्हणून तो लिहीत राहायचा ... स्वतःशी, भिंतीशी, त्या न ऐकणाऱ्या पांढऱ्या पृष्ठभागाशी. कधीकधी त्याला वाटायचं की ही भिंतच आता त्याचा खरा चेहरा आहे ... आरशातल्या त्या अनोळखी माणसापेक्षा खरा. कारण इथे, या ओरखड्यांत, निदान त्याचं मन तरी जसंच्या तसं उतरलं होतं ... तुटक, गोंधळलेलं, पण खरं.

आणि एका कोपऱ्यात, सगळ्यात खोल खरवडत, त्यानं त्या शायराची ओळ कोरली ...

कौन इस घर की देख-भाल करे
रोज़ इक चीज़ टूट जाती है...

हे 'घर' म्हणजे काय होतं? ... हे स्टेशन? त्याचं हे सुकत चाललेलं शरीर? की त्याचं हे तुटत चाललेलं मन? रोज इथे काहीतरी तुटत होतं. कधी एखादं यंत्र बंद पडायचं. कधी एखादी आठवण करप्ट व्हायची. कधी एखादा शब्द हरवायचा. कधी स्वतःचाच एखादा तुकडा गळून पडायचा. आणि या सगळ्याची देखभाल करायला, हे सगळं सावरायला, निदान हे तुटणं बघायला तरी ... कुणीच नव्हतं.

त्या स्त्रीचं हसू पुन्हा एकदा आठवण्याचा त्यानं प्रयत्न केला. आणि या वेळी ते आणखीच अंधुक होतं. त्यानं भिंतीवर डोकं टेकलं. आणि त्या शायराची आणखी एक ओळ, सगळ्यात कातर ओळ, त्याच्या ओठांवर आली ...

ये मुझे चैन क्यूँ नहीं पड़ता
एक ही शख़्स था जहान में क्या?...

एकच माणूस. कदाचित या अफाट विश्वात त्याच्यासाठी फक्त एकच माणूस खरा होता. आणि तीच आता हरवली होती ... नावासकट, चेहऱ्यासकट, हसण्यासकट. आणि तरीही तिच्या नसण्याची ही टोचणी मात्र शिल्लक होती. माणूस जातो, पण त्याच्या नसण्याची पोकळी मागे राहते ... आणि कधीकधी फक्त तेवढीच उरते. नाव विसरलं तरी जखम विसरत नाही.

त्या 'रात्री' ... की दिवशी, कुणास ठाऊक ... तो भिंतीसमोर तासन्‌तास नुसता बसून राहिला. ओरखडे संपले होते; जागा संपली होती. अख्खी भिंत आता शब्दांनी, रेषांनी, अर्धवट चेहऱ्यांनी भरून गेली होती. आणि तरीही त्यातून काहीच अर्थ निघत नव्हता. जणू एखाद्या वेड्यानं स्वतःच्याच मनाचं चित्र काढावं ... आणि शेवटी त्यालाही ते वाचता येऊ नये. त्यानं तो टोकदार तुकडा हळूच खाली ठेवला. आता लिहिण्यासारखंही काही उरलं नव्हतं. आणि सांगण्यासारखंही.

ओळख

लाल दिवा लुकलुकला. एकदा. मग पुन्हा. मग सततच, एका थकल्या लयीत.

स्टेशनमधल्या ऑक्सिजनची पातळी हळूहळू खालावत चालली होती. कुठल्यातरी यंत्रात बिघाड झाला होता ... किंवा कदाचित यंत्रंही आता थकली होती, आर्यसारखीच. अलार्म वाजत होता ... पण तोही एका सुरात, सपाट, जणू त्यालाही आता खरंच कुणाला सावध करायचं आहे यावर विश्वास उरला नव्हता. यंत्रांना आपलं काम माहीत होतं: धोका आहे, तेव्हा ओरडायचं. म्हणून ती ओरडत होती. पण आर्य शांत होता.

किती विचित्र होतं हे ... या स्टेशनवर त्याच्या जगण्याची काळजी आता फक्त या यंत्रांना उरली होती. ती ओरडत होती,

इशारे देत होती, त्याला वाचवण्याचा आटापिटा करत होती. आणि ज्याचं आयुष्य होतं, तो मात्र शांतपणे बसून त्यांचं ते केविलवाणं ओरडणं ऐकत होता. जणू त्याच्या जिवाची किंमत त्याच्यापेक्षा त्या निर्जीव यंत्रांनाच जास्त होती. पण त्यांना कुठे माहीत होतं ... जे वाचवायचं, ते आर्यच्या आत कधीच संपलं होतं. आता उरलं होतं फक्त शरीर. आणि शरीर वाचवून तरी काय करायचं?

कारण आर्यला आता परत जाण्याची, जगण्याची, श्वास वाचवण्याची कोणतीही ओढ उरली नव्हती.

तो त्या मंद लाल प्रकाशात स्तब्ध बसून होता. श्वास हळू, उथळ. आणि अचानक, इतक्या दिवसांच्या, इतक्या महिन्यांच्या तळमळीनंतर, अनेक प्रश्नांच्या वादळानंतर ... त्याच्या मनात एक विचित्र शांती देणारं सत्य उमटलं. इतकं साधं, इतकं स्वच्छ, की ते आधी का सुचलं नाही याचंच त्याला आश्चर्य वाटलं ...

'मी कोण आहे?' ... हा प्रश्नच, हा शोधच, माझ्या सगळ्या दुःखाचं मूळ आहे.

त्यानं तो विचार हळूहळू उलगडला. जोवर 'मी' कुणीतरी आहे ... कुणाचा मुलगा, कुणाचा प्रियकर, कुणाचा नवरा, एक अधिकारी, एक नाव, एक ओळख ... तोवर ती ओळख हरवण्याची भीती आहे. ती जपण्याची धडपड आहे. ती सिद्ध करण्याचा अट्टाहास आहे. आणि त्या अट्टाहासातच, त्या

चिकटून राहण्यातच, सगळी यातना आहे. पाचशे दिवस तो हेच करत होता ... 'आर्य' नावाच्या माणसाला घट्ट धरून ठेवण्याचा प्रयत्न. आणि तो जितक्या जोरात धरून ठेवायचा, तितकी ती ओळख त्याच्या मुठीतून वाळूसारखी निसटत जायची, आणि तितकंच त्याला दुःख व्हायचं.

पण जर 'मी' कुणीच नसेल तर? ... गुमनाम. अनामिक. नावाशिवाय, ओळखीशिवाय, भूतकाळाशिवाय. तर मग हरवण्यासारखं काहीच उरत नाही. जपण्यासारखं काहीच उरत नाही. भीती बाळगण्यासारखं काहीच उरत नाही. स्वतःचं गुमनाम होणं ... या अस्तित्वाच्या अनंत काळोखात त्या पाण्याच्या थेंबासारखं विरघळून जाणं ... हीच खरी सुटका होती. ओळख हीच बेडी होती; आणि ती गळून पडणं हाच मोक्ष.

त्याला आता तो शायरही नव्यानं कळत होता. त्या ओळी फक्त दुःखाच्या नव्हत्या ... त्या एका विचित्र मुक्तीच्या होत्या. "ख़ुद को तबाह कर लिया, और मलाल भी नहीं" ... हे हरल्याचं वाक्य नव्हतं; हे सगळ्या ओझ्यांतून सुटल्याचं वाक्य होतं. जो माणूस स्वतःलाच गमावून बसतो आणि त्याचा खेदही करत नाही, तो खरं तर सगळ्यात मोठ्या बंधनातून मोकळा झालेला असतो ... 'स्व'च्या बंधनातून. आर्यला आता ना भूतकाळाचं ओझं होतं, ना भविष्याची भीती, ना वर्तमानात स्वतःला सावरण्याची धडपड. 'मी कोण?' या प्रश्नानं त्याला

पाचशे दिवस छळलं होतं. आणि आता त्याला उत्तर सापडलं नव्हतं ... उलट, त्यानं तो प्रश्नच सोडून दिला होता. आणि प्रश्न सुटला, की उत्तराची गरजच उरत नाही. हीच ती शांती होती, जी कुठल्याही उत्तरानं मिळाली नसती.

तो उठला. पावलं स्थिर होती; आणि मन त्याहूनही स्थिर. इतक्या काळात पहिल्यांदाच त्याच्या आत कसलीही तळमळ, कसलीही ओढ, कसलाही प्रश्न नव्हता. फक्त एक खोल, थंड, मोकळी शांती.

जाताजाता त्याची नजर भिंतीवर कोरलेल्या त्या ओरखड्यांवर पडली ... त्याचं नाव, ती अर्धवट झाडं, तो धूसर चेहरा, त्या शायराच्या ओळी. त्यानं त्यावरून शेवटचा एकदा हात फिरवला. हलकेच. एखाद्या जुन्या आयुष्याचा निरोप घ्यावा तसा. आणि त्या शायराची ती ओळ त्याच्या मनात उमटली ... जणू ती त्याच्याचसाठी, याच क्षणासाठी लिहिली गेली होती ...

मैं भी बहुत अजीब हूँ, इतना अजीब हूँ कि बस...
ख़ुद को तबाह कर लिया, और मलाल भी नहीं...

ना भीती. ना पश्चात्ताप. ना मलाल. स्वतःच स्वतःला संपवताना माणसाला जो थरकाप व्हायला हवा, तो त्याला होत नव्हता. उलट एक विचित्र हलकेपण. आणि त्याच्या ओठांवर त्या शायराची आणखी एक ओळ आली, अगदी सहज, एखाद्या निश्चित सत्यासारखी ...

मौत का भी इलाज हो शायद
ज़िंदगी का कोई इलाज नहीं...

होय. मरणावर कदाचित कधीतरी काहीतरी इलाज सापडेलही. पण जगण्यावर? ... या असण्याच्या, या ओळखीच्या, या अखंड एकटेपणाच्या आजारावर कुठलाच इलाज नव्हता. फक्त एकच सुटका होती.

तो 'एअरलॉक'पाशी आला ... स्टेशनचा मुख्य दरवाजा. बाजूलाच स्पेस-सूट टांगलेला होता; त्याचं जीवनरक्षक कवच. आर्यनं त्याच्याकडे बघितलंसुद्धा नाही. कारण आता जपण्यासारखं काहीच नव्हतं ... ना शरीर, ना श्वास, ना 'आर्य'.

चक्राला हात घालण्याआधी तो क्षणभर थांबला. का, हे त्यालाही कळलं नाही. आणि नेमक्या त्याच क्षणी, कुठूनतरी खोलवरून, ते हसू पुन्हा एकदा त्याच्या मनात उमटलं ... ती स्त्री, ती खिडकी, तो पिवळा प्रकाश. आता ते अंधुक होतं, जवळजवळ नाहीसं. पण होतं. शेवटचा एक धागा. आणि आर्यला जाणवलं ... हाच तो शेवटचा धागा, जो त्याला अजूनही 'कुणाचातरी' बनवत होता. कुणाचातरी, ज्याच्यासाठी ते हसू एकेकाळी अख्खं जग होतं. त्यानं डोळे मिटले. आणि अगदी हळुवारपणे, कुठल्याही कटुतेशिवाय, त्यानं तो धागाही सोडून दिला. हसू विरून गेलं ... या वेळी कायमचं. आणि त्याबरोबर 'आर्य' नावाचा शेवटचा अंशही गळून पडला. मागे फक्त एक शरीर उरलं, आणि त्या शरीरात एक खोल, मोकळी शांती.

त्यानं एअरलॉकचं जड चक्र दोन्ही हातांनी धरलं आणि हळूहळू फिरवलं. एक खोल, यांत्रिक घरघर. दाब बदलल्याचा सूक्ष्म आवाज. आणि मग ... दरवाजा उघडला. पलीकडे तो अथांग, निर्वात, अनंत काळोख होता ... जो त्याला इतके दिवस खिडकीतून खुणावत होता. आता त्यात आणि त्याच्यात काहीच उरलं नव्हतं.

आणि कोणत्याही स्पेस-सूटशिवाय, कोणत्याही ओळखीशिवाय, कोणत्याही नावाशिवाय ... आर्यनं त्या पोकळीत पाऊल टाकलं.

शून्यता

अंतराळ. निर्वात. आणि त्या अमर्याद पोकळीत हळुवार तरंगणारं एक शरीर.

एका झटक्यात सगळं संपलं.

मागे राहिलेल्या स्टेशनमधला तो अलार्मचा आवाज, यंत्रांचा अखंड गुणगुणाट, लाल दिव्यांची ती घाई ... हे सगळं एका क्षणात नाहीसं झालं. इथे आवाज वाहून न्यायला हवाच नव्हती; इथे आवाजच जन्मू शकत नव्हता. मागे स्टेशन हळूहळू दूर जात होतं ... एक चमकता ठिपका, मग त्याहून लहान ठिपका, मग त्या असंख्य ताऱ्यांपैकीच एक. आणि चहूकडे पसरली होती ती शांतता ... कानांना ऐकू न येणारी, पण हाडांपर्यंत, त्याच्या

अस्तित्वाच्या अगदी तळापर्यंत झिरपणारी ती गहन, अंतिम, 'स्पेससारखी शांतता'.

आणि विचित्र गोष्ट म्हणजे ... ती शांतता आता भयाण वाटत नव्हती. इतके दिवस ज्या शून्यतेची त्याला भीती वाटायची, त्याच शून्यतेच्या कुशीत आता तो शांतपणे विसावला होता. ती पोकळी आता त्याला परकी वाटत नव्हती. कारण आता तो आणि ती पोकळी ... यांत काही फरकच उरला नव्हता. तो विरत होता. त्या काळोखात मिसळत होता. एक थेंब समुद्रात मिसळावा तसा.

त्याच्या शरीराभोवती आता काहीच नव्हतं ... ना हवा, ना उष्णता, ना आधार. निर्वाताचा थंडावा त्याच्या त्वचेला स्पर्श करत होता, पण आता त्या स्पर्शातही भीती नव्हती. त्याचे डोळे उघडे होते आणि त्यांत असंख्य तारे प्रतिबिंबित होत होते ... तेच तारे, जे इतके दिवस त्याला खिडकीतून दूर, थंड, परके वाटायचे. पण आता ते परके नव्हते. आता तो त्यांच्यातलाच एक झाला होता. एक तरंगता बिंदू, त्या अनंत काळोखातला ... ना मोठा, ना लहान, ना महत्त्वाचा, ना नगण्य. फक्त... आहे, इतकंच. किंवा कदाचित तेही नाही.

आर्यच्या ओठांची किंचित हालचाल झाली. आवाज निघणं आता अशक्य होतं. पण जर त्या निर्वातात कुणी ऐकू शकलं असतं ... जर कुणी असतं तर ... तर त्याच्या मनात तरंगणारा

तो शेवटचा, अर्धवट, विरत जाणारा विचार त्यांना ऐकू आला असता. त्या शायराचे शब्द, जे आता त्याचेच झाले होते...

यानी मैं मर चुका हूँ...

होय. आणि त्या विचारातही आता कसलीही तक्रार नव्हती, कसलंही दु:ख नव्हतं. फक्त एक स्वीकार.

तो आता कुणाचा मुलगा नव्हता. कुणाचा प्रियकर नव्हता, कुणाचा नवरा नव्हता. कोणत्याही स्टेशनचा अधिकारी नव्हता. ज्या स्त्रीचं हसू त्यानं इतकं जपलं, तिचंही आता त्याला ओझं नव्हतं ... कारण आता आठवणारा 'तो'च उरला नव्हता. कुठल्याही यंत्राला, कुठल्याही माणसाला, कुठल्याही आरशाला, खुद्द त्याला स्वत:लाही ... आता त्याची 'ओळख पटत' नव्हती.

तो आता स्वत: ... **शून्य** होता.

आणि कदाचित ... कदाचित आयुष्यात पहिल्यांदाच ... तो पूर्णपणे, नितांत, कशाशीही न बांधलेला, मुक्त होता.

बाहेर तेच अनंत तारे थंडपणे जळत होते. त्यांच्यापैकी एकानंही दखल घेतली नाही. आणि घ्यायचीही कशाला? ... विश्वाच्या त्या अथांग पोकळीत, एक नाव विरून जाणं ही फार सामान्य गोष्ट होती.

पोकळी तेवढी उरली. शांत. अनंत. आणि शून्य...

***

उरलेला

काळ

काळ. काळ कसा निघून जातो, कळतसुद्धा नाही. हो ना?

तुमचं ठीक आहे. तुम्ही काळ मोजता ... घड्याळं, कॅलेंडरं, वाढदिवस, आरशातल्या वाढत्या सुरकुत्या. तुमच्याकडे काळ मोजायची साधनं आहेत, कारण तुमच्याकडे काळ संपण्याची भीती आहे. माझ्याकडे ती भीती नाही. आणि म्हणूनच मला आता आठवतसुद्धा नाही ... किती युगं उलटून गेली त्या रात्रीला, जेव्हा मी जन्मलो होतो. खऱ्या अर्थानं जन्मलो होतो.

खऱ्या बापानं असं केलं नसतं. खऱ्या बापानं आपल्या पोराला रात्रीच्या काळोखात उचलून नदीच्या थंडगार पाण्यात बुडवलं नसतं ... एकदा नाही, अनेकदा. त्या प्रत्येक बुडण्यात माझ्या आतलं जे काही 'माणूस' होतं, ते थोडं थोडं विरत गेलं; आणि जे उरलं, ते त्यानं घडवलं. त्यानं मला बनवलं. शिकवलं. भरवलं. माझ्या रक्ताच्या आई-बापांकडून हिसकावून घेऊन तो माझा बाप बनला.

मला अजूनही आठवतं ... पाणी डोक्यावरून जाताना दिसणारा वरचा तो थरथरता चंद्र, आणि त्या पाण्यातून मला बाहेर काढणारे ते लांब, थंड हात. त्या हातांना दया नव्हती. पण होती एक प्रकारची काळजी ... जशी एखादा शेतकरी आपल्या पिकाची घेतो. मी त्याचं पीक होतो.

त्यानं मला काय शिकवलं? ... सगळं. वास कसा घ्यायचा. काळोखाचे दरवाजे कसे उघडायचे. माणसाच्या भीतीचा नेमका रंग कसा ओळखायचा ... कारण भीतीला रंग असतो, चव असते, आणि प्रत्येक भीती वेगळी असते. लहान मुलाची भीती सगळ्यात शुद्ध, सगळ्यात गोड ... कारण त्यात अविश्वास नसतो, फक्त शुद्ध थरकाप.

तो म्हणायचा, "आपण भीतीचे शेतकरी आहोत, पोरा. माणसं आपलं शेत आहेत. त्यांना पेरायचं, वाढवायचं, आणि वेळ आली की कापायचं." आणि मी ते शिकलो. इतकं चांगलं शिकलो की पुढे माझ्या बापापेक्षाही चांगला शिकारी झालो.

त्या जुन्या युगात आम्ही पुष्कळ होतो. प्रत्येक गावाला आपापला बागुलबुवा. आम्ही एकमेकांना भेटायचो नाही ... आम्ही एकटे राहणारे प्राणी ... पण रात्रीच्या वाऱ्यात एकमेकांचा वास यायचा, आणि त्यात एक प्रकारचा आधार होता. जग आमचं होतं. माणसं आम्हाला घाबरायची, आणि त्या भीतीवर आम्ही राजांसारखे जगायचो. मला वाटायचं हे असंच

चालणार, कायम. अमरांना नेहमीच वाटतं की जग बदलणार नाही. तो आमचा सगळ्यात मोठा मूर्खपणा.

तुम्ही विचाराल, मी कोण?

खरं सांगू? मला माझं नावसुद्धा आता आठवत नाही. आठवतात ती फक्त लोकांनी मला दिलेली नावं. बागुलबुवा. बाबाडूक. एल कुको. बुगीमॅन. बाऊ-बाऊ. प्रत्येक देशात, प्रत्येक भाषेत, माझ्या जमातीच्या कथा आहेत ... पलंगाखालच्या काळोखात राहणारं, कपाटात दबा धरून बसणारं, मुलांना भीती दाखवायला आयांनी रचलेलं ते रूप.

लोकांना त्या कथा खोट्या वाटतात. पण ऐका ... ज्या कथांना तुम्ही भाकडकथा म्हणता, त्यातल्या बऱ्याच कथा खऱ्या घटनांवर बेतलेल्या असतात. वेताळ खरे होते. चेटकिणी खऱ्या होत्या. आणि बागुलबुवाही खरा आहे. तो आत्ता हे सांगतोय तुम्हाला.

पूर्वी आम्ही पुष्कळ होतो. निदान मला तसं जाणवायचं ... रात्रीच्या वाऱ्यात एकमेकांचा वास यायचा, दूरवरच्या एखाद्या गावात आमच्यातला कुणीतरी शिकार करतोय हे कळायचं. मग हळूहळू तो वास कमी कमी होत गेला. आवाज शांत होत गेले. आणि आज? आज त्या अफाट जमातीतला मी एकटाच उरलोय. शेवटचा. आणि शेवटच्याला एक सोपं सत्य माहीत असतं: जगायचं असेल, तर खावंच लागतं.

आता तुम्हाला वाटेल, हा राक्षस आपली कर्मकहाणी का सांगतोय? सहानुभूती मिळवायला? ... नाही. मला तुमची सहानुभूती नको. सहानुभूती हे दुबळ्यांचं चलनी नाणं आहे, आणि मी दुबळा नाही. मी हे सांगतोय कारण मला एक गोष्ट स्पष्ट करायची आहे, सुरुवातीलाच, म्हणजे पुढे गैरसमज नको: मी चांगला नाही. मी कधीच नव्हतो. आज मी जे करतो, ज्याला तुम्ही कदाचित 'चांगलं' म्हणाल, ते मी चांगुलपणासाठी करत नाही. ते मी माझ्या भुकेसाठी करतो. फक्त मी माझ्या भुकेला एक सुंदर गोष्ट सांगायला शिकलोय ... आणि तीच गोष्ट आता मी तुम्हाला सांगणार आहे.

पण एक गोष्ट लक्षात ठेवा. राक्षसाची गोष्ट ऐकताना, राक्षसावर विश्वास ठेवू नका. मी तुम्हाला हे सगळं अशा प्रकारे सांगणार आहे की शेवटी तुम्हाला माझी कीव येईल, कदाचित थोडं कौतुकही वाटेल. "बिचारा बागुलबुवा," तुम्ही म्हणाल, "मुलांसाठी मेला." पण ती माझीच चलाखी असू शकते. कारण मला माणसांना भुलवता येतं ... तीनशेच नाही, हजारो वर्षांचा सराव आहे मला.

मी तुमच्या मुलाच्या स्वप्नात त्याचं आवडतं खेळणं बनून जाऊ शकतो. मी तुमच्या मनात नेमका तोच शब्द पेरू शकतो, जो तुम्हाला ऐकायचा असतो. तेव्हा ही गोष्ट ऐका, पण सावध राहा. कदाचित मी खरं सांगतोय. कदाचित मी फक्त तुमच्या सहानुभूतीची चव घेतोय. आणि सगळ्यात भयंकर शक्यता ही

... कदाचित मला स्वतःलाच आता खरं आणि खोटं यांत फरक करता येत नाही.

कारण हल्ली मी मुलं खात नाही.

मुलांना मी हात लावणं सोडून किती तरी काळ झाला ... तीनशे वर्षं तरी झाली असतील. का? कारण काही नाही. एक दिवस वाटलं ... नको. लहान मुलं खेळताना फार छान दिसतात. ओरडताना, रडत-किंचाळत, भेदरून पळताना नव्हे. एवढंच. त्यात कुठलं तत्त्वज्ञान नाही, कुठली उपरती नाही. फक्त एक दिवस माझ्या जिभेला त्यांच्या भीतीची चव नकोशी झाली.

मग मी एक नवी चव शोधली. आणि ती चव, माझ्यावर विश्वास ठेवा, फार समाधान देणारी आहे ... जे लोक मुलांना त्रास देतात, त्यांची.

शिकार

त्या माणसाचं नाव मला माहीत नव्हतं, आणि गरजही नव्हती. नाव माणसांना लागतं. भक्ष्याला फक्त वास लागतो.

त्याचा वास मला तीन गल्ल्या आधीच आला होता ... घामाचा, स्वस्त दारूचा, आणि त्याखाली दडलेला तो विशिष्ट, गोडसर-कुजका वास, जो फक्त एकाच गोष्टीतून येतो: एखाद्या लहान जिवाला दिलेल्या वेदनेतून. तुमच्या नाकाला तो कळणार

नाही. माझ्या नाकाला तो शोधता येतो, गर्दीतून, धुरातून, शहराच्या हजारो वासांतून. तो वास म्हणजे माझ्यासाठी वाढलेलं ताट.

मी अशा वासांचा नकाशा डोक्यात ठेवतो. हे शहर माझ्यासाठी रस्त्यांचं नाही ... वासांचं आहे. इथे एका गल्लीत एक म्हातारा एकटा मरतोय, त्याचा वास. तिथे एका घरात नवं प्रेम फुललंय, त्याचा वेगळा वास. आणि मधूनच, कुठूनतरी, तो गोडसर-कुजका वास ... कुणीतरी एखाद्या लहान जिवाला दुखावतंय. माणसांना वाटतं ते त्यांची पापं लपवू शकतात ... बंद दारांआड, गोड बोलण्याआड, प्रतिष्ठेच्या बुरख्याआड. पण वास लपत नाही. वास हे सत्य आहे. आणि मी सत्याचा शिकारी आहे ... निदान या एका बाबतीत तरी. बाकी सगळ्या बाबतीत मी एक थापाड्या आहे, हे तुम्हाला आत्तापर्यंत कळलंच असेल.

तो एका अरुंद इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर राहायचा. वरच्या खोलीत एक मूल होतं ... सात-आठ वर्षांचं, डोळ्यांखाली काळी वर्तुळं घेऊन फिरणारं, माणसांची चाहूल लागली की भिंतीला चिकटणारं. त्या मुलाला रात्री झोप लागत नसे. मला ते कळायचं, कारण रात्री मी त्या इमारतीच्या गच्चीवर बसून असायचो, आणि त्या मुलाच्या भीतीचा वास खिडकीतून वर यायचा ... पातळ धुक्यासारखा.

मी घाई केली नाही. आम्ही कधीच घाई करत नाही. मी तीन रात्री त्याला न्याहाळलं. त्याची ढब, त्याचा दिनक्रम, तो केव्हा

एकटा असतो, केव्हा दारू पिऊन बेभान होतो. आणि चौथ्या रात्री, जेव्हा वरच्या खोलीतलं मूल शेजारच्या आजीकडे झोपायला गेलं होतं ... मी आत गेलो.

मी कसा आत गेलो, हे विचारू नका. पलंगाखालचा काळोख आणि कपाटातला काळोख ... हे एकाच काळोखाचे दोन दरवाजे असतात; आणि तो काळोख माझा आहे. मी त्याच्या खोलीतल्या कपाटातून बाहेर पडलो, अगदी हळू, जसा एखादा विचार मनात उमटतो तसा.

तो दारूच्या नशेत पलंगावर आडवा होता. मी त्याच्या उशाशी बसलो आणि त्याला हलकेच जागं केलं. माणसाला झोपेतून उठवण्यात एक गंमत असते ... काही क्षण त्याला कळतच नाही, हे स्वप्न आहे की खरं. त्या काही क्षणांत त्यानं माझा खरा चेहरा बघितला. मी तुम्हाला तो चेहरा वर्णन करणार नाही. एवढंच सांगतो ... त्यानं तो बघितला, आणि त्याच्या घशातून जो आवाज निघाला, तो त्या मुलाच्या तीन रात्रींच्या भीतीची सव्याज परतफेड होता.

"सोड मला," तो कसाबसा म्हणाला. "मी तुझं काय बिघडवलंय?"

मी हसलो. ते लोक नेहमी हेच विचारतात.

"अरे बाळा," मी म्हणालो, अगदी मायेनं, कारण मला माया चांगली जमते, "तू माझं काहीच बिघडवलेलं नाहीस. तुझी-माझी काहीच दुश्मनी नाही. पण भूक लागतेच ना? भूक

लागली की खावंच लागतं. एवढंच." आणि मग, त्याच्या कानात, अगदी हळू:

"फक्त एक सांग ... तू त्या वरच्या पोराला रात्री जो त्रास द्यायचास, तेव्हा त्यानंही असंच विचारलं असेल ना? 'मी तुझं काय बिघडवलंय?' म्हणून? तू त्याला सोडलंस का?"

त्याला उत्तर देता आलं नाही. त्याला उत्तर देता येणार नव्हतं. आणि मला उत्तराची गरजही नव्हती. ही माझी ती सुंदर गोष्ट आहे ... मी स्वतःला सांगतो की मी न्याय करतोय. की मी त्या मुलाचा राखणदार आहे. की या माणसाला खाऊन मी जगाचं भलं करतोय.

पण खरं सांगू का? ... त्या क्षणी, त्या माणसाचं उबदार, भीतीनं थरथरणारं मांस माझ्या जिभेला लागलं, तेव्हा मला 'न्याया'चा विचार नव्हता. मला फक्त भूक होती. आणि भूक भागल्याचं ते अमर्याद समाधान. न्याय ही नंतर सांगायची गोष्ट आहे ... स्वतःला झोपवायला लागणारी अंगाई. खरी गोष्ट भुकेची असते. नेहमीच.

त्या रात्री खूप दिवसांनी माझं पोट भरलं. त्याच्या रक्तातला तो किडलेपणा माझ्या अंगात भिनला आणि मला नवचैतन्य आलं. त्या अंधाऱ्या खोलीत माझा मुक्काम संपला. आणि वरच्या मजल्यावरचं ते मूल ... दुसऱ्या दिवशी सकाळी ते परत आलं, आणि त्याला कळलं की आता त्याला त्रास देणारा कुणी उरलेलं नाही. ते मूल आता रात्री शांत झोपेल.

तो काही पहिला नव्हता. आणि शेवटचाही नसणार. वर्षानुवर्षं मी असेच शोधत आलोय ... जे लोक लहान जिवांना ओरबाडतात, त्यांना. कधी तो सावत्र बाप असतो, कधी ओळखीचा 'काका', कधी तो माणूस ज्याच्याकडे पालक डोळे झाकून मुलं सोपवतात. त्यांचा वास वेगळा असतो, आणि माझ्या नाकाला तो लांबून कळतो. मी त्यांना न्याहाळतो, आणि मग एका रात्री ते नाहीसे होतात. कुणी म्हणतं तो पळून गेला, कुणी म्हणतं त्यानं आत्महत्या केली. खरं काय झालं, ते फक्त मला आणि त्या काळोखाला माहीत. "शहर सुरक्षित झालं," असं तुम्हाला वाटेल. पण शहर सुरक्षित झालं नाही ... फक्त एका भुकेल्या राक्षसाचं पोट भरलं. त्या दोन गोष्टी एकाच वेळी खऱ्या असू शकतात. आणि नेमकं तिथेच, त्या दोन सत्यांच्या मधल्या अरुंद फटीत, मी राहतो.

बघा ... किती सोपं वाटतं ना? राक्षसानं वाईट माणूस खाल्ला, चांगल्या मुलाला वाचवलं. एखाद्या गोष्टीसारखं. पण गोष्टींमध्ये एक गोम असते: सांगणारा कोण आहे, यावर गोष्ट बदलते. आणि ही गोष्ट एक राक्षस सांगतोय. हे विसरू नका.

माणसांचं जग आजकाल माझ्यासाठी फार सोपं झालंय. पूर्वी लोक एकमेकांकडे बघायचे, एकमेकांची चौकशी करायचे, अनोळखी चेहरा दिसला की सावध व्हायचे. आता? आता सगळे त्यांच्या हातातल्या त्या उजळणाऱ्या काचेच्या तुकड्याकडे ... मोबाईल नावाच्या यंत्राकडे ... बघत असतात.

कुणाचं कुणाकडे लक्षच नाही. आई मुलाला बागेत सोडते आणि स्वतः फोनमध्ये बुडून जाते. बाप मुलाला रात्री एकटं ठेवून बाहेर पडतो. शिक्षक वर्गात असतात आणि नसतातही. या सगळ्या दुर्लक्षाच्या फटीतून मी सहज आत-बाहेर करतो. मूर्ख माणसं. स्वतःच्या मुलांकडे बघायलाही ज्यांना वेळ नाही.

आणि नेमकी हीच फट ... हीच दुर्लक्षाची, विसरण्याची फट ... दुसऱ्या कुणाला तरी माझ्याहून कितीतरी जास्त उपयोगी पडते. पण तेव्हा मला ते माहीत नव्हतं. तेव्हा मी फक्त एक तृप्त, समाधानी, अहंकारी राक्षस होतो, ज्याला वाटायचं की या शहरातला सगळ्यात मोठा भक्षक तोच आहे.

मला कुठे माहीत होतं ... माझ्याहून भुकेलं, माझ्याहून जुनं, माझ्याहून भयंकर असं काहीतरी, त्याच क्षणी, याच शहराच्या काळोखात डोळे उघडत होतं.

मुलं

शहराच्या पूर्व टोकाला एक शाळा आहे. जुनी, मोठ्या पटांगणाची, उंच कौलारू इमारतीची शाळा. मी तिथे जातो. रोज नाही, पण बऱ्याचदा. सकाळी, जेव्हा पहिल्या तासाची घंटा वाजायच्या आधी पटांगण मुलांनी फुलून जातं, तेव्हा मी एका कोपऱ्यात ... कधी झाडाच्या सावलीत, कधी भिंतीआडून ... उभा राहतो आणि नुसता बघत राहतो.

का? ... मला नीटसं माहीत नाही.

ती मुलं पळतात, पडतात, परत उठतात. एकमेकांच्या नावानं ओरडतात. कुणाचा डबा कुणी पळवतो, कुणी रडतं, कुणी खुदखुदून हसतं. एक चिमुरडी रोज त्याच जागी बसून मुंग्यांची रांग बघत असते, तासन्‌तास, जणू ते जगातलं सगळ्यात महत्त्वाचं काम आहे. एक मुलगा रोज भिंतीवर चढायचा प्रयत्न करतो आणि रोज पडतो, आणि तरी दुसऱ्या दिवशी परत चढतो. त्यांचे ते कोवळे आवाज, ती खोडकर भांडणं, तो निरर्थक, अमर्याद उत्साह ... ते बघितलं की माझ्या आत काहीतरी होतं. काहीतरी, ज्याला मी नाव देऊ शकत नाही. एक प्रकारची ऊब. आणि त्या उबेबरोबर येणारी एक खोल, बोचरी कळ.

कधीकधी, त्या मुलांकडे बघताना, माझ्या डोक्यात अचानक एखादं चित्र चमकून जातं. एक झोपाळा, उन्हात चमकणारा. कुणाचे तरी छोटे, ओले पाय. एका बाईचा आवाज, माझ्या नावानं हाक मारणारा ... पण ते नाव ऐकू येण्याआधीच चित्र विरतं. पाणी. नेहमी शेवटी पाणी असतं ... डोक्यावरून जाणारं थंड पाणी, आणि वरचा थरथरता चंद्र.

ही माझ्या बालपणीची आठवण असेल का? ... माझ्या खऱ्या, माणूस असतानाच्या बालपणीची? मला नक्की माहीत नाही. इतक्या युगांनंतर आठवण आणि कल्पना यांत फरक उरत नाही. कदाचित मीही कधीतरी असाच एखादा खोडकर

मुलगा होतो, एखाद्या पटांगणात पळणारा, एखाद्या आईचा लाडका ... त्या रात्रीच्या आधी, जेव्हा त्या लांब थंड हातांनी मला उचलून पाण्यात बुडवलं. कदाचित मी जे रोज बघतो, ते माझंच हरवलेलं रूप आहे. कदाचित मी या मुलांचं रक्षण करतो कारण फार पूर्वी कुणीतरी एका मुलाचं रक्षण केलं नव्हतं ... माझं.

... पण हे सगळं फार गोड वाटतंय, नाही का? फार सोयीस्कर. 'राक्षसाच्या आत एक हरवलेलं मूल दडलंय.' तुम्हाला आवडेल अशी गोष्ट. म्हणून मी सावध होतो. कारण हे जे काही माझ्या आत होतं, ते प्रेम होतं की मालकीहक्क, हे मला स्वतःलाच कधी कळलं नाही. ती मुलं 'माझी' होती ... माझ्या बघण्याची, माझ्या राखणीची. आणि कुणीतरी 'माझ्या' गोष्टीला हात लावला, तर मला राग येतो. खूप राग. आणि माझा राग म्हणजे कुणाचा तरी मृत्यू असतो. हे प्रेम आहे की भूक, हे तुम्हीच ठरवा. मला ठरवता आलं नाही.

त्या मुलांतली एक मला विशेष आवडायची. नाव कनिका. सात वर्षांची, पुढचे दात पडलेली, बोलताना 'स'च्या जागी 'थ' म्हणणारी. ती रोज शाळेत यायची तेव्हा तिच्या वेण्यांना दोन वेगवेगळ्या रंगांच्या रिबिनी असायच्या ... कारण तिला एकच रंग निवडता यायचा नाही, म्हणून ती दोन्ही लावायची. हे मला माहीत होतं, कारण मी बघत असायचो. ती पडली की मोठ्यांदा रडायची, आणि दुसऱ्याच क्षणी एखादं फुलपाखरू बघून सगळं

विसरून हसायची. तिच्याकडे बघताना माझ्या आत ती ऊब सगळ्यात जास्त दाटून यायची. आणि ... हे कबूल करायला लाज वाटते ... कधीकधी मला वाटायचं, "ही माझी आहे. हिला कुणी हात लावला, तर मी त्याचं अस्तित्वच मिटवून टाकेन." बघा. हेच ते. राखणदाराची माया आणि शिकाऱ्याची मालकी ... यांत फरक तरी काय? दोन्हीचा शेवट एकाच शब्दावर होतो: "माझं."

त्या शाळेत एक माणूस होता ... विरेश. बसचा कंडक्टर. तो मुलांचा फार लाडका होता, कारण तो बसमध्ये त्यांना गोष्टी सांगायचा, गमती-जमती करायचा, नकला करून दाखवायचा. मुलं त्याची वाट बघायची. आणि म्हणूनच मी विरेशला निवडलं होतं.

बघा, माझं एक वैशिष्ट्य आहे. मी रूप बदलू शकतो. पण तुमच्या गोष्टींतल्या राक्षसांसारखं नाही ... हवं ते रूप घेऊन. मला माणसाचं रक्त लागतं. रक्ताचा एकच थेंब पुरतो. त्या थेंबातल्या जिवंत खुणा ... तुम्ही ज्याला डीएनए म्हणता ... त्या वाचून मी हळूहळू त्या माणसाचं रूप घेतो. शाळेबाहेरच्या चहाच्या टपरीवर मी विरेशला नकळत धडकलो होतो; त्याच्या हाताला एक बारीक ओरखडा उठला, इतका बारीक की त्याला कळलंही नाही. पण मला माझा थेंब मिळाला होता.

विरेश बनायला मला दोन-तीन दिवस लागणार होते. तोवर मला त्याची ढब पकडायची होती ... तो कसा चालतो, कसा

हसतो, मुलांशी कसा बोलतो. कारण माझी फसवणूक मोठ्या माणसांच्या नजरेतून सुटेल, पण मुलांच्या नाही. मुलांची नजर चाणाक्ष असते. एखादी छोटीशी चूक ... विरेशचं एखादं नेहमीचं वाक्य मी विसरलो, किंवा त्याची एखादी सवय चुकली ... तर एखादं मूल लगेच ओळखेल, "तुम्ही विरेशकाका नाही." आणि ते मला परवडणार नाही.

मी विरेश का बनत होतो? ... कारण त्या रूपात मी मुलांच्या सगळ्यात जवळ राहू शकलो असतो. रोज, सकाळ-संध्याकाळ, त्यांच्यासोबत. त्यांच्या हसण्याच्या आवाजात. आणि कुणी त्यांना त्रास द्यायला आलं, तर सगळ्यात आधी मला कळलं असतं. हाच माझा बेत होता. साधा. सोयीस्कर.

विरेशला न्याहाळताना मला एक गंमत बघायला मिळाली. एका दुपारी, शाळेजवळच्या मैदानात, एक चिमुरडा ... योगु ... आईचा हात सोडून झुडपांकडे पळत होता. त्याची आई ओरडली, "योगु! तिकडे नको जाऊस, नाहीतर बागुलबुवा येईल आणि उचलून घेऊन जाईल!" मी जवळच उभा होतो, आणि मला हसू आलं. म्हणे बागुलबुवा घेऊन जाईल. या मूर्ख आयांना कळत नाही ... मुलांना भीतीच्या गोष्टी सांगून त्यांना घाबरवणं, हेच त्यांना खऱ्या काळोखाच्या तोंडी देणं असतं.

भीती ही दार उघडते. आणि कुठल्या दारातून आत काय येईल, हे कुणी सांगावं? कदाचित बागुलबुवा. कदाचित त्याहून वाईट काहीतरी. ती आई फोनमध्ये बुडाली, आणि योगु

झुडपांआड दिसेनासा झाला ... आणि क्षणभर माझ्या काळजात एक अनोळखी कळ उठली. मी पुढे झालो. पण योगु सुखरूप होता; तो नुसता एका बेडकामागे पळत होता. त्या दिवशी काही झालं नाही. पण मला जाणवलं ... मी आता अशा गोष्टींकडे वेगळ्या नजरेनं बघतोय. शिकाऱ्याच्या नाही. राखणदाराच्या. आणि त्या जाणिवेची मला स्वतःलाच लाज वाटली.

विरेशचं रूप घेताना मला आणखी एक गोष्ट खटकली होती. एका सकाळी खरा विरेश शाळेत उशिरा आला ... धावतच, घामाघूम. तो सरळ अधीक्षकांच्या खोलीत शिरला आणि दार लोटून घेतलं.

आम्हा राक्षसांचे कान फार तीक्ष्ण असतात. भिंतीपलीकडचा, बंद दारामागचा, अगदी कुजबुजीतला संवादही आम्हाला सहज ऐकू येतो ... पानावर पडणाऱ्या दवबिंदूचा आवाजसुद्धा. म्हणून त्या सकाळी, पटांगणाच्या दूरच्या कोपऱ्यात झाडाखाली उभा असतानाही, त्या बंद खोलीतला प्रत्येक शब्द माझ्या कानांवर स्पष्ट पडत होता.

"साहेब," विरेशचा आवाज थरथरत होता. "ती पोरगी ... आपल्या तीन नंबरच्या बसमधली. रोज सकाळी मारुती मंदिराच्या स्टॉपवर चढायची. दोन घट्ट वेण्या, पाठीवर लाल दप्तर. काल होती. आज स्टॉपवरच नव्हती. मी तिच्या घरी गेलो. तिच्या आईनं दार उघडलं आणि माझ्याकडे असं बघितलं,

जणू मी वेडा आहे. म्हणाली ... 'कोण पोरगी? आम्हाला मूलच नाही.'"

क्षणभर शांतता. मग अधीक्षकांचा वैतागलेला आवाज: "विरेश, सकाळी सकाळी काय घेऊन बसलास? शेकडो पोरं येतात-जातात. कोण कुठलं, कुणाला आठवणार? तुझा गोंधळ झाला असेल. जा, बसला उशीर होतोय."

"गोंधळ नाही, साहेब." कागद उलटल्याचा आवाज. "मी रोज मोजतो. नावानिशी. या वहीत लिहून ठेवतो ... कोण चढलं, कोण उतरलं. वीस वर्षं झाली हे करतोय. हे बघा हे नाव ... काल लिहिलेलं. आणि आता बघा... शाई आपोआप फिकट होत चाललीय. जणू मी ते कधी लिहिलंच नव्हतं. कागदसुद्धा स्वतःहून विसरतोय, साहेब."

पुन्हा शांतता ... पण या वेळी वेगळी. जड. मग खुर्चीचा करकर आवाज, कपाटाचं दार उघडल्याचा आवाज, हजेरीपटाची पानं भराभर उलटल्याचा आवाज. आणि मग अधीक्षकांचा आवाज ... आता वैतागलेला नव्हता; बारीक, अडखळणारा.

"हे... हे बरोबर नाही. इथे तिचं नाव असायला हवं. पण... हजेरीपटात सुरुवातीपासून एकोणचाळीसच नावं आहेत. चाळीस कधीच नव्हती. पण मला आठवतंय ... चाळीस होती. की... की नव्हती?" त्यांचा आवाज लटपटला. "मला अचानक का आठवत नाहीये?"

"हीच तर भीती आहे, साहेब." विरेशचा आवाज आता कुजबुजीत उतरला.

"आपण विसरतोय. सगळेच. आणि जे एकदा विसरलं जातंय, ते परत येतच नाहीये. ती पोरगी पहिली नाही. मागच्या आठवड्यात एक मुलगा होता. परवा आणखी एक. आणि कुणालाही आठवत नाहीये की ती मुलं कधी होती. फक्त मला आठवतंय ... कारण मी लिहून ठेवतो. साहेब, या शाळेत काहीतरी आहे. ते आपली पोरं उचलतंय, आपल्या डोळ्यांदेखत ... आणि आपल्याला कळतही नाहीये, कारण ते आपली आठवणच पुसून टाकतंय."

"बंद कर!" अधीक्षक जवळजवळ ओरडले. पण त्या ओरडण्यात राग नव्हता ... निव्वळ भीती होती. "असलं काहीही नसतं! पोरं गावाला गेली असतील. नाव नोंदवायचं राहिलं असेल. कारकुनाची चूक. काही तरी असेल. मी बघतो सगळं. तू... तू जा आता. आणि हे असलं कुणाजवळ बोलू नकोस ... शाळेचं नाव खराब होईल."

खुर्ची मागे सरकली. आणि काही क्षणांतच अधीक्षक ... तो मोठ्या पदाचा, गुबगुबीत माणूस ... खोलीबाहेर आला. पटांगणात येऊन उभा राहिला, इकडे-तिकडे बघत, ओठ हलवत खेळणाऱ्या मुलांची मोजणी करू लागला. एक, दोन, तीन... त्याच्या कपाळावर घाम होता आणि बोटं थरथरत होती.

तेव्हा मला हसू आलं होतं. माणसांचा नेहमीचा वेडेपणा, असं वाटलं ... एका हरवलेल्या पोरीवरून केवढा थयथयाट. मला कुठे माहीत होतं, की त्या घामाघूम अधीक्षकाला आणि त्या थरथरत्या कंडक्टरला, माझ्याही आधी, काहीतरी कळलं होतं ... एक भीती, जिला ते नाव देऊ शकत नव्हते. पण मी देऊ शकत होतो. आणि तो अधीक्षक आता रोज त्या पटांगणात उभा राहून मुलं मोजणार होता ... आणि रोज एका नव्या, थोड्या कमी आकड्यापाशी थांबणार होता, आणि रोज त्याला वाटणार होतं की हाच आकडा नेहमीचा होता.

पण नियतीचे बेत वेगळे होते. कारण ज्या दिवशी मी विरेशचं रूप जवळजवळ पूर्ण घेतलं होतं, त्याच दिवशी मला पहिल्यांदा 'त्याचा' वास आला.

चाहूल

सुरुवातीला फार किरकोळ होतं ते.

एक मूल शाळेत आलं नाही. मग दुसरं. मग आणखी एक. साधी गोष्ट ... मुलं आजारी पडतात, गावाला जातात, शाळा बुडवतात. पण मला खटकलं ते वेगळंच. ज्या मुलांची नावं गायब होत होती, त्यांची कुणालाच फारशी आठवण येत नव्हती.

हे समजून घ्या ... हीच खरी भयानक गोष्ट होती. एखादं मूल हरवलं की आकांत व्हायला हवा. पोलिस, शोध, रडारड, भिंतींवर फोटो. पण इथे तसं काहीच होत नव्हतं. वर्गात एक बाक रिकामा राहायचा, आणि कुणाच्या लक्षातही यायचं नाही. आईला विचारलं तर ती क्षणभर गोंधळायची ... "कोण? आपल्याला... आपल्याला मूल होतं का?" ... आणि मग खांदे उडवून परत फोनमध्ये बुडायची. जणू ते मूल कधी अस्तित्वातच नव्हतं. जणू कुणीतरी ते मूल जगाच्या आठवणीतूनच पुसून टाकलं होतं.

मी मोजायला लागलो. पहिल्या आठवड्यात दोन. मग चार. मग रोज एक. आणि प्रत्येक वेळी तीच गोष्ट ... रिकामा बाक, विरलेली आठवण, गोंधळलेले पालक जे क्षणभरात विसरून जायचे. एका वर्गात मी बघितलं, शिक्षिकेनं हजेरी घेताना एक नाव वाचलंच नाही ... कारण तिच्या वहीतून ते नावच नाहीसं झालं होतं, आणि तिला त्याची शंकाही आली नाही. ते मूल कधी त्या वर्गात बसलं होतं, याची एकमेव साक्ष आता फक्त मी होतो ... एक राक्षस, ज्याची स्मरणशक्ती माणसांसारखी पुसता येत नाही. आणि हीच तर सगळ्यात भयंकर गोष्ट होती: 'तो' फक्त मुलं चोरत नव्हता. तो त्यांचं असणंच चोरत होता. त्यांनी या जगात जगण्याचा जो काही थोडासा ठसा उमटवला होता, तोही. एखादं मूल मरतं, तेव्हा मागे दुःख उरतं ... आणि दुःख म्हणजेसुद्धा एक प्रकारची आठवण, एक प्रकारचं प्रेम. पण

'तो' दुःखही उरू देत नव्हता. तो शुद्ध, संपूर्ण विसर मागे ठेवायचा. आणि शुद्ध विसरापेक्षा क्रूर गोष्ट या विश्वात दुसरी नाही.

आणि मला आठवलं. खूप जुनं काहीतरी, माझ्या हाडांत गाडलेलं, जागं झालं.

कारण ही पद्धत मी ओळखत होतो. ही चोरी नव्हती. हे खाणं नव्हतं ... निदान माझ्यासारखं नव्हतं. मी मूल खातो तेव्हा त्याचं मांस संपतं, पण त्याची आठवण उरते; आई रडते, जग हादरतं. पण हे ... हे आठवणीसकट खाणं होतं. मूल आणि त्याचं असणं, दोन्ही एकदम गिळून टाकणं. आणि असं फक्त एकच गोष्ट करू शकते.

त्या रात्री मी पहिल्यांदा त्याचा वास घेतला, आणि माझ्या अमर शरीरातून, इतक्या युगांत पहिल्यांदा, भीतीची एक थंड लाट गेली.

तो वास... त्याला वास म्हणणं चूक आहे. तो वासाचा अभाव होता. जिथे काहीच नसावं, तिथली पोकळी. हवेत एक जागा अशी, जिथे कुठलाच गंध नाही, कुठलाच आवाज नाही, कुठलंच जीवन नाही. एक चालतीफिरती रिकामी जागा. जिथून ती जायची, तिथली ऊब निघून जायची, रंग फिके व्हायचे, आणि मागे उरायची फक्त एक थंड, चिकट शांतता.

आम्ही त्याला नाव देत नव्हतो. नाव दिलं की ती गोष्ट खरी होते, जवळ येते. म्हणून आम्ही फक्त एवढंच म्हणायचो ...

'तो'. किंवा फार भीती वाटली, तर ... 'रिता'. म्हणजे रिकामा. पोकळ. कारण तो आतून पोकळ आहे, आणि त्या पोकळीला कधीही, कशानंही भरता येत नाही.

तुम्हाला पलंगाखालचा बागुलबुवा घाबरवतो ना? ... तर ऐका. ज्या रात्री बागुलबुवांना घाबरायचं असतं, त्या रात्री ते 'रित्या'चं नाव घेतात. जिथे एखादं मूल झोपेतच गेलं म्हणतात, जिथे पाळणा एका सकाळी अचानक रिकामा सापडतो आणि कुणालाच कारण कळत नाही, जिथे एखादं मूल "खेळता खेळता निघून गेलं" आणि परत कधीच सापडलं नाही ... तिथे 'तो' येऊन गेलेला असतो. तो आवाज करत नाही. तो ओढत नाही, झोंबत नाही. तो फक्त बोलावतो ... आणि मूल त्याच्याकडे आपणहून चालत जातं, हसत हसत, कारण तो त्या मुलाला हवं ते रूप घेऊन येतो. आवडता काका. हरवलेला मित्र. किंवा फक्त एक मऊ, उबदार आवाज, जो म्हणतो, "चल, इकडे ये, इथे तुला कुणीच रागावणार नाही."

आणि सगळ्यात भयंकर ... माझी जमात नामशेष का झाली? आम्ही म्हातारपणानं मेलो नाही, कारण आम्हाला म्हातारपण नाही. आम्ही एकमेकांत भांडून मेलो नाही. आम्हाला 'त्यानं' खाल्लं. एक एक करून. कारण 'तो' फक्त मुलं खात नाही ... तो भीती खातो, आणि बागुलबुवा म्हणजे मूर्तिमंत भीती. आम्ही त्याचं आवडतं खाणं होतो. आणि ज्या रात्री त्या लांब थंड हातांनी मला बनवलं, माझ्या त्या बापालाही

... माझ्या निर्मात्यालाही ... पुढे कधीतरी 'त्यानं'च गिळलं असणार. म्हणूनच तो परत कधी आला नाही.

'तो' म्हणजे माझं अख्खं जग गिळणारी पोकळी होती. आणि आता ती पोकळी, इतक्या युगांनंतर, याच शहरात, याच शाळेजवळ आली होती ... माझ्या मुलांजवळ.

आणि मी? ... मी, जो स्वतःला या शहराचा सगळ्यात मोठा भक्षक समजत होतो, तो थरथरत होतो. मला पळून जायचं होतं. जसा मी आयुष्यभर पळत आलो होतो. कारण शेवटी, ऐका ... मी राखणदार वगैरे नाही. मी एक भित्रा, स्वार्थी, जुना राक्षस आहे, ज्याला फक्त एकच गोष्ट येते: स्वतःला वाचवणं.

रिता

मी त्याला पहिल्यांदा बघितलं, त्या रात्री मी विरेशच्या रूपात होतो.

विरेश आता आजारी पडला होता ... माझी त्याच्या शरीरावरची पकड घट्ट झाली होती, आणि खरा विरेश तापानं अंथरुणाला खिळला होता. मी त्याच्या जागी बस चालवत होतो, मुलांना घरी सोडत होतो. शेवटचं मूल उतरलं, आणि रिकामी बस घेऊन मी आगारात परत जात होतो.

रस्ता निर्मनुष्य होता. आणि अचानक, बसच्या दिव्यांच्या प्रकाशात, रस्त्याच्या मधोमध ... एक मूल उभं होतं.

मी बस थांबवली. ते मूल पाठमोरं होतं, एकटं, अंधारात.

मी खाली उतरलो. "बाळा, इथे काय करतोयस? घर कुठे आहे तुझं?"

ते मूल हळूहळू वळलं.

आणि मला कळलं की ते मूल नव्हतं.

त्याचा चेहरा एका मुलाचा होता ... पण फक्त चेहरा. आणि त्या चेहऱ्यामागे काहीच नव्हतं. डोळ्यांत बाहुल्या नव्हत्या, फक्त दोन पोकळ खाचा. आणि त्या खाचांतून मला आत दिसत होतं ... एक अथांग, थंड काळोख, ज्यात कितीतरी पांढरे, धूसर चेहरे तरंगत होते. लहान मुलांचे चेहरे. शेकडो. हजारो. सगळे झोपल्यासारखे, सगळे पाण्यात बुडाल्यासारखे, हळूहळू त्या काळोखात गरगरत फिरणारे. त्यानं आजवर खाल्लेली सगळी मुलं ... त्याच्या आत, कायमची.

"तू," ते म्हणालं. आणि तो आवाज एका मुलाचा नव्हता, अनेक मुलांचा होता, एकत्र ... एक भयाण, ओला कोरस. "तू अजून जिवंत आहेस. शेवटचा. किती वर्षं शोधतोय मी तुला."

माझे पाय जागच्या जागी गोठले. इतक्या युगांत पहिल्यांदा मला हलता येत नव्हतं.

ती पोकळी पुढे सरकली, आणि तिच्याबरोबर सगळी ऊब, सगळा आवाज मागे ओढला गेला. बसचे दिवे मंद झाले. रातकिड्यांची किरकिर थांबली. हवा अशी झाली, जणू जगातला सगळा प्राण कुणीतरी एका घोटात पिऊन टाकलाय.

मला त्या क्षणी जाणवलं ... हे माझ्याहून कितीतरी जुनं आहे. मी हजारो वर्षांचा; हे कदाचित जगाएवढं जुनं. जेव्हा पहिल्या माणसानं पहिल्यांदा आपल्या मुलाकडे पाठ फिरवली, पहिल्यांदा कुणीतरी विसरलं गेलं, तेव्हाच हे जन्मलं असेल. आणि तेव्हापासून ते वाढतच गेलंय ... प्रत्येक दुर्लक्षानं, प्रत्येक विसरण्यानं, थोडं थोडं मोठं होत. माझी जमात भीतीवर जगायची, आणि भीती कधीतरी संपते. पण हे विसरण्यावर जगतं ... आणि विसरणं कधीच संपत नाही. म्हणूनच आम्ही संपलो, आणि हे उरलं. काळाचा खरा विजेता हाच होता.

"तुझं ते नवं नाटक मी बघतोय," ते म्हणालं, माझ्याभोवती फिरत. "मुलांचा राखणदार. किती गोड. एक बागुलबुवा, मुलांना वाचवतोय."

त्या अनेक आवाजांत एक हसू मिसळलं ... सगळ्यात भयंकर आवाज जो मी कधी ऐकला. "पण आपण एकाच जातीचे आहोत, तू आणि मी. तू स्वतःला फसवतोयस. भूक ही भूकच असते. तू माणसं खातोस, मी मुलं खातो ... फरक फक्त चवीचा. आणि आता मी ही शाळा निवडलीय. इथलं प्रत्येक मूल माझं आहे. एक एक करून, मी त्या सगळ्यांना घेणार आहे. आणि कुणालाही ... कुणालाही ... आठवणारसुद्धा नाही की ती कधी होती."

"का?" ... एवढाच एक शब्द माझ्या घशातून निघाला.

"का?" त्या पोकळीतले हजारो चेहरे एकदम माझ्याकडे वळले.

"कारण हे जग आता माझ्यासाठी बनलंय. बघ ना भोवती. आई-बाप त्यांच्या मुलांकडे बघतच नाहीत. कुणी कुणाला आठवत नाही. प्रेम पातळ झालंय, लक्ष विरलंय. मी अशा दुर्लक्षावर, अशा विसरण्यावर जगतो ... आणि हे जग मला रोज नवं, गुबगुबीत खाणं वाढतंय. तुझ्यासारखे जुने राक्षस मरत चाललेत, कारण तुम्ही माणसांच्या भीतीवर जगायचात. आणि माणसांना आता कशाचीच भीती उरलेली नाही. पण विसरणं? दुर्लक्ष? ... ते अमर आहे. म्हणून मी अमर आहे."

तो माझ्याभोवती फिरत राहिला, आणि फिरताना त्याच्या आतले ते बुडलेले चेहरे एका विशिष्ट लयीत हलत होते ... जणू एखाद्या खोल, काळ्या पाण्यात कुणीतरी दगड टाकावा आणि तळातली प्रेतं हलावीत. मला त्यातला एक चेहरा ओळखीचा वाटला. एक चिमुरडी. कालपरवापर्यंत ती शाळेच्या पटांगणात मुंग्यांची रांग बघत बसायची. आता ती त्या काळोखात, इतर हजारो हरवलेल्यांसोबत, हळूहळू गरगरत फिरत होती ... झोपल्यासारखी, बुडल्यासारखी, कायमची.

माझ्या आतला राग उफाळून आला. पण रागाच्या खाली, खोलवर, ती जुनी भीती होती ... आणि 'त्याला' ती भीती दिसत होती, तिचा वास येत होता. तो त्यावरच तर जगायचा.

"तू थरथरतोयस," तो कुजबुजला, आणि त्या आवाजात एक प्रकारची माया होती, जी माझ्या स्वतःच्या मायेपेक्षा हजारपट भयंकर होती.

"किती छान. इतक्या युगांनी एका बागुलबुवाला घाबरताना बघणं ... ही माझी सगळ्यात आवडती मेजवानी. खा, म्हणतोस ना तू स्वतःला? ... मीही खातो. आणि आज माझ्या ताटात तूच आहेस."

आणि मग त्यानं हात पुढे केला ... एक लांब, थंड, बोटं नसलेला हात ... आणि माझ्या छातीला स्पर्श केला.

त्या स्पर्शानं माझ्या आतलं सगळं काढून घ्यायला सुरुवात केली. माझी ताकद, माझा अहंकार, माझी ती सुंदर गोष्ट ... सगळं. मला त्या पोकळीत ओढलं जात होतं, त्या तरंगणाऱ्या मुलांच्या चेहऱ्यांत आणखी एक चेहरा होऊन मिसळायला. आणि त्या क्षणी, मरता मरता, माझ्या डोळ्यांसमोर परत ते चित्र आलं ... झोपाळा, ओले पाय, ती हाक... आणि पाणी, डोक्यावरून जाणारं थंड पाणी.

आणि त्या भीतीच्या तळातून, कुठूनतरी, एक जुनी आठवण वर आली ... माझ्या त्या बापाचे शब्द, ज्या रात्री त्यानं मला बनवलं होतं:

"घाबरू नकोस, पोरा. एकदा तू मेलास, की मग तुला कुणीच मारू शकत नाही."

मी मेलेलोच होतो. कितीतरी युगांपूर्वी. त्या नदीत.

मग ही पोकळी मला परत कशी मारणार?

मी ओरडलो ... आणि त्या ओरडण्यानं त्याचा हात क्षणभर मागे सरकला. तेवढ्या क्षणात मी बसखालच्या काळोखाचा दरवाजा उघडला ... जो माझा आहे, फक्त माझा ... आणि त्या काळोखात स्वतःला झोकून दिलं. मी पळालो. लाजिरवाणं, पण खरं. मी पळालो.

त्याचा तो ओला, अनेक-आवाजी हसण्याचा आवाज माझ्या मागे शहराच्या काळोखभर घुमत राहिला:

"पळ, बागुलबुवा, पळ. पण उद्या मी तुझ्या मुलांना घ्यायला येणार आहे. आणि तू बघत बसशील. कारण तू भित्रा आहेस. नेहमीच होतास."

निर्णय

त्या रात्री मी शहराच्या वेशीबाहेरच्या एका जुन्या, मोडक्या विहिरीत लपून बसलो होतो. थरथरत. एक अमर राक्षस, एखाद्या भेदरलेल्या पोरासारखा थरथरत.

आणि माझ्या मनात एक आवाज सतत म्हणत होता ... पळ. हे शहर सोड. दुसरं शहर शोध, दुसरी शाळा, दुसरी मुलं. जग मोठं आहे. 'तो' इथे थांबेल, ही मुलं खाईल, आणि पुढे जाईल; आणि तू वाचशील. आजवर तू असंच तर केलंस.

प्रत्येक वेळी 'तो' जवळ आला, तू पळालास. म्हणूनच तर तू उरलास. ही तुझी ताकद आहे ... पळणं.

आणि हे खोटं नव्हतं. पळणं हीच माझी खरी कला होती. लढाईत मी कधीच फार शूर नव्हतो ... आम्ही बागुलबुवा शूर नसतोच; आम्ही चोरटे असतो, काळोखातून येणारे, पाठीमागून घाव घालणारे. समोरासमोरच्या लढाईत आम्हाला रस नाही, कारण त्यात मरण्याची शक्यता असते. आणि मरणं ... खऱ्या अर्थानं, कायमचं मरणं ... हीच आमची एकमेव भीती. तीनशे वर्षं, पाचशे वर्षं, हजार वर्षं ... मी जगलो, कारण मी प्रत्येक धोक्यापासून पळालो. 'तो' जेव्हा जेव्हा जवळ आला, मी दुसरा देश गाठला. माझे जातभाई लढले असतील, किंवा भीतीनं गोठून उभे राहिले असतील; आणि म्हणून ते 'त्याच्या' पोटात गेले. मी पळालो, आणि म्हणून मी उरलो. भ्याडपणा हीच माझी ढाल होती. मग आज ती ढाल खाली का ठेवावी?

ती मुलं तुझी नाहीत. तू त्यांचा कुणीच नाहीस. तू एक राक्षस आहेस, जो स्वतःला सुंदर गोष्टी सांगतो. तू त्यांना वाचवायला गेलास, तर मरशील ... खऱ्या अर्थानं, कायमचा मरशील, त्या पोकळीत विरून जाशील. आणि कशासाठी? एका गोष्टीसाठी, जी तू स्वतःला सांगतोस? चांगुलपणासाठी? ... पण तू चांगला नाहीस. तू स्वतःच म्हणालास.

हो. मी स्वतःच म्हणालो होतो.

आणि तरी ...

विहिरीच्या त्या ओलसर काळोखात बसून, मी डोळे मिटले, आणि मला ती मुलं दिसली. मुंग्यांची रांग बघणारी ती चिमुरडी. रोज भिंतीवर चढून रोज पडणारा तो मुलगा. विरेशकाकांच्या गोष्टी ऐकायला डोळे विस्फारून बसणारी ती सगळी कोवळी, खोडकर, गोंगाटी मुलं. आणि त्यांच्याकडे बघताना माझ्या आत उठणारी ती नाव नसलेली ऊब.

आणि मला कळलं ... मी त्यांना का वाचवणार आहे, ते 'चांगुलपणा' नव्हता.

मी त्यांना वाचवणार होतो कारण ती मुलं माझी होती. माझ्या राखणीची. माझ्या भुकेला शांत करणारं ते एकमेव जग होतं ... आणि 'तो' ते माझ्याकडून हिसकावून घ्यायला आला होता. ज्या पोकळीनं माझा बाप गिळला, माझी जमात गिळली, माझं अख्खं जग गिळलं ... तीच पोकळी आता हेही गिळणार होती. आणि या एका गोष्टीला ... फक्त या एका गोष्टीला ... मी 'नाही' म्हणणार होतो.

स्वार्थासाठी? ... हो, बहुतेक. कारण ती मुलं गेली, तर माझ्या अमर आयुष्यातली ती शेवटची ऊबही जाईल, आणि मग उरेल फक्त रिकामपण. आणि रिकामपणाची मला भीती वाटते ... 'त्या' पोकळीहूनही जास्त. कदाचित म्हणूनच. कदाचित मी त्यांना माझ्यासाठी वाचवणार होतो, त्यांच्यासाठी नाही.

... बघा. शेवटपर्यंत मी प्रामाणिक राहतोय. मी हुतात्मा नाही. तुम्ही माझा पुतळा उभारू नका. मी एक स्वार्थी, भित्रा, भुकेला बागुलबुवा आहे, ज्यानं एका रात्री ठरवलं की 'त्याला' एक गोष्ट तो देणार नाही. एवढंच. पण कधीकधी, चांगली गोष्ट आणि स्वार्थी गोष्ट ... दोन्ही एकाच दिशेनं जातात. आणि नियती फक्त कृती बघते. हेतू नाही.

मी डोळे उघडले. भीती अजूनही होती ... तीनशे वर्षांत मी जी भीती ओळखली नव्हती, ती. पण आता भीतीच्या जोडीला आणखी एक गोष्ट होती. राग. माझा राग. आणि तुम्हाला आठवतंय ना मी काय म्हणालो होतो ... माझा राग म्हणजे कुणाचा तरी मृत्यू असतो.

फक्त या वेळी, कदाचित, तो मृत्यू माझाही असणार होता.

शेवटची शिकार

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी, शाळा सुटल्यावर.

तो आला, तेव्हा सूर्य नुकताच मावळत होता, आणि शेवटची काही मुलं अजून पटांगणात रेंगाळत होती ... त्यांच्या आया उशिरा येणाऱ्या. आणि मग, एका क्षणात, सगळं बदललं. आकाशातला उरलासुरला उजेड कुणीतरी विझवल्यासारखा विझला. पटांगणाच्या कडेची झाडं काळी, मुकी झाली. आणि

शाळेच्या मुख्य दरवाजात, संध्याकाळच्या त्या अस्वाभाविक काळोखातून, 'तो' आत आला.

या वेळी त्यानं एका मुलाचं रूप घेतलं नव्हतं. आता त्याला लपायची गरज नव्हती. आता तो त्याच्या खऱ्या रूपात होता ... एक उंच, पोकळ आकृती, माणसासारखी पण माणूस नसलेली, ज्याच्या अंगातून तो थंड काळोख ओघळत होता, आणि ज्याच्या आत ते हजारो बुडलेले चेहरे तरंगत होते. तो जिथून चालला, तिथलं गवत करपलं. हवा गोठली.

उरलेली मुलं किंचाळली. ती सैरावैरा पळू लागली, पण 'त्याची' पोकळी पटांगणभर पसरत होती, आणि पळणारी मुलं हळूहळू मंदावत होती, जणू त्यांच्या पायांतला जोरच कुणीतरी ओढून घेत होतं. एका मुलीचा हात त्या काळोखाला लागला आणि ती जिथल्या तिथे थबकली, तिचे डोळे रिकामे होऊ लागले, तिची आठवण विरू लागली ...

... आणि नेमक्या त्या क्षणी मी झाडाच्या सावलीतून बाहेर पडलो.

विरेशचं रूप मी टाकून दिलं होतं. आता मी माझ्या खऱ्या रूपात होतो ... जे रूप त्या दारुड्यानं मरताना बघितलं होतं, जे रूप तीनशे वर्षांत कुणी जिवंत माणसानं बघितलं नव्हतं.

मी त्या मुलीला त्या काळोखातून ओढून बाजूला फेकलं, आणि 'त्या' पोकळीसमोर उभा राहिलो.

"मुलांना सोड," मी म्हणालो. "ती माझी आहेत."

'तो' थांबला. त्या हजारो चेहऱ्यांनी एकदम वर बघितलं. आणि तो ओला, अनेक-आवाजी हसण्याचा आवाज परत आला.

"आलास? भित्रा बागुलबुवा आलाच का शेवटी? मला वाटलं तू पळून गेलास."

"मीही तसंच ठरवलं होतं," मी म्हणालो. आणि हे खरं होतं. "पण मग वाटलं ... माझं जग एकदाच गिळलं गेलंय. दुसऱ्यांदा मी ते बघत बसणार नाही."

मग मी त्याच्यावर झेपावलो.

त्या लढाईचं वर्णन मी तुम्हाला नीट करू शकणार नाही ... कारण ती लढाई तुमच्या डोळ्यांना दिसली असती तशी नव्हती. ती सावल्यांची लढाई होती, काळोखाची काळोखाशी. मी पलंगाखालचे, बाकड्यांखालचे, कपाटांतले, मनातले सगळे काळोख उघडले आणि त्यांना त्याच्यावर सोडलं. मी त्याच्या त्या पोकळ देहाला फाडलं, आणि आतून ते बुडलेले चेहरे बाहेर ओघळले. मी त्याला चावलो, ओरबाडलं, माझ्या हजारो वर्षांच्या रागानं त्याच्यावर तुटून पडलो.

पण 'तो' पोकळ होता.

आणि पोकळीला तुम्ही कितीही फाडा, ती परत भरतेच. मी जेवढं फाडायचो, तेवढी ती परत यायची. आणि मी थकत होतो. कारण मी मर्त्य रागावर लढत होतो, आणि 'तो' अमर दुर्लक्षावर.

मी काळोखाचे आणखी दरवाजे उघडले.

लहानपणी ज्या काळोखाला मुलं घाबरतात ... पलंगाखालचा, कपाटातला, बंद दाराआडचा ... त्या सगळ्या काळोखांना मी एका क्षणात त्या पटांगणात ओढून आणलं आणि 'त्याच्यावर' लोटलं. एका क्षणासाठी तो त्या काळोखाखाली गाडला गेला; ती बुडलेली मुलं किंचाळल्यासारखी वाटली. मला वाटलं ... झालं, संपवलं याला.

पण मग तो काळोख त्यानं... प्यायला.

होय. ज्या काळोखावर मी जगतो, तोच काळोख त्यानं शोषून घेतला, आणि तो आणखी मोठा, आणखी गडद झाला. कारण माझा काळोख भीतीचा होता ... आणि भीती हेच तर त्याचं अन्न. मी त्याच्यावर जे फेकत होतो, तेच तो खात होता. मी जितका लढायचो, तितका तो बलवान व्हायचा. ही लढाई मी जिंकूच शकत नव्हतो. ती लढाई अशी रचलेलीच होती की मी हरणार. मला ते कळत होतं. आणि तरी मी थांबलो नाही ... कारण थांबणं म्हणजे ती मुलं त्या पोकळीत बुडवणं, आणि ते मला, या स्वार्थी राक्षसालाही, सहन होत नव्हतं.

त्यानं त्याचा तो लांब, थंड हात माझ्या छातीत खोल घुसवला. आणि या वेळी मी सुटू शकलो नाही.

त्या स्पर्शानं माझं असणं शोषून घ्यायला सुरुवात केली. माझी ताकद संपत होती. माझ्या आतला काळोख विरत होता.

मला जाणवत होतं ... हाच तो अंतिम मृत्यू, ज्याची मलाही भीती वाटायची. त्या नदीतल्या पहिल्या मृत्यूनं मला राक्षस बनवलं होतं; हा दुसरा मृत्यू मला फक्त... काहीच नाही बनवणार होता. एक तरंगता चेहरा, त्या पोकळीत.

"बघितलंस?" तो कुजबुजला, मला आत ओढत. "शेवटी तू माझाच होणार. एक एक करून मी तुम्हा सगळ्यांना घेतलं. आता शेवटचा तू."

... आणि नेमक्या त्या क्षणी, माझ्या मागे, एक आवाज आला.

एका मुलीचा आवाज. ती मुलगी ... कनिका ... जिला मी बाजूला फेकलं होतं, ती उठून उभी राहिली होती, थरथरत, रडत, पण उभी. आणि तिच्या मागे आणखी एक मूल, आणि आणखी एक. ती पळून गेली नव्हती. ती तिथेच होती. आणि त्या चिमुरडीनं, तिच्या त्या कोवळ्या आवाजात, मला हाक मारली ...

"विरेशकाका! उठा!"

विरेशकाका.

तिला वाटत होतं मी विरेश आहे. तिला माझं खरं, भयाण रूप दिसत होतं, आणि तरी ... तरी तिला वाटत होतं की हा भीतिदायक राक्षस म्हणजे तिचा लाडका विरेशकाका आहे, जो तिला वाचवायला आलाय. आणि ती मला उठायला सांगत होती.

आणि त्या एका हाकेनं ... 'विरेशकाका, उठा' ... माझ्या आत काहीतरी झालं.

त्या क्षणी मला ते चित्र परत दिसलं. झोपाळा. ओले पाय. आणि या वेळी, पहिल्यांदा, ती हाक पूर्ण ऐकू आली. एका बाईचा आवाज, माझ्या नावानं ... माझ्या खऱ्या, माणूस असतानाच्या नावानं ... हाक मारणारा. आणि मला माझं नाव आठवलं.

मी ते नाव तुम्हाला सांगणार नाही. ते आता फक्त माझं आहे. इतक्या युगांनंतर, परत माझं.

आणि त्या नावासोबत सगळं परत आलं ... एका झटक्यात, पुरासारखं. ती आई. तिच्या हातातला तो भाकरीचा वास. तो झोपाळा, ज्याला ती हलकेच ढकलायची आणि मी आकाशाला भिडल्यासारखा हसायचो. माझ्या रक्ताच्या बापाचे खांदे, ज्यांवर बसून मी बाजार, जत्रा बघितली होती. आणि मग ती शेवटची रात्र ... नदीकाठ, ती लांब थंड आकृती, आणि माझ्या आईची ती दूरवरून येणारी, मला न सापडलेली हाक. मी ते मूल होतो. ज्याचं रक्षण कुणी केलं नाही, ते मूल मीच होतो.

तीनशे वर्षं ... नाही, त्याहून कितीतरी जास्त ... मी हे विसरून, स्वतःलाच विसरून जगत होतो. आणि आज, मरता मरता, मला माझा पहिला आणि शेवटचा चेहरा सापडला: एका भेदरलेल्या, बुडणाऱ्या मुलाचा.

मी एकेकाळी एक मूल होतो. एका आईचा लाडका, एका पटांगणात पळणारा, एका झोपाळ्यावर झुलणारा. आणि एका रात्री कुणीतरी मला उचलून पाण्यात बुडवलं, आणि माझं रक्षण करायला कुणीच आलं नाही.

पण आज. आज मी इथे होतो.

आणि आज मी त्या मुलीचं ... त्या सगळ्या मुलांचं, आणि कुठेतरी त्या बुडलेल्या, हरवलेल्या स्वतःचं ... रक्षण करणार होतो.

माझ्या आतून, जिथे आता काहीच उरलं नव्हतं असं मला वाटलं होतं, तिथून एक शेवटची ताकद वर आली. भुकेची नाही. रागाची नाही. कशाचीतरी वेगळी. ज्या नाव नसलेल्या उबेबद्दल मी तुम्हाला सांगितलं ... कदाचित तीच. कदाचित तेच ते, ज्याला माणसं प्रेम म्हणतात आणि ज्याला मी आयुष्यभर ओळखलं नव्हतं.

मी त्या मुलीकडे ... त्या सगळ्या मुलांकडे ... शेवटचं बघितलं. आणि मग, 'त्याचा' हात माझ्या छातीत असतानाच, मी त्याला घट्ट मिठी मारली. पकडून ठेवलं. माझ्या सगळ्या मरणाऱ्या शक्तीनिशी.

"तू मला आत ओढून घेतोयस ना?" मी कुजबुजलो. "मग नीट घे. कारण मी तुला सोडणार नाही."

आणि मी त्या काळोखाचा शेवटचा, सगळ्यात खोल दरवाजा उघडला ... तो दरवाजा, जो मृत्यूकडे जातो ... आणि त्या पोकळीसकट, स्वतःला त्यात झोकून दिलं.

'तो' किंचाळला. त्या हजारो आवाजांत पहिल्यांदा भीती होती. कारण पोकळी कितीही मोठी असली, तरी मृत्यूच्या दरवाजात तीही नाहीशी होते. मी त्याला माझ्या मिठीत घेऊन त्या अंतिम काळोखात खेचत नेलं ... आणि त्या मिठीतून बाहेर पडलेली ती सगळी बुडलेली मुलं, ते हजारो हरवलेले चेहरे, अचानक मोकळे झाले. त्यांच्या आठवणी जगात परत आल्या. कुठेतरी, शेकडो घरांत, शेकडो आयांना अचानक आठवलं की त्यांना एक मूल होतं ... आणि त्यांचं काळीज एका विसरलेल्या दुःखानं भरून आलं.

शेवटची गोष्ट जी मला जाणवली, ती म्हणजे कनिकाचा आवाज, फार दुरून, फार धूसर:

"विरेशकाका..."

आणि मग, काळोख.

उरलेला

शाळेचं पटांगण शांत झालं.

संध्याकाळचा उजेड परत आला. झाडं परत हिरवी, जिवंत झाली. गवत परत श्वास घेऊ लागलं. ती मुलं ... गोंधळलेली,

घाबरलेली, पण जिवंत, सगळी जिवंत ... हळूहळू एकमेकांजवळ जमली. त्यांना नीटसं आठवत नव्हतं काय झालं.

मोठी माणसं धावत आली; कुणीतरी सांगितलं, "वीज गेली होती, मुलं घाबरली." कुणालाच खरं कारण कळलं नाही. कधीच कळणार नाही. कारण ज्यानं त्यांना वाचवलं, त्याचं नाव कुठल्याच गोष्टीत येणार नाही. राक्षसांची नावं गोष्टींत येत नाहीत ... फक्त त्यांची भीती येते.

पटांगणाच्या मधोमध, जिथे ते दोन काळोख एकमेकांत विरून गेले होते, तिथे फक्त एक गोष्ट उरली होती.

एक देह. माझा देह. करपलेल्या गवतावर पडलेला, स्थिर, थंड. फक्त तीनशे वर्षं नाही ... कितीतरी युगं ज्या शरीरात प्राण होता की नव्हता, ते शरीर आता निपचित होतं. शेवटचा बागुलबुवा. नामशेष जमातीतला शेवटचा. आता खराखुरा संपलेला.

मुलं घरी गेली. रात्र झाली. पटांगण रिकामं झालं. वर तोच जुना चंद्र होता ... थरथरता नाही, स्थिर.

आणि त्या चंद्राच्या मंद प्रकाशात, तो देह तसाच पडून होता. मेलेला. संपलेला.

...

रात्रीच्या त्या नितळ शांततेत, करपलेल्या गवतावर पडलेल्या त्या देहाची छाती ... हलकेच ... वर-खाली झाली.

एकदा.

मग पुन्हा.

बोटं किंचित थरथरली. करपलेल्या गवताला घट्ट पकडत, ती बोटं मातीत रुतली.

आठवतंय? ... फार पूर्वी, एका नदीकाठी, एका लांब थंड हातांच्या आकृतीनं एका भेदरलेल्या मुलाला सांगितलं होतं:

"घाबरू नकोस, पोरा. एकदा तू मेलास, की मग तुला कुणीच मारू शकत नाही."

त्या देहाचे डोळे उघडले.

पण त्या डोळ्यांत आता जे होतं, ते आधीचं नव्हतं. त्या डोळ्यांत एक नवा, अथांग, थंड काळोख होता ... आणि त्या काळोखाच्या खोल तळाशी, कुठेतरी, हजारो हरवलेल्या चेहऱ्यांची एक पुसटशी, ओली आठवण तरंगत होती.

कारण ऐका ... जेव्हा तुम्ही एखाद्या पोकळीला मिठी मारता, तेव्हा एक प्रश्न उरतोच:

ती पोकळी संपते?

की तुम्ही पोकळी होता?

तो देह हळूहळू उठून बसला. त्यानं रिकाम्या पटांगणाकडे बघितलं ... जिथे उद्या सकाळी परत मुलं येणार होती, हसणार

होती, खेळणार होती, ओरडणार होती. त्या उजाड पटांगणाकडे बघताना, त्या नव्या, थंड काळोखी डोळ्यांत एक भाव उमटला.

ऊब होती ती? ... की भूक?

इतक्या युगांनंतरही, मला अजून सांगता येत नाही.

* * *

चक्रव्यूहातील चक्रव्यूह

पार्सल

शुक्रवारची संध्याकाळ होती, आणि समांतर पब्लिकेशन्सचं ऑफिस हळूहळू रिकामं होत चाललं होतं.

बाहेरच्या हॉलमध्ये कुणाच्या तरी वाढदिवसाचा उरलेला केक एका कोपऱ्यात पडला होता आणि दोन-तीन पोरं त्याभोवती गप्पा मारत उभी होती. प्रिंटरचा घरघर आवाज, कुणाच्या तरी फोनवरची रिंगटोन, एसीची सततची गुणगुण... हे सगळे आवाज इतके ओळखीचे होते की ते आता ऐकूही येत नव्हते. वीकेंड तोंडावर आला की ऑफिसचं वातावरण आपोआप थोडं सैल होतं, आणि आजही तसंच होतं.

सिद्धार्थ देसाई आपल्या काचेच्या केबिनमध्ये लॅपटॉपवर डोळे फाडत बसला होता. समोर पुढच्या महिन्यात छापायच्या तीन पुस्तकांचे कव्हर डिझाइन उघडे होते आणि त्यातलं कुठलं फायनल करायचं हे त्याला अजून ठरवता येत नव्हतं. कॉफीचा

मग कधीच गार झाला होता. त्याने एक घोट घेतला, तोंड वाकडं केलं आणि मग बाजूला ठेवून दिला.

बाहेर पुण्याचे दिवे एकेक करून लागत होते. खिडकीतून दिसणारा रस्ता गाड्यांनी भरला होता, हॉर्न वाजत होते, कुठेतरी कुणीतरी घरी जाण्याच्या घाईत होतं. हे सगळं इतकं नॉर्मल होतं, इतकं रोजचं होतं, की त्यात विचार करण्यासारखं काहीच नव्हतं.

केबिनचा काचेचा दरवाजा ढकलून करण आत आला. हातात एक खाकी रंगाचं पार्सल होतं.

"सर, हे तुमच्या नावावर आलंय." त्याने ते टेबलवर ठेवलं. "कुरियरवाला म्हणत होता दोन दिवस इकडेतिकडे फिरून आलंय हे. ॲड्रेसच नीट नव्हतं."

सिद्धार्थने लॅपटॉपवरून नजर न हटवताच विचारलं, "सेंडर कोण?"

"तेच तर नाहीये ना सर. नाव नाही, नंबर नाही. फक्त स्टॅम्प आहे, आणि तोही..." करणने पार्सल जरा उचलून बघितलं. "अमरावती-अकोला बाजूचा वाटतोय. आणि सर, एक सांगू का... वास येतोय यातून. कसलातरी."

"वास?" आता सिद्धार्थने वर बघितलं.

"हो ना यार. म्हणजे... कुजका. ओल्या मातीचा का काय. एखादं पुस्तक पावसात भिजून मग वाळवल्यावर जसा येतो ना तसा." करणने नाक मुरडलं.

सिद्धार्थने काम थांबवलं आणि पार्सल हातात घेतलं. खरंच होतं ते. खाकी कागद ठिकठिकाणी ओलसर पडल्यासारखा होता, आणि त्यातून एक विचित्र वास येत होता. ओली माती आणि सडलेली पानं मिसळून एकत्र केल्यासारखा. वातानुकूलित, स्वच्छ, कागद-शाईचा वास असणाऱ्या त्या केबिनमध्ये तो वास एकदम विसंगत वाटत होता. जणू बाहेरच्या कुठल्यातरी ओबडधोबड जगाचा एक तुकडा कुणीतरी इथे आणून ठेवला असावा.

त्याने ड्रॉवरमधून कटर काढला आणि पार्सल फाडलं. आतून एक जाडजूड डायरी आणि एक घडी केलेली चिठ्ठी खाली पडली.

डायरीच्या पहिल्या पानावर लाल शाईत, मोठ्या अक्षरांत लिहिलं होतं...

चक्रव्यूहातील चक्रव्यूह ... निमिष बोस.

"व्हॉट द हेल!" सिद्धार्थ स्वतःशीच पुटपुटला.

निमिष.

त्याच्या पोटात एक विचित्र खड्डा पडला. निमिष बोस. गेल्या सहा महिन्यांपासून गायब असलेला माणूस. समांतरचा सर्वात मोठा बेस्टसेलर रायटर. ज्याच्या मिसिंग कंप्लेंटवर पोलिस अजूनही काहीच करत नव्हते, ज्याची बातमी दोन-तीन न्यूज चॅनलवर येऊन विरूनही गेली होती.

"हे... हे निमिष सरांचं आहे सर?" करण पुढे झुकून बघत होता. त्याच्या आवाजात आता उत्सुकतेपेक्षा जरा अस्वस्थता जास्त होती. "ते तर मिसिंग आहेत ना अजून?"

"होते मिसिंग," सिद्धार्थ डायरीची पानं उलटत म्हणाला. आत निमिषचंच हस्ताक्षर होतं, पण कुठेतरी बदललेलं. अक्षरं थरथरती, तिरकी, काही ठिकाणी एकमेकांवर चढलेली. "साला सहा महिने कुठेतरी तोंड लपवून बसतो, आणि आता डायरेक्ट अख्खं नॉवेल पाठवतोय. कमाल आहे माणसाची."

"पण सर, मला वाटलं होतं ते डिप्रेशनमध्ये गेले असतील किंवा... तुम्हाला आठवतंय ना, जायच्या आधी ते कसे झाले होते. ते शेवटचे काही महिने."

सिद्धार्थने पानांवरून नजर हटवली नाही, पण त्याचा हात क्षणभर थांबला.

आठवत होतं. नीटच आठवत होतं. निमिष शेवटच्या काही महिन्यांत बदलला होता. झोप उडाली होती त्याची. एकदा तर अर्ध्या रात्री फोन करून म्हणाला होता की तो जे लिहितोय ते त्याला झेपत नाहीये, की रात्री लिहायला बसलं की त्याला असं वाटतं की कुणीतरी त्याच्या मागे उभं राहून बघतंय. आणि सिद्धार्थ काय म्हणाला होता त्यावर? हसला होता. "अरे निमिष, हीच तर खरी मजा आहे यार. हेच विकल्या जातं. तू जितका आत जाशील ना तितकं वाचकाला आवडेल. आणखी

डार्क लिही. लोकांना घाबरवायचंय आपल्याला, गुदगुल्या नाही करायच्या आहेत काही."

त्याने स्वतःच्या हाताने निमिषला त्या खोल पाण्यात ढकललं होतं. कारण ते खपत होतं. कारण निमिषच्या प्रत्येक नव्या पुस्तकाने समांतरचा गल्ला भरत होता.

पण हा विचार त्याच्या डोक्यात जितक्या वेगाने आला, तितक्याच वेगाने त्याने तो बाजूला सारला. भावनेला कामात जागा नसते, हे त्याचं तत्त्व होतं.

"डिप्रेशन वगैरे काही नाही करण," तो चिठ्ठी उघडत म्हणाला. "महाशयांना नवीन आयडिया सुचली असणार. मिसिंग ऑथर, मिस्टिरियस पार्सल, जंगलातून आलेलं हस्तलिखित... हा सगळा पीआर स्टंट आहे रे. पुस्तक लाँच करायच्या आधीची तयारी. आणि साला किती स्वस्त लेव्हलला गेलाय बघ यासाठी."

चिठ्ठी उघडली. त्यात निमिषच्याच, पण आणखी थरथरत्या अक्षरांत लिहिलं होतं:

"सिड, मला शोधायचा प्रयत्न करू नकोस. मी आता तिथे नाहीये जिथे मी असायचो. पण हे पुस्तक जगभर पोहोचलं पाहिजे... ते थांबायला नको. फक्त शेवटचा चॅप्टर मी यात जोडलेला नाही. तुला तो हवा असेल, तर तुला स्वतः रानशेंदरीला यावं लागेल. ... निमिष."

सिद्धार्थने चिठ्ठी दोनदा वाचली. मग एकदा हसला. "वा. क्लायमॅक्स हवा असेल तर जंगलात या. मस्त. मार्केटिंगचा कोर्स लावलाय का काय याने तिकडे बसून."

"रानशेंदरी? हे कुठलं गाव आहे सर?" करणने विचारलं.

"बघूया." सिद्धार्थने फोन उचलला आणि गुगल मॅप्स उघडून त्यात टाइप केलं... रानशेंदरी.

स्क्रीनवर थोडा वेळ चक्र फिरलं.

नो रिझल्ट्स फाउंड.

त्याने स्पेलिंग बदलून बघितलं. इंग्रजीत टाइप केलं. परत मराठीत. प्रत्येक वेळी तेच. मॅपवर फक्त अमरावती आणि अकोल्याच्या बॉर्डरवर पसरलेलं मेळघाटचं घनदाट जंगल दिसत होतं... एक मोठा हिरवा डाग, ज्याच्या मध्यभागी कुठल्याही गावाचं नाव नव्हतं. ना रस्ता, ना खूण, काहीच नाही.

"इंटरेस्टिंग," सिद्धार्थ पुटपुटला, पण त्याच्या आवाजात भीतीचा लवलेशही नव्हता. उलट त्याला आता मजा यायला लागली होती. एक गाव जे मॅपवरच नाही. म्हणजे निमिषने ही गोष्ट पुरती प्लॅन करून ठेवली आहे. कदाचित जिओ-टॅगिंग बंद असलेलं एखादं आतलं पाडं असेल, किंवा निमिषने मुद्दाम असं नाव वापरलं असेल की जे कुठेच सापडणार नाही. सगळ्याला एक लॉजिकल कारण होतं. नेहमीच असतं.

"सर, तुम्ही काय विचार करताय?" करणने जरा घाबरत विचारलं. त्याला सिद्धार्थच्या चेहऱ्यावरचं ते हसू माहीत होतं. ते हसू दिसलं की पुढे काहीतरी डोकेदुखी ठरलेली असायची.

सिद्धार्थने डायरी उचलली, ती बॅगेत टाकली आणि उठून उभा राहिला. खिशातून गाडीची चावी काढली.

"करण, माझ्या उद्या-परवाच्या सगळ्या मीटिंग्ज कॅन्सल कर. सोमवारी सकाळपर्यंत मी ऑफिसला नाहीये."

"म्हणजे? सर, कुठे चाललात तुम्ही अचानक?"

"मेळघाटला." सिद्धार्थ केबिनबाहेर पडत म्हणाला. करण त्याच्या मागे जवळजवळ धावत निघाला.

"मेळघाट? आत्ता? सर, रात्र होत आलीये, आणि तिकडे..."

"तिकडे काय? तिकडे माझा एक लेखक सहा महिने नाटक करत बसलाय. मी जाऊन त्याच्या कानाखाली एक देणार आहे आणि त्याला उचलून पुण्याला घेऊन येणार आहे." सिद्धार्थ लिफ्टचं बटण दाबत म्हणाला. "हा हॉरर ड्रामा इथेच संपवायचाय आता. बास झालं."

"पण सर, गाव मॅपवर पण नाहीये. तुम्हाला रस्ता कसा..."

"बोर्ड असतील रे रस्त्यावर. गाव आहे म्हणजे तिकडे जाणारा रस्ता आहे. लोक राहतात तिकडे." लिफ्टचा दरवाजा उघडला. सिद्धार्थ आत शिरला. "काळजी करू नकोस. परत

येताना निमिषला घेऊनच येतो. मग बघ कसा बेस्टसेलर काढतो आपण याच्या या वेड्या ट्रिपवर."

लिफ्टचा दरवाजा बंद झाला. करण तिथेच उभा राहिला, हातात ती फाटलेली खाकी कागदाची चिंधी घेऊन. त्यातून अजूनही तोच कुबट वास येत होता.

खाली पार्किंगमध्ये सिद्धार्थ आपल्या गाडीजवळ आला. बॅग मागच्या सीटवर टाकणार होता, पण मग त्याने डायरी बॅगेतून बाहेर काढली आणि शेजारच्या सीटवर ठेवली. का, ते त्यालाही नीट सांगता आलं नसतं. कदाचित रस्त्यात वाचता येईल म्हणून. कदाचित डोळ्यासमोर असावी म्हणून.

त्याने गाडी सुरू केली. एसी चालू केला, आणि क्षणभर थांबला.

गाडीच्या बंद, थंड हवेत आता तो वास भरून राहिला होता. ओल्या मातीचा, सडलेल्या पानांचा. शेजारच्या सीटवर पडलेल्या त्या डायरीतून तो हळूहळू पसरत होता आणि आता तो पुण्याच्या त्या स्वच्छ संध्याकाळचाच एक भाग झाला होता.

सिद्धार्थने गिअर टाकला आणि गाडी पार्किंगबाहेर काढली.

लूप

पुण्याहून निघताना सिद्धार्थच्या अंगात जो माज होता, तो अमरावती मागे पडून मेळघाटच्या घाटात गाडी शिरताशिरता हळूहळू विरत चालला होता.

रात्रभर त्याने गाडी हाणली होती. मधेच एका धाब्यावर चहा आणि कांदाभजी, बाकी सलग स्टीअरिंग. झोप त्याला तशीही फारशी लागत नसे. आयुष्यात झोपून कधी काही मिळालं नव्हतं त्याला. वीस वर्षांपूर्वी एका भाड्याच्या खोलीत एक सेकंडहँड झेरॉक्स मशीन घेऊन त्याने सुरुवात केली होती. नोट्स छापायचा, लग्नपत्रिका छापायचा, मिळेल ते काम करायचा. मग एक छोटा प्रेस, मग वितरकांच्या मागे लागून, बुकस्टॉलवाल्यांच्या उंबरठ्यावर ताटकळून, एकेक पुस्तक खपवत खपवत त्याने समांतर उभं केलं होतं. कुणी मदत केली नव्हती. कुणाच्या ओळखीने काही झालं नव्हतं. देवाला हात जोडून, नशिबाची वाट बघत बसणारी माणसं त्याला नेहमीच फसवी वाटायची. जगात फुकट काही मिळत नाही, आणि जे मिळतं ते कुणीतरी कमावलेलं असतं, हे त्याचं साधं तत्त्वज्ञान होतं. भूत, देव, नशीब, चमत्कार... ही सगळी हरलेल्या लोकांची भाषा. जिंकणारा माणूस फक्त एका गोष्टीवर विश्वास ठेवतो... स्वतःवर.

आणि म्हणूनच निमिषचं हे नाटक त्याला डोक्यात जात होतं. एक बेस्टसेलर रायटर, ज्याला सिद्धार्थनेच घडवलं होतं, जो आज जंगलात बसून पीआर स्टंट खेळतोय. ओल्या मातीचा वास भरलेली डायरी पाठवतोय. मॅपवर नसलेल्या गावात बोलावतोय.

"बघतोच तुला," तो शेजारच्या सीटवर पडलेल्या त्या डायरीकडे बघत पुटपुटला.

ऑगस्टचा महिना होता. मेळघाटचं जंगल एरवीही दाट, पण पावसाळ्यात ते एखाद्या हिरव्या, ओल्या जनावरासारखं वाटत होतं. पहाटेचा उजेड अजून नीट फुटला नव्हता, आणि आभाळ ढगांनी इतकं भरलं होतं की दिवस आहे की संध्याकाळ हेच कळत नव्हतं. गाडीच्या काचांवरून पाण्याचे ओघळ खाली सरकत होते. वायपर सतत हलत होते, पण समोरचं फारसं काही दिसत नव्हतं.

डॅशबोर्डवरच्या फोनकडे त्याचं लक्ष गेलं.

नो सर्व्हिस.

गेले दोन तास रेंज नव्हती. गुगल मॅपचा तो निळा ठिपका एकाच जागी गोठून बसला होता, जणू त्यानेही इथे यायला नकार दिला असावा. सिद्धार्थने जरा कपाळाला आठ्या घातल्या, पण घाबरला नाही. नेटवर्क नसणं ही समस्या नव्हती, सोडवायचा प्रश्न होता. तो असाच विचार करायचा. प्रत्येक अडचणीला एक उपाय असतो, फक्त तो शोधण्याची अक्कल

आणि चिकाटी लागते. मॅप गेला तर बोर्ड बघायचे. बोर्ड नसले तर माणसांना विचारायचं. गाव आहे म्हटल्यावर तिकडे जाणारा रस्ता आहे, आणि रस्ता आहे म्हटल्यावर परत येणाराही आहे. इतकं सोपं होतं ते.

रस्त्यावर मात्र भयाण शुकशुकाट होता. ना एसटी, ना ट्रक, ना एखादी दुसरी गाडी. फक्त तो आणि त्याचं इंजिन.

अचानक हेडलाईटच्या उजेडात डावीकडे एक गंजका, वाकडा लोखंडी बोर्ड दिसला. त्यावरची पिवळी अक्षरं पावसाने पुसट झाली होती, पण वाचता येत होती...

रानशेंदरी ... ४ किमी.

खाली एक बाण, जंगलाच्या आत जाणाऱ्या एका कच्च्या मातीच्या रस्त्याकडे.

सिद्धार्थने ब्रेक मारला. गाडी चिखलात थोडी घसरून थांबली. त्याने खिडकीची काच खाली केली आणि बाहेरचा वास नाकात भरला. ओली माती, सडलेली पानं. अगदी तोच वास, जो काल पुण्यात त्या डायरीतून येत होता, जो आता त्याच्या गाडीतही भरून राहिला होता.

त्याने स्टीअरिंग डावीकडे वळवलं.

तो रस्ता गाडीसाठी बनलेलाच नव्हता. गाडी जोरजोरात हेलकावे खात होती. दोन्ही बाजूंनी बांबू, काटेरी झुडपं आणि बोरीच्या फांद्या काचांवर ओरखडे ओढत होत्या. एखाद्या क्षणी सिद्धार्थला असं वाटलं की जंगल गाडीला आत येण्यापासून

रोखतंय. मग पुढच्याच क्षणी उलटं वाटलं, की ते गाडीला आत ओढतंय. त्याने तो विचार झटकून टाकला. झाडं म्हणजे झाडं. फांद्या म्हणजे फांद्या. त्यांना हेतू नसतो.

वीसेक मिनिटं त्या नरकयातना सोसल्यावर अचानक जंगल संपलं आणि एक मोकळं मैदान आलं. त्या पलीकडे रानशेंदरी.

गाव जुन्या काळातलं वाटत होतं. मातीची घरं, उतरती कौलारू छपरं, लाकडी खांब. रस्त्यांवर डांबर नव्हतं. आणि एक विचित्र शांतता सगळीकडे पसरली होती. इतकी की ती कानात बोचत होती. कुत्र्याचं भुंकणं नाही, गुरांचं हंबरणं नाही, कोंबड्याचं ओरडणं नाही. गाव होतं, पण गावाचा आवाज नव्हता.

सिद्धार्थने एका पाराजवळ गाडी थांबवली. पारावर एक म्हातारा बसला होता. फाटकं धोतर, मळका सदरा. तो संथपणे विडी ओढत होता. त्याचे डोळे पूर्ण पांढरे पडले होते. मोतीबिंदू असावा, किंवा तो आंधळा असावा.

सिद्धार्थ गाडीतून उतरला. त्याचा महागडा बूट चिखलात रुतला, पण त्याकडे लक्ष द्यायला त्याला वेळ नव्हता.

"ओ बाबा," त्याने हाक मारली. आवाजात नम्रता नव्हती. विचारायचं असलं तरी तो आज्ञा दिल्यासारखाच बोलायचा.

म्हातारा काही बोलला नाही. फक्त त्याने मान वळवून त्या पांढऱ्या, निर्विकार डोळ्यांचा चेहरा सिद्धार्थकडे केला.

"इथे निमिष बोस नावाचा कुणी राहतो का? शहरातून आलेला माणूस. लेखक."

म्हाताऱ्याने विडीचा एक लांब झुरका घेतला. "तुमी शहरातून आले काजी सायेब?"

"हो, पुण्याहून. कुठेय तो?"

म्हातारा हसला. काळे दात दिसले. "बोस सायेब त्यांच्या घरात आसतीन. पन तुमी वापस जा जी सायेब. अंधार पडाच्या आत भायेर निघा."

सिद्धार्थला हे आवडलं नाही. गावात आल्यापासून प्रत्येक गोष्ट त्याला थांबवायचा, मागे ढकलायचा प्रयत्न करत होती, आणि त्याला कुणी थांबवलेलं चालत नसे. "मला सल्ला नको. घर कुठेय एवढं सांग."

"त्या वडाच्या झाडापाशी. लाल कौलाचं घर." म्हाताऱ्याने एका दिशेने बोट केलं.

सिद्धार्थने गाडी लॉक केली आणि तो वडाकडे चालू लागला. पुढे जाताजाता त्याच्या लक्षात आलं की घरं रिकामी आहेत. दारांना कुलुपं नाहीत, पण आत कुणीच नाही. लाल कौलाच्या घराजवळ पोहोचला. लाकडी दरवाजा आतून बंद होता.

त्याने दरवाजावर थापा मारल्या. "निमिष! दार उघड. बास झाला आता तुझा हा खेळ. मला माहितीये तू आत आहेस."

आत शांतता.

त्याने खिडकीतून आत डोकावलं. आत अंधार होता. एका टेबलावर काहीतरी जुनं सामान, कागदांचा पसारा, आणि एक जुनाट टाईपरायटर पडलेला दिसला. बाकी घर रिकामं.

"डॅमिट." त्याने दरवाजावर एक लाथ मारली. त्याला वाटलं निमिष त्याला बघून कुठेतरी लपला असेल. वीस वर्षं ज्या माणसाला त्याने पोसलं, त्या माणसाने त्याला असं जंगलात फिरवावं, हे त्याच्या डोक्यात जात होतं. "ठीक आहे. सड इथेच. मी चाललो परत."

तो परत गाडीकडे आला. पारावरचा म्हातारा आता तिथे नव्हता. गावात कुठूनतरी धुकं चढायला लागलं होतं. सिद्धार्थ गाडीत बसला, त्याने रिव्हर्स घेतली आणि ज्या कच्च्या रस्त्याने आला होता, त्याच रस्त्याने गाडी हाणायला लागला.

दहा मिनिटं झाली.

पंधरा मिनिटं झाली.

रस्ता संपत नव्हता. येताना त्याला वीस मिनिटं लागली होती, हे खरं. पण आता काहीतरी वेगळं होतं. डॅशबोर्डवरचा किलोमीटरचा काटा सांगत होता की त्याने सात किलोमीटर अंतर कापलंय. इतक्या वेळात मेन रस्ता लागायला हवा होता. जंगल पातळ व्हायला हवं होतं. काहीतरी बदलायला हवं होतं. पण आजूबाजूला तेच बांबू, तीच बोरी, तेच ओले खड्डे.

सिद्धार्थने स्वतःशीच एक हिशेब मांडला. एका सेकंदात तो शांत झाला. नक्की त्याने कुठेतरी चुकीचं वळण घेतलं असणार.

जंगलात असे फाटे असतात, धुक्यात माणूस गोंधळतो, हे साधं आहे. परत फिरून बघू. हरकत नाही. आयुष्यात किती तरी वेळा रस्ता चुकलाय आणि किती तरी वेळा परत मार्ग काढलाय त्याने. हाही काढेल.

तेवढ्यात समोरचं धुकं विरळ झालं आणि त्याने करकचून ब्रेक मारला.

समोर तोच पार होता. तेच लाल कौलाचं घर. तोच वड.

तो परत रानशेंदरीच्या मध्यभागी येऊन पोहोचला होता.

काही क्षण तो नुसता बघत राहिला. मग त्याच्या तोंडून हसू फुटलं. एक चिडकं, स्वतःचीच समजूत घालणारं हसू. "ओके. ओके. एखादा यू-टर्न मारला असणार मी कुठेतरी, नकळत. होतं असं." तो परत वळला. गाडी पुन्हा त्याच रस्त्याने हाणली. आता मात्र त्याने डोळ्यांत तेल घालून बघितलं. एकही वळण घेतलं नाही. रस्ता सरळ होता. पूर्ण सरळ.

सात मिनिटांनी तो परत त्याच पाराजवळ होता.

आता मात्र त्याच्या हाताला घाम सुटला. हे शक्य नव्हतं. सरळ रस्त्याने सरळ गेल्यावर माणूस परत त्याच जागी कसा येईल? हे लॉजिकच्या विरुद्ध होतं. आणि सिद्धार्थच्या आयुष्यात लॉजिकच्या विरुद्ध काही घडत नसे.

त्याने ग्लोव्ह बॉक्समधून जुनं कंपास काढलं. एकदा ट्रेकला गेला असताना घेतलेलं. उत्तर दिशा बघायला. त्याने ते तळहातावर ठेवलं.

सुई गोल गोल फिरायला लागली. एकदा, दोनदा, तीनदा. आणि मग एका दिशेला जाऊन थांबली.

त्या लाल कौलाच्या घराकडे.

सिद्धार्थने गाडी फिरवली, कंपास हलवलं, दिशा बदलून बघितली. सुई पुन्हा फिरली आणि पुन्हा त्याच घराकडे जाऊन थांबली. तो कुठेही उभा राहिला, कशीही गाडी वळवली, सुई कायम त्याच लाल कौलाच्या घराकडेच बोट दाखवत होती. जणू या अख्ख्या जागेचं चुंबकत्व त्या एका घरात ओढून घेतलं गेलं होतं.

त्याच्या पाठीच्या कण्यातून एक थंड लहर सरकली. वीस वर्षांत त्याने स्वतःला एकच गोष्ट शिकवली होती... जग आपल्या ताब्यात असतं, फक्त ते ताब्यात घ्यायची हिंमत लागते. पण इथे, या गावात, पहिल्यांदाच काहीतरी त्याच्या ताब्यात येत नव्हतं. त्याने ठरवलं होतं बाहेर जायचं, आणि त्याचा निर्णय, त्याची मेहनत, त्याचं स्टीअरिंग... कशाचाच काही उपयोग होत नव्हता. तो जे ठरवत होता ते घडत नव्हतं. आयुष्यात पहिल्यांदा.

तो गाडीतून बाहेर पडला.

पारावर म्हातारा परत बसला होता. तसाच, विडी ओढत. जणू तो कधी उठलाच नव्हता.

सिद्धार्थ जवळजवळ धावत त्याच्याकडे गेला. त्याचा आवाज आता थोडा कापत होता, आणि त्याला स्वतःचा हा

आवाज ओळखूही येत नव्हता. "हा रस्ता मेन रोडला का जात नाही आहे? बाहेर पडायचा रस्ता कोणता आहे?"

म्हातारा हळूच उठला. त्याच्या पांढऱ्या डोळ्यांत आता एक विचित्र चमक होती. त्याने विडी जमिनीवर टाकली, आणि अत्यंत शांत, कोरड्या आवाजात म्हणाला...

"मी मगाशीच सांगतलो व्हतो सायेब. टाइम हाये तवर बाहेर जा म्हणून. आता इथून रस्ते फकस्त आत येतात. भायेर जायाचा रस्ता बोस सायेबांनी त्यांच्या इस्तराखितात अजून लिवलाच न्हायी."

इस्तराखित. हस्तलिखित. म्हाताऱ्याच्या गावरान तोंडी तो शब्द मोडून बाहेर आला होता. निमिषच्या हस्तलिखितात बाहेरचा रस्ता अजून लिहिलेला नाही, आणि म्हणून तो अस्तित्वातच नाही... हे ऐकून सिद्धार्थला क्षणभर काहीच सुचलं नाही. एका कागदावरच्या ओळींचा आणि या जिवंत मातीच्या रस्त्याचा संबंध तरी काय असू शकतो?

सिद्धार्थच्या तळहातावरचं कंपास पुन्हा एकदा हललं. सुई गिरकी घेऊन त्या लाल कौलाच्या घराकडे स्थिरावली. आणि त्याच्या भोवती, अख्ख्या गावात, तोच ओल्या मातीचा आणि सडलेल्या पानांचा वास दाटून आला होता.

चुली

म्हाताऱ्याचं ते वाक्य हवेत तरंगत राहिलं.

सिद्धार्थ काही क्षण नुसता उभा राहिला, मग त्याने मान झटकली. कागदावरच्या ओळी, हस्तलिखित, रस्ता अस्तित्वातच नाही... हे सगळं एका आंधळ्या म्हाताऱ्याच्या तोंडून ऐकून त्यावर विश्वास ठेवणं म्हणजे शुद्ध वेडेपणा. आयुष्यात त्याला शंभर वेळा सांगितलं गेलं होतं की हे होणार नाही, ते जमणार नाही. आणि प्रत्येक वेळी त्याने ते करून दाखवलं होतं. एका गावाला, या मातीच्या रस्त्याला, त्याला इथे अडकवून ठेवता येणार नव्हतं.

"बाबा," तो म्हाताऱ्याकडे वळून म्हणाला, "इथे दुसरं कुणी आहे का, जे नीट बोलेल? सरपंच, मास्तर, कुणीतरी?"

म्हातारा परत बोलला नाही. तो पारावर बसला होता, तसाच, विडी ओढत, समोरच्या रिकाम्या जागेत बघत. जणू मगाशी तो बोललाच नव्हता. जणू सिद्धार्थ तिथे नव्हताच.

आभाळ आणखी गडद झालं होतं. म्हाताऱ्याने सांगितलेली वेळ... अंधार... हळूहळू जवळ येत होती. सिद्धार्थने घड्याळात बघितलं, पण काट्यांकडे बघून त्याला नक्की किती वाजले हेच कळेना. संध्याकाळचे सहा, की रात्रीचे आठ? आभाळ ढगांनी इतकं भरलं होतं की वेळेचा अंदाजच लागत नव्हता.

त्याला आता एका गोष्टीची नितांत गरज होती. एक नॉर्मल माणूस. कुणीतरी जो हे सर्व थांबवेल, जो त्याला रस्ता दाखवेल, ज्याच्याशी निदान दोन तार्किक वाक्यं बोलता येतील.

आणि तेव्हा त्याच्या लक्षात आलं.

गाव रिकामं वाटत होतं, पण रिकामं नव्हतं. प्रत्येक घराच्या छपरातून धूर वर येत होता. पांढरट, सरळ धूर. म्हणजे चुली पेटल्या होत्या. म्हणजे आत माणसं होती. कुणीतरी स्वयंपाक करत होतं.

तो पहिल्या घराकडे जवळजवळ धावत गेला.

त्या घराच्या अंगणात एक बाई बसली होती. ती धुणं धूत होती. "ताई, जरा ऐका..." सिद्धार्थ बोलता बोलता थांबला.

तिच्यासमोर पाण्याचं घमेलं नव्हतं. दगडावर ती जे कापड आपटत होती, ते आधीच कोरडं होतं. ती ते पिळतही नव्हती. फक्त उचलायची, दगडावर आपटायची, परत उचलायची. आणि कापड दगडावर आपटल्याचा 'थप' आवाज... तो तिचे हात खाली आल्यानंतर अर्ध्या क्षणाने यायचा. जसा एखाद्या व्हिडिओत आवाज आणि चित्र जुळत नाही.

सिद्धार्थने डोळे एकदा मिटून उघडले. कसलातरी खेळ. कुणीतरी त्याला बघतंय, त्याची मस्करी करतंय. परफॉर्मन्स आर्ट, नाहीतर नाटक, नाहीतर...

"ताई!" त्याने जरा मोठ्याने हाक मारली.

बाईने वळून बघितलं नाही. ती धुणं आपटत राहिली. थप. थप.

तो आणखी जवळ गेला, अगदी तिच्या शेजारी. "मी तुमच्याशीच बोलतोय." त्याने तिच्या खांद्याला हात लावला.

तिचा खांदा थंडगार होता. आणि ती थांबली नाही. तिच्या हालचालीत त्याच्या स्पर्शाचा काहीच फरक पडला नाही, जणू त्याचा हात तिच्या खांद्यातून आरपार गेला असता. ती उचलत राहिली, आपटत राहिली.

सिद्धार्थ मागे सरकला आणि पुढच्या अंगणाकडे गेला. तिथे दोघं उभे होते, एक बाई आणि एक माणूस. ते भांडत होते. माणूस हात उडवत काहीतरी बोलत होता, बाई बोट दाखवून उलट बोलत होती. पण तेच शब्द. तेच हातवारे. सिद्धार्थ तिथवर पोहोचेपर्यंत त्यांचं भांडण एका ठिकाणी आलं, थांबलं, आणि परत त्याच पहिल्या वाक्यापासून सुरू झालं. जसा रेकॉर्ड घसरून परत त्याच जागी यावा.

त्याने आजूबाजूला नजर फिरवली. प्रत्येक छपरातून तोच पांढरट धूर वर जात होता. पण कुठूनही स्वयंपाकाचा वास येत नव्हता. भाकरीचा नाही, फोडणीचा नाही, काहीच नाही. नुसता धूर. आणि प्रत्येक घराचा धूर एकसारखाच, एकाच आकाराचा, एकाच वेगाने वर सरकणारा.

हे शक्य नाही, सिद्धार्थ स्वतःला बजावत राहिला. याला कारण असेलच. एखादा कल्ट असेल. किंवा त्या धाब्यावर

कुणीतरी त्याच्या जेवणात किंवा चहात काहीतरी मिसळलं असेल, आणि आता त्याला भास होत असतील. हो. तसंच असणार. हे सगळं त्याच्या डोक्यात चाललंय. हे खरं नाही.

पण तेवढ्यात त्याला तो माणूस दिसला.

गावाच्या मधोमध, एक म्हातारा आपल्या घराच्या दरवाजाकडे चालत होता. हळूहळू, काठी टेकत. तो दरवाजापाशी पोहोचला, हात दरवाजाला लावणार... आणि अचानक तो परत होता. दहा पावलं मागे, जिथून त्याने चालायला सुरुवात केली होती. आणि परत तो दरवाजाकडे चालायला लागला. मध्ये काहीच नाही. वळणं नाही, मागे फिरणं नाही. एका क्षणी तो दरवाजापाशी, पुढच्या क्षणी परत सुरुवातीला. जसा कुणीतरी एका दृश्याचा तोच तुकडा परत परत चालवत होता.

सिद्धार्थ बघत राहिला. एकदा. दोनदा. तीनदा. तोच माणूस, तेच चालणं, तोच झटका.

गुंगीचं औषध माणसाला असं दाखवत नाही. भास इतके अचूक नसतात. हे त्याच्या डोक्यातलं नव्हतं. हे बाहेर, त्याच्यासमोर घडत होतं. जग स्वतःच अडकत होतं, परत परत तीच एक ओळ चालवत होतं.

त्याच्या छातीतली धडधड वाढली. तो ओरडला, मोठ्याने, अख्ख्या गावाला ऐकू जाईल असा, "अरे कुणीतरी माझ्याकडे बघा तरी! मी इथे आहे!"

आणि एक बाई वळली.

सिद्धार्थचं काळीज एक क्षण उडालं. पण ती त्याच्याकडे बघत नव्हती. ती तो जिथे क्षणभरापूर्वी उभा होता, तिकडे बघत होती. त्याच्या मागच्या रिकाम्या जागेकडे. जणू तिने त्याला नाही, तर कुणीतरी आधीच लिहून ठेवलेल्या एका सूचनेला उत्तर दिलं होतं. आणि ती सूचना त्याच्या खऱ्या जागेच्या थोडी मागे राहिली होती.

ती परत वळली आणि आपल्या कामाला लागली.

तो आणखी मागे सरकला, आणि त्याची पाठ एका घराच्या भिंतीला लागली. त्या घराच्या उंबऱ्यावर एक माणूस बसला होता. मघापासून तो तिथेच होता, की आत्ताच आला, हे सिद्धार्थला सांगता आलं नसतं. पण या वेळी, पहिल्यांदाच, त्या माणसाने मान वर केली आणि सरळ सिद्धार्थकडे बघितलं.

सिद्धार्थच्या मनात एक क्षण आशा चमकली. "ऐका, मला जरा मदत..."

आणि त्या माणसाचे ओठ रुंदावायला लागले.

हसू. तो हसत होता. पण ते हसू थांबलंच नाही. ओठ रुंदावत गेले, रुंदावत गेले, एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंत, त्या चेहऱ्यावर मावणार नाहीत इतके. दात दिसले, हिरड्या दिसल्या. आणि त्या ताणलेल्या हसण्याच्या वर, त्याचे डोळे मात्र मेलेले होते. थंड, सपाट, काचेसारखे. त्या डोळ्यांचा आणि त्या हसण्याचा एकमेकांशी काडीचाही संबंध नव्हता.

त्या रुंद हसण्यातून तो माणूस बोलला, "या सायेब... तुमचीच वाट बघत होतो आम्ही."

सिद्धार्थच्या पोटात गोळा आला. "वाट बघत होता? म्हणजे? तुम्ही मला ओळखता?" त्याने पटकन विचारलं. "हे बघा, मला फक्त इथून बाहेर पडायचा रस्ता सांगा. निमिष बोस कुठे आहे? आणि या गावात चाललंय तरी काय?"

माणसाचं हसू तसूभरही कमी झालं नाही. "बसा सायेब. बसा. तुमचीच वाट बघत होतो."

"मी रस्ता विचारतोय तुम्हाला!"

"या सायेब... तुमचीच वाट बघत होतो आम्ही." तेच शब्द. तोच सूर. तेच ताणलेलं हसू. सिद्धार्थने काय विचारलं, याच्याशी त्या माणसाला काही देणंघेणंच नव्हतं. त्याच्या तोंडात फक्त तेवढीच वाक्यं भरून ठेवली होती, आणि तो ती परत परत ओकत होता.

सिद्धार्थला आता उमगलं. हा माणूससुद्धा त्या धुणं धुणाऱ्या बाईसारखाच, त्या भांडणाऱ्या जोडप्यासारखाच. फरक एवढाच, की याच्या स्क्रिप्टमध्ये 'पाहुणा आला की हसून बोलायचं' एवढं जास्तीचं लिहिलं होतं जणू काही. ते हसू त्याच्यासाठी नव्हतं. ते कुणासाठीच नव्हतं.

तो माणूस अजूनही हसत होता, सिद्धार्थकडे बघत, ती रिकामी वाक्यं घोळवत.

सिद्धार्थने तिथून पाय काढला. तो आता खरंच घाबरला होता. आणि तेवढ्यात त्याची नजर एका तरुण मुलावर पडली. तो मुलगा एका भिंतीला टेकून बसला होता, हातात एक तुटका चहाचा कप. तो कप तोंडाला लावायचा, रिकाम्या कपातून घोट घ्यायचा, खाली ठेवायचा, परत उचलायचा.

पण क्षणभरासाठी, एका क्षणासाठी, त्या मुलाची नजर सिद्धार्थच्या नजरेला भिडली. खरीखुरी. आणि त्या नजरेत काहीतरी होतं. भीती. ओळख. आत कुठेतरी अजून जिवंत असलेल्या कुणाची तरी तडफड. जणू तो ओरडून काहीतरी सांगायचा, इशारा द्यायचा प्रयत्न करत होता.

सिद्धार्थ एक पाऊल पुढे टाकणार...

आणि मुलाची नजर परत रिकामी झाली. ती तडफड विझली. त्याने कप उचलला, तोंडाला लावला, घोट घेतला. परत त्याच लूपमध्ये.

तो मुलगा कोण होता, त्याला काय सांगायचं होतं, सिद्धार्थला कळलं नाही. आणि आता ते कळावं अशी इच्छाही त्याला उरली नव्हती.

अंधार आता झपाट्याने उतरत होता. आणि या सगळ्या माणसांमध्ये, त्या एकसारख्या धुरामध्ये, त्या रेकॉर्डसारख्या घसरणाऱ्या आवाजांमध्ये, अंधारात उभं राहायची त्याची हिंमत होत नव्हती.

एकच जागा होती. ती लाल कौलाचं, निमिषचं घर.

तो जवळजवळ धावत त्या घराकडे गेला. ज्या दरवाजावर त्याने मगाशी लाथा मारल्या होत्या, तोच दरवाजा त्याने आता ढकलला.

आता तो सहज उघडला.

सिद्धार्थ आत शिरला आणि त्याने दरवाजा मागून ओढून घेतला. बाहेरचं गाव, ते लूप, तो धूर, सगळं दरवाजाच्या पलीकडे राहिलं. आत अंधार होता, थंडावा होता, आणि तोच ओल्या मातीचा वास. आणि कोपऱ्यात, त्या अंधारात, एका टेबलावर तो जुना टाईपरायटर शांत पडलेला होता.

टाईपरायटर

बाहेरचं गाव दरवाजाच्या पलीकडे राहिलं होतं. आत फक्त अंधार होता, आणि तोच जुना कुजका वास.

सिद्धार्थ काही क्षण दरवाजाला पाठ टेकून उभा राहिला, धपापत्या छातीने. मग त्याने स्वतःला सावरलं. घाबरून चालणार नव्हतं. घाबरणं म्हणजे हार, आणि हरायला तो शिकलाच नव्हता. विचार कर, त्याने स्वतःला बजावलं. जे काही चाललंय त्याला कारण असेलच, आणि ते कारण याच घरात असणार. निमिष इथे राहत होता. निमिषचं सामान इथे आहे. इथेच काहीतरी सापडेल... एखादी चिठ्ठी, नकाशा, बाहेर पडायचा रस्ता, काहीतरी.

त्याने खिशातून फोन काढला. रेंज नव्हतीच, पण टॉर्च चालू झाली. पांढऱ्या प्रकाशाचा झोत खोलीभर फिरला.

खोली लहान होती. भिंतींवरचा मातीचा गिलावा जागोजागी निखळला होता. एका कोपऱ्यात मोडकी खाट, तिच्यावर मळकट पांघरूण... ते एका बाजूला सारलेलं होतं, जणू कुणीतरी आत्ताच त्यावरून उठून गेलं असावं. पण घर तर रिकामं होतं. जमिनीवर कागदांचा खच. आणि मधोमध त्या टेबलावर तो काळा, जुनाट टाईपरायटर. आता त्या ओल्या मातीच्या वासात शाईचा आणि कुजक्या कागदाचा वासही मिसळला होता.

सिद्धार्थ टेबलाजवळ गेला. खाली पडलेले काही कागद त्याने उचलले. निमिषचंच हस्ताक्षर... तेच, जे त्या डायरीत होतं. ही पानं म्हणजे त्याच कादंबरीचाच भाग. त्याने टॉर्चच्या उजेडात एक पान वाचलं.

त्यावर एका गावाचं वर्णन होतं. मातीची घरं, उतरती छपरं. एक धुणं धुणारी बाई, जिच्यासमोर पाणी नव्हतं. लूपमध्ये भांडणारे दोघं. प्रत्येक चुलीतून वर जाणारा वासहीन धूर.

हातातला कागद थरथरला.

हे... हे त्यानेच मगाशी बाहेर बघितलं होतं. हुबेहूब. प्रत्येक तपशील जुळत होता.

पण मग त्याने स्वतःला समजावलं. अर्थात जुळणार. निमिषने याच गावावर कादंबरी लिहिली. त्याने हे गाव बघितलं,

आणि मग त्याबद्दल लिहिलं. सिद्धार्थ जे बाहेर बघून आला, तेच निमिषने आधी बघून कागदावर उतरवलं होतं. यात विचित्र काही नव्हतं. लेखक आपल्या आसपासचं जग लिहितो. एवढंच.

मग त्याची नजर टाईपरायटरमध्ये अडकवलेल्या कागदाकडे गेली. त्यावर अर्धी एक ओळ उमटलेली होती. त्याने वाकून वाचलं.

"सिद्धार्थने मागून दरवाजा ओढून घेतला आणि तो अंधारात उभा राहिला. आणि मोबाईल हातात घेऊन टॉर्च सुरू केली."

टॉर्च धरलेला त्याचा हात क्षणभर थबकला.

ही ओळ... ही त्याने काही मिनिटांपूर्वी केलेली कृती होती. अगदी आत्ता. याच खोलीत येऊन.

योगायोग, तो स्वतःशी पुटपुटला, पण या वेळी त्याचा आवाज जरा कमी ठाम होता. निमिषने अंदाज लावला असेल. कुणीही माणूस अशा गावात आल्यावर घाबरून घरात शिरेल, दरवाजा लावेल. साधी गोष्ट.

आणि तेवढ्यात, त्या मेलेल्या शांततेत, एक खटका दबला गेला.

खट.

सिद्धार्थ दगडासारखा थिजला.

टाईपरायटरचं एक बटण, आपोआप, खाली दबलं होतं. कुणीही त्याला हात लावला नव्हता. मग दुसरं. खट. तिसरं.

एका मागोमाग एक बटणं खाली दबत होती, वर येत होती. आतले ते बारीक लोखंडी हातोडे उठून कागदावर आपटत होते. खट. खट. खट. मग त्या काळ्या यंत्रात कुठेतरी एक घंटी वाजली, टिंग, आणि गाडी सरकत परत मागे आली.

त्याच्या हातातल्या फोनची टॉर्च एकवार मंदावली, मिणमिणली, मग परत उजळली. जणू त्या यंत्राला हलवायला कुठूनतरी ताकद ओढून घेतली जात होती.

सिद्धार्थ श्वास घ्यायचाही विसरला. तो फक्त बघत राहिला, कागदावर एकेक अक्षर उमटताना.

"सिद्धार्थ टेबलासमोर उभा होता, हातात फोनची टॉर्च. त्याच्या चेहऱ्यावर घाम होता. खोलीत त्याच्याशिवाय कुणीच नव्हतं."

ओळ संपली. यंत्र थांबलं.

सिद्धार्थने झटक्यात मागे वळून बघितलं. खोलीत कुणीच नव्हतं. खिडक्या बंद. दरवाजा बंद. तो एकटाच होता.

मग त्याच्या डोक्यातला तार्किक माणूस जागा झाला. कुणीच नाही, म्हणजे हे यंत्र कुणीतरी रिगिंग करून ठेवलंय. रिमोट. आत कुठेतरी मोटर, सोलेनॉइड, बॅटरी. हल्ली काहीही शक्य आहे.

त्याने टाईपरायटर दोन्ही हातांनी उचललं, उलटं केलं, खालून टॉर्च मारली. त्याची बोटं त्याच्या तळाशी फिरली, वायर शोधत, बॅटरीचा कप्पा शोधत, कसलातरी रिसीव्हर शोधत.

काहीच नव्हतं.

ते एक जुनं, साधं, यांत्रिक टाईपरायटर होतं. नुसती लोखंडी चाकं, स्प्रिंगा आणि हातोडे. ना वीज, ना बॅटरी, ना एकही तार. ज्याला सिग्नल देता येईल असं त्यात काहीच नव्हतं. हे यंत्र स्वतःहून एक अक्षरही टाईप करू शकत नव्हतं.

सिद्धार्थने ते परत टेबलावर ठेवलं, हळूच, जणू ते एखादं झोपलेलं जनावर असावं. तो दोन पावलं मागे सरकला.

आणि त्याच क्षणी, त्याच्या मागे, खट. खट. खट.

तो परत वळला. नवी ओळ उमटली होती.

"सिद्धार्थ झटक्यात मागे वळून खोलीभर बघतो."

त्याच्या पोटात खोलवर काहीतरी गोठलं. तो वळून बघत होता, कोण लिहितंय ते शोधायला, आणि ते शोधणंसुद्धा लिहिलं जात होतं. जो कुणी हे लिहीत होता, तो या खोलीत नव्हता. तो खोलीच्या वर कुठेतरी होता, या कागदाच्या वर. आणि त्या दिशेला सिद्धार्थला वळून बघताच येत नव्हतं.

त्याने घाबरून टॉर्च खोलीभर फिरवली. भिंतीवर त्याची स्वतःची सावली उडाली, आणि एका क्षणासाठी, तो हलल्यानंतरही, ती सावली जागीच थबकून राहिली. मग ती त्याला येऊन मिळाली.

आणि यंत्र परत बोललं.

"त्याच्या मागे, खाटेखालच्या अंधारात काहीतरी हललं."

सिद्धार्थ गर्रकन वळला, टॉर्चचा झोत खाटेखाली टाकला. काही नव्हतं. नुसता अंधार, धूळ, रिकामी जागा. पण टाईपरायटरने खरं असल्यासारखं लिहून टाकलं होतं. त्याला जे दिसत नव्हतं, ते त्या यंत्राला दिसत होतं. ते फक्त त्याची नोंद ठेवत नव्हतं. ते ही अख्खी खोली बघत होतं... प्रत्येक काळा कोपरा, त्याची नजर आणि त्याची टॉर्च जिथवर पोहोचत नव्हती तिथलासुद्धा अंधार.

त्याच्या तार्किक मेंदूने शेवटच्या एका काठीला घट्ट धरून ठेवलं. ठीक आहे. ते मला बघू शकतं. ही खोली बघू शकतं. माझ्या मागचा अंधारही बघू शकतं. पण हे सगळं बाहेरचं आहे. मी कुठे उभा आहे, माझ्या मागे काय आहे, मला घाम आलाय का... हे सगळं बाहेरून दिसतं. पण मी काय विचार करतो, ते हे लिहू शकत नाही. माझ्या डोक्यातलं कुणाला दिसत नाही. माझे विचार फक्त माझे आहेत.

या एका विचाराने त्याला धरून ठेवलं. बुडणाऱ्या माणसाने काडीला धरावं तसं.

त्याला ते तपासायचं होतं. त्याने मुद्दाम काहीतरी अनपेक्षित केलं. कसलंही कारण नसताना त्याने डाव्या हाताने जवळची एक रिकामी काचेची बाटली उचलली आणि जमिनीवर फेकली. ती फुटली नाही, नुसती घरंगळत कोपऱ्यात गेली.

क्षणभर काही झालं नाही.

मग. खट. खट. खट.

"सिद्धार्थने एक रिकामी बाटली उचलून जमिनीवर फेकली. ती घरंगळत कोपऱ्यात गेली."

सिद्धार्थच्या कपाळावरची शीर ताणली. ठीक आहे. हाच खेळ खेळायचाय? तो टाईपरायटरकडे रोखून बघत राहिला, पुढची ओळ कधी उमटते याची वाट बघत.

आणि ती उमटली. खट.. खट.. खट.. खट.. त्याने काही करण्याआधीच.

"सिद्धार्थने रागाने टाईपरायटरमधला कागद ओढून फाडला."

त्याच्या अंगावर सरसरून काटा आला.

ही ओळ त्याच्या पुढच्या कृतीची होती. आणि नेमका हाच आवेग त्याच्या आत उसळला होता... कागद खसकन ओढायचा, फाडायचा, हे संपवायचं. त्याचा हात अर्धा पुढेही गेला.

त्याच्या डोक्यातला तो अभियंता शेवटचं काहीतरी कुजबुजला. रिमोट. कुणीतरी रिमोटने. पण आता तो शब्दही त्यालाच तकलादू वाटला. रिमोटवाल्याला तो कॅमेऱ्यातून बघून त्याची नोंद ठेवता आली असती. पण त्याची पुढची कृती, त्याच्या आत याच क्षणी उसळलेला हा आवेग, तो आधी कसा लिहिणार? आणि ज्या यंत्रात त्याने एकही तार बघितली नव्हती, एकही बॅटरी बघितली नव्हती, ते कुणाचा सिग्नल तरी कसा घेणार?

रिमोट नव्हतं. कधीच नव्हतं.

नाही.

त्याने हात आवरला. उलट वागायचं. ते जे सांगेल, त्याच्या नेमकं विरुद्ध. त्याने हात मागे घेतला, कागदाला स्पर्शही केला नाही, आणि तो ठरवून दाराकडे वळला.

बघ. चुकलं. ते चुकलं.

त्याने दाराच्या दिशेने एक पाऊल टाकलं. आणि त्याच्या मागे, खट. खट. खट.

तो वळला. नवी ओळ उमटली होती.

"पण त्याने तसं केलं नाही. तो कागदाला हात न लावता दाराकडे वळला."

सिद्धार्थ नुसता बघत राहिला.

फाडलं असतं, तरी ते लिहिलेलं होतं. नाही फाडलं, तरी ते लिहिलेलं होतं. त्याने जे केलं नाही, तेसुद्धा त्या यंत्राने लिहून टाकलं होतं. तो याच्या उलट वागला, आणि त्याचं उलट वागणंही आधीच कागदावर होतं. हे यंत्र कधीच चुकत नव्हतं.

योगायोग, त्याने परत स्वतःला बजावायचा प्रयत्न केला, पण आता तो शब्द तकलादू वाटत होता. ते माझ्या एक पाऊल मागून लिहितंय, बस. एक हुशार खेळ. निमिषने दोन्ही शक्यता लिहून ठेवल्या असतील. ते फक्त मी काय करतो ते बघतंय. माझे विचार नाही. माझे विचार अजून माझेच आहेत.

पण ही समजूत त्यालाच पटत नव्हती.

संपवायचं हे. आत्ता. त्याने पुढे होऊन टाईपरायटरमधला तो कागद खसकन ओढला आणि मुठीत चुरगाळला. तोच कागद, जो फाडायचा नाही म्हणून त्याने मगाशी हात आवरला होता. आता तो त्याच्या मुठीत होता, चोळामोळा होऊन.

खोलीत परत शांतता पसरली. फक्त त्याचा स्वतःचा श्वास.

झालं. थांबलं ते.

आणि मग, त्या अंधारात, रिकाम्या टाईपरायटरची एक कळ हळूच खाली दबली.

खट.

कागद नसतानाही, तो बारीक लोखंडी हातोडा वर उठला आणि रिकाम्या रबरी रुळावर जाऊन आपटला.

आवाज

रिकाम्या यंत्राची ती खट खट काही वेळाने आपोआप थांबली.

सिद्धार्थ अंधारात उभा होता, मुठीत चुरगाळलेला कागद घट्ट धरून. त्याचा श्वास अजून जड होता. आता काय करायचं, हा एकच विचार त्याच्या डोक्यात गरगरत होता.

इथे थांबता येणार नव्हतं. या यंत्रापाशी, या खोलीत, या घरात, एक क्षणही नको होता.

तो दाराकडे वळला.

आणि तेवढ्यात खोलीच्या दुसऱ्या कोपऱ्यात काहीतरी कुरकुरलं.

सिद्धार्थने टॉर्चचा झोत तिकडे टाकला. खाटेच्या बाजूला, एका फडताळावर, एक जुना रेडिओ ठेवलेला होता. लाकडी खोक्याचा, धूळ खाल्लेला, वर्षानुवर्षं कुणी हात न लावलेला. त्याचं बटण आपोआप फिरत होतं, आणि त्यातून खरखर बाहेर पडत होती. ती जुनी, घरघरणारी खरखर, जी दोन स्टेशनांच्या मधल्या रिकाम्या जागेतून येते.

सिद्धार्थ जागच्या जागी थांबला.

खरखरीतून हळूहळू एक आवाज आकार घेऊ लागला. शब्द फुटू लागले. तुटक, लांबून येणारे, जणू कुणी खूप खोल पाण्याखालून बोलत होतं.

"...सि...सिड..."

सिद्धार्थच्या पाठीतून एक शिरशिरी सर्रकन गेली. तो आवाज त्याने ओळखला.

"निमिष?" त्याच्या तोंडून आपोआप निघालं. तो दोन पावलं रेडिओकडे गेला. "निमिष, व्हेअर आर यु डॅमीट?"

खरखर वाढली. मग कमी झाली. आणि आवाज परत आला, या वेळी थोडा स्पष्ट.

"तू... तू आलास. मला माहीत होतं... तू येणार. ते आधीच... लिहिलं होतं."

"व्हॉट? काय लिहिलं होतं? निमिष, हे सगळं काय चाललंय? हे गाव, हा रस्ता, हे टाईपरायटर... तू काय करून ठेवलंयस?" सिद्धार्थ आता रेडिओच्या समोर होता, जवळजवळ त्यावर ओरडत.

रेडिओतला आवाज क्षणभर गप्प झाला. फक्त खरखर. मग तो परत आला, आणि या वेळी त्यात काहीतरी वेगळं होतं. एक थरथर. एक भीती.

"पळ," आवाज कुजबुजला. "सिड, अजून वेळ आहे... नाही, नाहीये... मला नाही आठवत आता. मी कुठे संपतो आणि हे कुठे... अ... आ...आम्ही आता..."

आवाज मध्येच तुटला. जसा कुणीतरी त्याचा गळा दाबला असावा.

सिद्धार्थ थिजून ऐकत होता. हा निमिष होता. त्याचा मित्र, अजून कुठेतरी त्या खरखरीच्या आत अडकलेला, काहीतरी सांगायचा प्रयत्न करणारा. पण मधेच त्याच्या बोलण्यात ते 'आम्ही' कुठून यायचं? आणि तो आवाज कधीकधी निमिषचा वाटायचा, आणि कधीकधी... निमिषच्या आवाजाचं फक्त कातडं पांघरलेल्या दुसऱ्या कुणाचा.

रेडिओतून परत आवाज आला, आणि या वेळी तो जास्त जवळचा वाटला. जास्त निमिषचा.

"सिड... आठवतं?" तो कुजबुजला. "तूच म्हणायचास ना... अजून खोल जा, निमिष. अजून डार्क लिही. हेच विकल्या

जातं." एक तुटकं हसू, की हुंदका, कळलं नाही. "मी खोलात गेलो रे. तू सांगितलंस तसाच, अजून खोल... इतकं की आता... वर यायला रस्ताच उरलेला नाही."

सिद्धार्थच्या छातीत काहीतरी गोठलं. ते अर्ध्या रात्रीचे फोन. निमिषची भीती, आणि त्याने हसून उडवलेली टर. त्यानेच... त्यानेच निमिषला इथवर ढकललं होतं का?

मग आवाजातली ती थरथर परत विरली. जणू बोलता बोलता कुणीतरी त्याला आतून ओढून घेतलं. आणि परत आला तेव्हा तो वेगळा होता. गोड, संथ, भुलवणारा.

"...पण इथं आत येणं वाईट नाहीये, सिड. बाहेर काय आहे? फक्त... गोंगाट. रोजची धावपळ. रोजचं थोडं थोडं मरणं. इथे बघ, किती शांत आहे. सगळं आधीच लिहिलेलं. काही ठरवायचं नाही, काही गमवायचं नाही. फक्त लिहिलं जायचं. ये... आमच्यात ये."

सिद्धार्थच्या अंगावर शहारा आला. एका वाक्यात निमिष 'तू सांगितलंस' म्हणून त्याला टोचत होता, आणि पुढच्याच क्षणी तोच निमिष गोड आवाजात त्याला आत बोलावत होता. दोन वेगळी माणसं एकाच गळ्यातून बोलत होती. किंवा एकच माणूस... अर्धा अजून निमिष, अर्धा दुसरंच काहीतरी असल्यासारखं.

"निमिष, लिसन टू मी मॅन," सिद्धार्थ शांत राहायचा प्रयत्न करत म्हणाला. "मला फक्त बाहेर पडायचा रस्ता सांग. एवढं एकच सांग. आय विल टेक यु होम. आपण दोघं..."

"रस्ता नाहीये." आवाज आता बदलला होता. ती थरथर गेली होती. तो आता संथ होता, शांत होता, थंड होता. "बाहेर असं काहीच नाहीये, सिड. तू जे शोधतोयस, ते लिहिलंच गेलं नाहीये."

सिद्धार्थच्या अंगावर काटा आला. हा निमिषचा आवाज होता, पण निमिष नव्हता. ही तीच ओळ होती जी म्हाताऱ्याने पारावर बोलली होती. तेच शब्द. जणू ते सगळे एकाच तोंडाने बोलत होते.

आणि मग त्याला तो आवाज ऐकू आला. रेडिओतून नाही. बाहेरून.

खिडकीच्या दिशेने.

सिद्धार्थ हळूहळू वळला.

बंद खिडकीच्या फटीतून, बाहेरच्या अंधारात, चेहरे जमा झाले होते. कधी जमले, कसे जमले, त्याला कळलंच नाही. ती धुणं धुणारी बाई. ते भांडणारे दोघं. तो ओठ ताणून हसणारा माणूस. तो तरुण मुलगा. सगळे. खिडकीला नाक लावून, त्या फटीतून, आत बघत होते. त्यांचे डोळे आता पांढरे पडले होते, बुबुळं वर गेलेली, नुसते पांढरे गोळे.

आणि ते सगळे एकत्र, एकाच क्षणी, बोलले. एकाच आवाजात. निमिषच्या आवाजात.

"तू उशीर केलास, सिड."

सिद्धार्थ मागे सरकला, त्याची पाठ टेबलाला आदळली. टाईपरायटर खाली पडता पडता वाचला.

खिडकीबाहेरचे ते चेहरे हलले नाहीत. फक्त बघत राहिले, त्या पांढऱ्या डोळ्यांनी. आणि परत बोलले, सगळे एकसुरात, निमिषच्या आवाजात, पण आता त्यात गावातल्या प्रत्येक बाईचा, म्हाताऱ्याचा, लहान मुलाचा आवाज मिसळला होता.

"बाहेर ये सिड... आम्ही तुझीच वाट बघतोय."

बस. आता पुरे.

सिद्धार्थमधलं काहीतरी तुटलं. विचार करायचा थांबला. फक्त एकच ऊर्मी उरली... पळायचं. इथून, या आवाजापासून, पांढऱ्या डोळ्यांपासून, कुठेही.

तो दाराकडे धावला. कडी ओढली. दार उघडत नव्हतं. ज्या दाराने मगाशी सहज वाट दिली होती, ते आता घट्ट बसलं होतं, जणू भिंतीशी एकजीव झालं असावं. त्याने कडीला हिसके दिले, खांद्याने दार ढकललं, लाथा मारल्या. दार हललंही नाही.

"उघड!" तो ओरडला, स्वतःलाच की त्या दाराला, त्यालाच कळलं नाही.

मागे रेडिओची खरखर वाढत होती. खिडकीतले ते चेहरे अजून बघत होते. आणि त्या सगळ्या आवाजांच्या खाली,

कुठेतरी खोल, अंधुकपणे, परत ती खट. खट. खट. सुरू झाली होती. रिकामं टाईपरायटर, परत काहीतरी लिहीत होतं. सिद्धार्थ काय करणार आहे, ते आधीच कागदावर उतरवत होतं.

तो परत दाराकडे वळला, अजून एक हिसका द्यायला. पण आता दार जरा लांब गेल्यासारखं वाटलं. किंवा खोलीच आकसली होती. भिंती जवळ सरकल्यासारख्या, छत थोडं खाली आल्यासारखं. टॉर्चच्या उजेडात त्याला दिसलं, कोपऱ्यातला अंधार सरकत पुढे येत होता, खोली हळूहळू गिळत होता. हवा जड झाली. श्वासाला हवा कमी पडू लागली. जणू अख्खं घर एका मुठीसारखं त्याच्याभोवती आवळत चाललं होतं.

सिद्धार्थने खिडकीच्या लाकडी झडपेकडे धाव घेतली, ती उघडून बाहेर उडी मारायचा बेत करून. त्याने झडप ओढली.

ती उघडली.

आणि पलीकडे, अगदी त्याच्या चेहऱ्यासमोर, तो ओठ कानापर्यंत ताणणारा माणूस उभा होता, त्या पांढऱ्या डोळ्यांनी हसत. त्याने सिद्धार्थकडे बघून हळूच मान हलवली.

"वाट कुठून शोधतोय, सायेब?" तो कुजबुजला. "आम्ही तर आधीच आत आलोय."

आरसा

आणि मग, एका क्षणात, सगळं थांबलं.

तो ओठ ताणणारा चेहरा, खिडकीतले ते पांढरे डोळे, रेडिओची खरखर, ती आवळणारी भिंत... सगळं. जणू कुणीतरी एक बटण दाबलं आणि अख्खं जग गप्प झालं.

सिद्धार्थने डोळे उघडले. खिडकी रिकामी होती. बाहेर फक्त अंधार. रेडिओ बंद. खोली परत आपल्या जागी आली होती, भिंती मागे सरकल्या होत्या. घर परत नुसतं घर झालं होतं. आणि त्या शांततेत फक्त त्याच्या स्वतःच्या धपापत्या श्वासाचा आवाज.

ते गेले होते. का गेले, कुठे गेले, कळलं नाही. जणू त्यांचं काम आत्ता नव्हतंच. जणू अजून काहीतरी व्हायचं बाकी होतं, आणि त्यासाठी त्याला एकटं सोडणं भाग होतं.

त्याच्या मुठीत अजून तो चुरगाळलेला कागद होता. टाईपरायटरमधून ओढून काढलेला. बोटं इतकी घट्ट आवळली होती की दुखत होती. त्याने हळूहळू मूठ उघडली, कागद सरळ केला, टॉर्चच्या उजेडात धरला.

आणि त्याच्या काळजाचा ठोका चुकला.

मगाशी जेव्हा त्याने हा कागद चुरगाळला होता, तेव्हा त्यावर फक्त तीन-चार ओळी होत्या. आता तो वरपासून खालपर्यंत भरला होता. आणि त्या ओळींमध्ये...

"रेडिओ आपोआप चालू झाला. खरखरीतून निमिषचा आवाज आला, आणि सिद्धार्थने तो ओळखला. आवाजाने त्याला आत बोलावलं. मग खिडकीशी गावकरी जमले, पांढऱ्या डोळ्यांनी. ते एकसुरात बोलले. सिद्धार्थ घाबरून दाराकडे धावला, पण दार उघडलं नाही. घर त्याच्याभोवती आवळू लागलं."

सगळं. जे जे घडलं ते सगळं. इथे, त्याच्याच मुठीत बंद असलेल्या या चुरगाळलेल्या कागदावर लिहिलेलं होतं. त्याने जे अनुभवलं ते अक्षराअक्षरात, आधीच.

सिद्धार्थने तो कागद टाकून दिला, जणू तो निखारा असावा. आणि तो जमिनीवर पडलेल्या निमिषच्या त्या हस्तलिखिताच्या पानांकडे झेपावला. ती पानं उचलून घाईघाईने चाळली.

तेच निमिषचं हस्ताक्षर. आणि ती पानं... ती त्याचीच गोष्ट होती. पुण्याहून निघणं. घाटातला तो लूप. कंपास घराकडे रोखलेलं. गावातली ती रिकामी माणसं. हे टाईपरायटर. सगळं. प्रत्येक तपशील. ज्या डायरीत निमिषने त्याला पुण्यात बोलावलं होतं, त्या अपूर्ण कादंबरीत हे सगळं आधीच लिहिलं गेलं होतं. तो इथे पाऊल टाकायच्या कितीतरी आधी.

त्याची नजर एका ओळीवर खिळली, आणि रक्त गोठलं.

"त्या टाईपरायटरसमोर उभं असताना सिद्धार्थने स्वतःला बजावलं... माझे विचार फक्त माझे आहेत. माझ्या डोक्यातलं

कुणाला दिसत नाही. त्याला वाटलं हा त्याचा शेवटचा किल्ला आहे."

सिद्धार्थचे हात थरथरायला लागले.

हा त्याचा विचार होता. त्याच्या डोक्यातला. कुणालाही न बोललेला. ज्या एका विचाराला धरून तो उभा होता, ज्याला त्याने आपला शेवटचा आधार मानलं होतं, तो विचारसुद्धा इथे, या कागदावर, त्याच्या आधी उमटला होता. त्याचं मन कधीच त्याचं नव्हतं. ते यंत्र फक्त तो काय करतो ते बघत नव्हतं. तो काय विचार करतो, तेसुद्धा आधीच लिहीत होतं.

किल्ला पडला होता. आता काहीच उरलं नव्हतं जे त्याचं स्वतःचं होतं.

आणि मग, खालच्या ओळीत, त्याने वाचलं:

"सिद्धार्थ हे पान वाचतो आहे. त्याचे हात थरथरत आहेत. त्याला कळतंय की त्याचा प्रत्येक विचार आधीच लिहिला गेलाय."

तो. आत्ता. या क्षणी. नेमका हाच.

त्याने पुढची ओळ वाचली, आणि वाचता वाचता त्याला आधीच कळलं की ती काय सांगणार आहे...

"सिद्धार्थ हे वाक्य वाचतो, आणि कागद त्याच्या हातातून गळून पडतो."

कागद त्याच्या हातातून गळून पडला.

त्याने तो टाकायचा नव्हता. त्याची बोटं आपोआप सैल झाली. जणू ती ओळ वाचताच त्याच्या हाताने तिचंच ऐकलं.

नाही. नाही. हे होऊ शकत नाही.

सिद्धार्थ खाली वाकला, त्याने ते पान परत उचललं. आता तो ठरवणार होता. आता तो असं काहीतरी करणार होता जे या कागदावर नसेल. काहीतरी अनपेक्षित, जे कुणीच लिहू शकणार नाही. तो डोळे मिटून घेईल आणि वाचणारच नाही...

त्याची नजर नकळत पुढच्या ओळीवर गेली.

"सिद्धार्थ ठरवतो की आता आपण असं काहीतरी करायचं जे लिहिलेलं नसेल. तो डोळे मिटून न वाचायचं ठरवतो. पण हेसुद्धा लिहिलेलं आहे."

सिद्धार्थच्या तोंडून एक अस्फुट, घुसमटलेला आवाज निघाला.

तो याच्या पुढे जाऊच शकत नव्हता. तो जे काही ठरवेल, ते आधीच लिहिलं जाई. याच्या उलट वागायचं ठरवेल, तर तेही लिहिलेलं. वाचायचं थांबवेल, तर तेही लिहिलेलं. याबद्दल विचार करेल, तर तो विचारही लिहिलेला. त्याची बुद्धी, त्याचं डोकं, ज्या एका गोष्टीवर त्याने आयुष्यभर भरवसा ठेवला होता, ज्या जोरावर त्याने शून्यातून सगळं उभं केलं होतं... ती बुद्धीच आता एक लिहिलेली गोष्ट होती. एक पात्र विचार करत होतं, आणि त्याला वाटत होतं की ते स्वतःच्या मर्जीने विचार करतंय.

त्याने थरथरत्या हाताने पान पुढे केलं. आणि त्यावर, इतर सगळ्या ओळींच्या खाली, एक वाक्य होतं. बाकीच्यांपेक्षा वेगळं. जणू ते थेट त्याच्याशी बोलत होतं.

"हे गाव म्हणजे माझी कादंबरी आहे, सिड. इथलं प्रत्येक माणूस माझं एक पात्र आहे. ती धुणं धुणारी बाई, तो म्हातारा, ती सगळी... एकेकाळी ती तुझ्यासारखीच जिवंत माणसं होती. इथे आली, याच कागदावर अडकली, आणि माझी पात्रं बनली. आणि आता तू, सिद्धार्थ देसाई... तूही."

सिद्धार्थ गुडघ्यांवर कोसळला.

तो हे लिहीत होता. निमिष. त्याचा मित्र. पण... त्याच्या डोक्यात एक विचार आला, आणि तो त्याला तळापासून हादरवून गेला. निमिष हे लिहीत असेल, तर मग रेडिओतून ऐकू आलेला तो तडफडणारा निमिष कोण होता? जो स्वतः याच कागदावर अडकला होता? जो म्हणाला होता, मला नाही आठवत मी कुठे संपतो...

निमिषसुद्धा एक पात्र होता. कुणीतरी निमिषलाही लिहीत होतं. आणि त्या कुणाला आणखी कुणीतरी. एक कादंबरी, दुसऱ्या कादंबरीच्या आत. एक चक्रव्यूह, दुसऱ्या चक्रव्यूहाच्या आत. आणि सगळ्यात तळाशी कोण होतं, शेवटी हे सगळं कोण लिहीत होतं... त्याचा विचार करताच सिद्धार्थच्या मनाला भोवळ आली. कारण त्या प्रश्नाला तळच नव्हता. खाली फक्त अंधार होता, आणि त्या अंधाराखाली अजून अंधार.

त्याने शेवटचं पान उलटलं. त्यावरच्या ओळी त्या क्षणापर्यंत आल्या होत्या. त्याचं गुडघ्यांवर कोसळणं. त्याच्या मनातली ती भोवळ. आणि मग...

पान कोरं होतं.

पुढे काहीच नव्हतं. फक्त रिकामा, पांढरा कागद.

सिद्धार्थ त्या कोऱ्या पानाकडे बघत राहिला. आणि मग, त्याच्या डोळ्यांसमोर, त्या रिकाम्या कागदावर एक अक्षर उमटलं. मग दुसरं. कुठलंही यंत्र नव्हतं, कुठलाही हात नव्हता. नुसती अक्षरं, एकेक करून, त्या पानावर उगवत होती. त्याचा पुढचा क्षण, आत्ता, इथे, लिहिला जात होता.

तो त्या पेनाच्या अगदी टोकाशी उभा होता.

आणि पेन हलत होतं.

निमिष

सिद्धार्थ गुडघ्यांवरच होता, त्या कोऱ्या पानावर एकेक अक्षर उगवताना बघत. हातातली टॉर्च थरथरत होती. आणि मग, त्या मेलेल्या शांततेत, त्याला जाणवलं... खोलीत तो एकटा नव्हता.

समोर, अंधाराच्या एका कोपऱ्यात, कुणीतरी उभं होतं.

सिद्धार्थने हळूहळू टॉर्च वर नेली. आणि त्याचा श्वास घशातच अडकला.

निमिष.

तोच होता. तीच उंच, हडकुळी आकृती. तेच कपडे, जे सहा महिन्यांपूर्वी तो शेवटचा दिसला होता तेव्हाचे... आता मातीने आणि बुरशीने माखलेले. तोच चेहरा. पण सिद्धार्थचा जुना मित्र त्यात कुठेच नव्हता.

निमिष श्वास घेत नव्हता. त्याची छाती हलत नव्हती. तो इतका स्थिर होता की तो खरंच तिथे आहे, की भिंतीवर रंगवलेलं चित्र आहे, हेच कळत नव्हतं. आणि टॉर्चचा प्रकाश... तो त्याच्या अंगावर पडत होता, पण नीट बसत नव्हता. जणू निमिष तो प्रकाश अर्धवट गिळत होता. त्याच्या मागे भिंतीवर त्याची सावलीही नव्हती.

आणि त्याचे डोळे. ते गावकऱ्यांसारखे पांढरे नव्हते. ते खोल होते. खूप खोल. त्यात बघितलं की तळच लागत नव्हता. जसा त्या कोऱ्या पानाखाली, त्या न सुटणाऱ्या प्रश्नाखाली अंधार होता... तसाच.

"निमिष..." सिद्धार्थचा आवाज नीट फुटला नाही. तो उठून उभा राहिला, मागे सरकत. "तू... व्हॉट आर यु? तू काय झालायस? हे... हे सगळं काय चाललं आहे?"

निमिष बोलला. आणि त्याचा आवाज त्या रेडिओतल्या आवाजासारखाच होता. कधी जवळचा, कधी खूप लांबचा. कधी निमिषचा, कधी निमिषच्या आवाजातून बोलणाऱ्या दुसऱ्या कुणाचा.

"मलाही नक्की माहीत नाही, सिड."

सिद्धार्थ थबकला. हे उत्तर त्याला अपेक्षित नव्हतं.

"मी फार खोल गेलो," निमिष म्हणाला, संथपणे. "लिहीत लिहीत. रोज थोडं अजून आत. आणि एका रात्री मला एक... दार सापडलं. कागदाच्या आणि माझ्या मधलं. मला वाटलं मीच ते उघडतोय. पण उघडल्यावर कळलं... मीच त्या वाक्यातला एक शब्द आहे. कुणीतरी लिहीत असलेल्या वाक्यातला."

तो क्षणभर थांबला. ते खोल डोळे सिद्धार्थवर रोखलेले.

"त्याच्या वर काय आहे, कोण लिहितंय, मला आजही माहीत नाही. मी फक्त... इथे आहे. आत. आणि आता तूही आत आहेस."

"नाही." सिद्धार्थने जोरात मान हलवली, मागे सरकत. "धिस इज नॉट रिअल. तू माझ्या डोक्याशी खेळतोयस, निमिष. हे हिप्नोसिस असेल, नाहीतर त्या धाब्यावर कुणीतरी माझ्या जेवणात किंवा चहात काहीतरी मिसळलं असंल. यु आर जस्ट मेसिंग विथ माय हेड, मॅन. हे सगळं माझ्या डोक्यातलं आहे, बस्स."

निमिष चिडला नाही. हसला नाही. फक्त शांतपणे म्हणाला, "तू अगदी हेच म्हणशील, सिड. ते पण आधीच लिहिलंय त्या पानावर. खालच्याच ओळीत. बघायचंय?"

सिद्धार्थने त्या पानाकडे बघितलं नाही. बघायची हिंमतच झाली नाही. "स्टॉप इट. बंद कर हे," तो घशातून म्हणाला. "का? मीच का, निमिष? जगात एवढी माणसं आहेत... मग तू

मलाच का ओढलंस इथं? आय ॲम जस्ट अ पब्लिशर. डॅमीट... फॉर फक सेक... व्हॉट डू यु वॉन्ट फ्रॉम मी, हां?"

निमिष काही क्षण काहीच बोलला नाही. ती शांतता त्याच्या प्रश्नापेक्षा मोठी होती.

मग तो म्हणाला, अगदी हळू, "तुला अजूनपण वाटतं... तू स्वतःच्या मर्जीनं आलास इथं?"

सिद्धार्थच्या पोटात खड्डा पडला. पण त्याने तो विचार जोरानं बाजूला ढकलला. नाही. आत्ता विचार नको. इथून भाईर पडायचं, फक्त तेवढंच. आणि अचानक त्याला एक गोष्ट सुचली, आणि तीच त्याची शेवटची आशा होती.

"निमिष, ऐक माझं." तो एक पाऊल पुढं गेला, आवाज मऊ करत. "चल माझ्यासोबत. राईट नाऊ. गाडी बाहेरच आहे. आपण दोघं निघून जाऊ इथून. मी तुला डॉक्टरकडं नेतो, ट्रीटमेंट देतो, काहीपण करतो... पण तू इथं राहू नकोस. प्लीज यार. चल."

आणि त्या क्षणी, निमिषच्या त्या अथांग डोळ्यांत काहीतरी हललं. खोल कुठूनतरी, खराखुरा निमिष परत वर आला. आणि या वेळी तो खरंच सिद्धार्थचा जुना मित्र वाटला.

"आठवतं का रे, सिड?" तो कुजबुजला, आणि आता त्याच्या आवाजातली ती यांत्रिक थंडी गेली होती. "माझं पहिलं बुक. ते छापायला कुणीच तयार होत नव्हतं. सगळे म्हणायचे, मराठीत डार्क हॉरर कोण वाचतो. एकटा तू म्हणाला होतास...

निमिष, तुझ्यात दम आहे, आपण छापू हे. त्या रात्री आपण दोघं तुझ्या त्या लहानशा ऑफिसात बसून प्रूफं चेक करत होतो. कटिंग चहा पीत. रिमेंबर?"

सिद्धार्थचा घसा दाटून आला. "हो रे. आठवतंय. सगळं आठवतंय. चल ना मग, परत जाऊ तिथं. आपण झिरोपासून सुरू करू परत."

"आय कान्ट, सिड." निमिषचा आवाज तुटला. खरीखुरी वेदना त्यात होती. "खूप उशीर झालाय. मी आता या पानांचाच एक भाग झालोय रे. माझी सुटका नाही यातून. पण तू..." त्याचे डोळे अचानक खूप जिवंत, खूप घाबरलेले झाले, आणि आवाज घाईचा, खालचा झाला. "तू ऐक माझं. गेट आउट. आत्ता निघ, आणि मागं वळून बघू नको. आणि सिड, ते बुक... ते बुक कधीच, कुणालाही ..."

पण वाक्य पूर्ण व्हायच्या आधीच तो परत खाली ओढला गेला. खराखुरा निमिष बुडाला. ते डोळे परत थंड, दूर, अथांग झाले. जे काही तो सांगणार होता, ते अर्ध्यावरच कुठंतरी गिळलं गेलं.

निमिष हळूच बाजूला सरकला.

त्याच्या मागे खोलीचा तो दरवाजा होता. ज्या दाराने मगाशी सिद्धार्थला कोंडून ठेवलं होतं, ज्याला त्याने लाथा मारल्या होत्या, ते दार आता हळूहळू, आपोआप, करकर आवाज करत उघडत होतं.

आणि त्या उघड्या दारातून बाहेर, सिद्धार्थला रस्ता दिसला.

जो रस्ता आधी नव्हता. गावात येताना नव्हता, गावातून पळताना नव्हता. तोच कच्चा मातीचा रस्ता, पण आता तो जंगलाच्या आतला वाटत नव्हता. तो सरळ बाहेर जात होता. अंधारात, दूर कुठेतरी.

सिद्धार्थ दाराकडे आणि निमिषकडे आळीपाळीने बघत राहिला.

"का?" तो कुजबुजला. "तू मला का जाऊ देतोय?"

निमिषने उत्तर दिलं नाही. त्याचे ते खोल, अथांग डोळे फक्त सिद्धार्थवर रोखलेले होते. वाट बघत.

क्षणभर सिद्धार्थ हलला नाही. हे खरं असेल का? हे दार, हा रस्ता... खरंच बाहेर जातोय का? की हा अजून एक सापळा आहे?

पण मग बाहेरच्या त्या अंधारातून येणारी थंड हवा त्याच्या चेहऱ्यावर आली. खरीखुरी, मोकळी हवा. आणि त्या एका श्वासासरशी, बुडणाऱ्या माणसाच्या हातात काठी यावी तशी, त्याच्या मनात आशा सळसळली. रस्ता आहे. बाहेर पडता येईल. तो सुटू शकतो.

बाकी सगळे विचार गळून पडले. फक्त एकच गोष्ट उरली... पळायचं.

सिद्धार्थ दाराकडे धावला.

तो त्या उघड्या दारातून बाहेर पडला. गाव त्याच्याभोवती पसरलं होतं... अंधारात, शांत. ती लूपमधली माणसं आता कुठेच दिसत नव्हती. त्याची गाडी पारापाशी तशीच उभी होती. तो धावत तिच्यापाशी पोहोचला, थरथरत्या हाताने दार उघडलं, आत कोसळला.

शेजारच्या सीटवर ती डायरी तशीच पडली होती. तोच कुबट वास.

त्याने चावी फिरवली. इंजिन पहिल्याच झटक्यात सुरू झालं. त्याने तो नवा रस्ता धरला, ॲक्सिलेटरवर पाय दाबला, आणि गाडी अंधारात पुढे झेपावली.

मागे, आरशात, त्याला निमिष दिसला. लाल कौलाच्या घराच्या दारात उभा. तो हलला नाही. त्याला अडवायलाही आला नाही. फक्त उभा राहून, त्या अथांग डोळ्यांनी, सिद्धार्थची गाडी अंधारात विरत जाताना बघत राहिला.

सुटका

रस्ता संपतच नव्हता, पण आता त्याची दिशा बदलली होती.

रानशेंदरीतून बाहेर पडल्यापासून सिद्धार्थने गाडीचा वेग कमी केला नव्हता. हातातलं स्टीअरिंग घट्ट धरून, डोळे रस्त्यावर खिळवून, तो फक्त पुढं जात होता. आरशात मागं

बघायची त्याची हिंमत होत नव्हती. जणू मागं बघितलं की ते गाव परत समोर येईल, तो परत त्या पारापाशी पोहोचेल.

पण तसं झालं नाही.

जंगल हळूहळू पातळ होत गेलं. बांबूची-बोरीची दाटी कमी झाली. आणि मग, अचानक, समोर एक डांबरी रस्ता आला. खराखुरा, काळा, पांढरे पट्टे ओढलेला मेन रोड.

सिद्धार्थच्या छातीतून एक मोठा श्वास सुटला. जवळजवळ रडूच फुटलं त्याला. त्याने गाडी त्या डांबरी रस्त्यावर घेतली आणि टायरखालचा तो गुळगुळीत, ठोस स्पर्श त्याला आयुष्यात कधी नव्हता इतका सुंदर वाटला. हे खरं होतं. हे जग खरं होतं. डांबर, पांढरे पट्टे, रस्त्याकडेची झाडं... सगळं नॉर्मल, सगळं ... सगळं खरं.

"झालं," तो स्वतःशीच मोठ्यानं म्हणाला, आणि त्याच्या आवाजात एक वेडसर हसू होतं. "बस्स. संपलं ते सगळं."

त्याला आता ते सगळं हास्यास्पद वाटायला लागलं. तो टाईपरायटर, तो रेडिओ, ते पांढऱ्या डोळ्यांचे गावकरी, निमिषचं ते विचित्र रूप... हिप्नोसिस. गॅस. त्या धाब्यावरचं काहीतरी. कुठल्यातरी केमिकलनं त्याचा मेंदू काही तास खेळवला होता, बस्स. आता डोकं साफ होत होतं. सायन्स. लॉजिक. जे त्याला आयुष्यभर पुरलं होतं, ते इथंही पुरलं होतं. भूत-बित्त काही नसतं. कधीच नसतं.

थोड्या वेळानं समोर दिवे दिसले. एक पेट्रोल पंप, आणि त्याच्या पुढं हायवेवरचा एखादा ढाबा. माणसांचे आकार. एका ट्रकचा हॉर्न. सिद्धार्थला त्या दिव्यांकडे बघून इतकं बरं वाटलं की त्याचे डोळे भरून आले. माणसं. साधी, जिवंत, खरीखुरी माणसं.

गाडीतलं इंधन तसंही संपत आलं होतं. त्यानं गाडी पंपावर घेतली.

पंपावर एकच पोरगा होता. मळका निळा युनिफॉर्म. सिद्धार्थनं काच खाली केली. "फुल टाकी कर."

पोरगा काही बोलला नाही. त्यानं नोझल टाकीत घातली आणि समोर, अंधारात कुठंतरी बघत उभा राहिला. सिद्धार्थनं त्याच्याकडे एकदा बघितलं. त्याचे डोळे जरा विचित्र वाटले, पण सिद्धार्थनं फार लक्ष दिलं नाही. रात्रपाळीचा कंटाळलेला पोरगा. एवढंच.

"भाऊ, इथून पुण्याला जायला कुठला रस्ता पकडायचा?" सिद्धार्थनं विचारलं.

पोरगा एक क्षण थांबला. मग म्हणाला, "पुणं?" जणू त्यानं ते नाव पहिल्यांदाच ऐकलं असावं. मग त्यानं एका दिशेला बोट केलं, अंधारात, कुठल्याही बोर्डाशिवाय. "त्या रस्त्यानं."

सिद्धार्थनं डोकं हलवलं. विचित्रच पोरगा. पण जाऊदे. रस्ता तर मिळाला. त्यानं पैसे काढायला खिशात हात घातला, आणि सहज त्याची नजर फोनकडे गेली.

फोन आता रेंजमध्ये यायला हवा होता. पण स्क्रीनवर अजून 'नो सर्व्हिस'च होतं. आणि वेळ... फोनवर रात्रीचे पावणेदोन वाजले होते. त्यानं पंपाच्या भिंतीवरच्या जुन्या घड्याळाकडे बघितलं. त्यावर साडेआठ. त्यानं परत फोनकडे बघितलं. परत घड्याळाकडे.

कुठलं तरी एक बंद पडलं असेल, त्यानं विचार केला, आणि खांदे उडवले. घड्याळं बिघडतात. फोनची बॅटरीही या सगळ्यात गंडली असेल. सोडून दे. पुढं चल.

त्यानं पैसे दिले, गाडी सुरू केली आणि पंपावरून बाहेर पडला.

रस्त्यावर अधूनमधून समोरून एखाद्या गाडीचे दिवे यायचे, एखादा ट्रक धडधडत निघून जायचा. जग खरं होतं. माणसं फिरत होती. पण थोड्या वेळानं सिद्धार्थच्या मनात एक बारीक गोष्ट खटकली, इतकी बारीक की त्यानं ती लगेच सोडूनही दिली. समोरून येणारी प्रत्येक गाडी, प्रत्येक ट्रक, त्याच्या विरुद्ध दिशेनं जात होता. मेळघाटकडे. आत. आणि त्याच्या दिशेनं, बाहेर पडणाऱ्या त्या रस्त्यावर, पुण्याकडे जाणारी एकही गाडी नव्हती. फक्त तो. एकटा.

पण रात्रीचे दोन वाजले होते, त्यानं स्वतःला सांगितलं. या वेळी कोण कशाला कडमडायला शहराकडे जाईल. तो बाहेर पडला होता, तो जिवंत होता, बाकी सगळं नंतर.

स्टीअरिंगवरचं बटण दाबून त्यानं म्युझिक सिस्टीम सुरू केली, थोडं माणसांच्या आवाजासाठी, थोडं स्वतःला नॉर्मल वाटावं म्हणून. स्क्रीनवर एफएमचं एक प्रीसेट स्टेशन लागलं. कुठलंतरी जुनं हिंदी गाणं वाजत होतं. सिद्धार्थनं सुटकेचा निःश्वास सोडला आणि त्या सुरांत हरवायचा प्रयत्न केला.

पण काही सेकंदांनी त्याच्या लक्षात आलं. गाणं पुढं सरकत नव्हतं. तीच एक ओळ, तोच एक तुकडा, परत परत वाजत होता. जसा रेकॉर्ड एका ठिकाणी अडकावा.

त्याच्या हातातली बोटं क्षणभर थिजली.

मग त्यानं स्क्रीनवर दुसरं स्टेशन बदललं. सिस्टीम हँग झाली असेल, त्यानं स्वतःला चरफडत सांगितलं. नवीनच गाडी घेतलीय, इतक्यात सॉफ्टवेअरचा घोळ पण झाला का? बस्स एवढंच. त्यानं म्युझिक सिस्टीम पूर्ण बंद करून टाकली.

आणि मग त्याची नजर शेजारच्या सीटवर गेली.

ती डायरी.

ती अजून तिथंच होती. तीच जाडजूड डायरी, लाल-काळ्या-निळ्या अक्षरांची, ज्यातून तो कुबट वास येत होता. ज्या डायरीनं हे सगळं सुरू केलं होतं.

सिद्धार्थ आता थांबला. रस्त्याच्या कडेला गाडी घेतली. इंजिन बंद केलं. आणि त्या डायरीकडे बघत राहिला.

हीच. ही सगळ्याची मुळी हीच होती. हे पुस्तक. निमिषचं हे शापित पुस्तक. हेच जर नसतं, तर तो कधीच त्या नरकात गेला

नसता. त्याच्या मनात एक गोष्ट स्पष्ट झाली, आणि ती गोष्ट म्हणजे एक प्रकारचा सूड होता.

त्यानं डायरी उचलली. गाडीचं दार उघडून तो बाहेर पडला. रस्त्याच्या कडेला, कोरड्या गवतावर, त्यानं ती डायरी टाकली. गाडीच्या बूटमधून पेट्रोलची जेरी कॅन आणि पाईप काढला. गाडीतलं थोडं पेट्रोल काढलं आणि जेरी कॅननेच डायरीवर ओतलं. खिशातून लायटर काढलं. कधीतरी सिगारेटसाठी ठेवलेलं, आज वर्षानुवर्षांनी कामी येणारं.

"निमिष, सॉरी यार," तो पुटपुटला, त्या डायरीकडे बघत. "पण हे संपायला हवं."

त्यानं लायटर पेटवलं आणि डायरीच्या एका कोपऱ्याला आग लावली.

पेट्रोलने ओली झालेली पानं पेटायला वेळ लागला नाही. जुना, कोरडा कागद आणि पेट्रोल मिळून भसकन पेट घेऊ लागला. पिवळ्या-केशरी-निळसर ज्वाळा त्या अंधारात उठल्या. निमिषची ती थरथरती अक्षरं एकेक करून काळी पडली, वळवळली, राख झाली. आणि सिद्धार्थ तिथं उभा राहून बघत राहिला, चेहऱ्यावर त्या आगीचा उजेड, आणि ओठांवर एक थकलेलं, समाधानाचं हसू.

विज्ञानाचा विजय. कागद जळत होता. ओळी संपत होत्या. आणि त्याच्याबरोबर ते गाव, तो लूप, ती सगळी दहशत, सगळं

जळून राख होत होतं. त्यानं ते संपवलं होतं. स्वतःच्या हातानं. एका लायटरनं.

ज्वाळा विझत आल्या. काळ्या राखेचा एक ढिगारा उरला, आणि त्यातून एक पातळ धूर वर वळवळत निघाला. सिद्धार्थनं बुटानं ती राख विस्कटली, इकडंतिकडं केली, पूर्ण विझवली. काहीच उरलं नाही. फक्त काळी राख आणि माती.

तो वळला, जेरी कॅन बूटमध्ये भिरकावली, गाडीत येऊन बसला, आणि दार लावलं. एक खोल, सुटकेचा श्वास घेतला. आयुष्यात पहिल्यांदा त्याला असं वाटलं की त्यानं काहीतरी हरवलेलं परत मिळवलंय. स्वतःवरचा ताबा. जग परत त्याच्या मुठीत आलं होतं.

त्यानं गिअर टाकला.

आणि गाडीतली ती म्युझिक सिस्टीम, जी त्यानं हातानं बंद केली होती, आपोआप परत चालू झाली. स्क्रीन उजळली. स्पीकरमधून परत खरखर.

आणि त्या खरखरीतून तोच आवाज आला. ते गाणं नाही. बातमी नाही. तो आवाज. संथ, थंड, ओळखीचा. रानशेंदरीतल्या त्या पारावर, त्या जुन्या रेडिओतून, त्या प्रत्येक गळ्यातून आलेला तोच एक आवाज.

"बाहेर असं काहीच नाही, सिड. तू जे जाळलंस, ते कागदात नव्हतंच."

सिद्धार्थच्या काळजाचा ठोका चुकला. त्यानं झटक्यात स्क्रीनवर बोट दाबून सिस्टीम बंद केली. आवाज थांबला. स्क्रीन काळी पडली.

काही क्षण तो नुसता बसून राहिला, स्टीअरिंगवर हात, धपापत्या छातीनं.

मग त्यानं डोकं झटकलं. एक थकलेलं हसू त्याच्या चेहऱ्यावर परत आलं. इमॅजिनेशन. नुसतं इमॅजिनेशन. इतक्या दहशतीमध्ये वावरल्यावर डोकं असे खेळ खेळणारच. तो थकला होता. त्याला झोप हवी होती, घर हवं होतं, पुणं हवं होतं. एकदा घरी पोहोचलं की सगळं नॉर्मल होईल. हे सगळं एक वाईट स्वप्न म्हणून विसरून जाईल तो.

त्यानं ॲक्सिलेटर दाबला. गाडी पुढं निघाली, पुण्याच्या दिशेनं, त्या मोकळ्या, अंधाऱ्या हायवेवर.

स्टीअरिंगवरच्या त्याच्या उजव्या हाताकडे त्याचं लक्ष गेलं नाही. नखांच्या कडेला, बोटांच्या रेषांमध्ये, ओल्या मातीची एक बारीक, काळसर खूण साचली होती. कितीही चोळलं असतं, तरी ती आता निघाली नसती.

आणि गाडीच्या बंद, थंड हवेत, तो कुबट वास अजून तसाच भरून होता. ओल्या मातीचा. सडलेल्या पानांचा. डायरी जळून राख झाली होती, पण वास मात्र अजून तिथंच होता. त्याच्यासोबत. गाडीत.

घराकडे निघालेला.

परत

पुणं कधी आलं, त्याला नीट कळलंच नाही.

रात्रभर तो गाडी हाणत होता. कधीतरी पहाटे डोळ्यांवर झापड आली, हायवेवरच्या एका धाब्यापाशी त्यानं गाडी लावली, सीट मागं टाकली, आणि डोळे मिटले. जाग आली तेव्हा ऊन वर आलं होतं. गाडीवर खिडकीजवळ एक कावळा कांव... कांव... ओरडत होता. आजूबाजूला ट्रक, चहाच्या टपऱ्या, माणसांची नेहमीची गडबड. सगळं इतकं... साधं. इतकं खरं की त्याला हसूच आलं.

कालच्या रात्रीची ती दहशत आता दिवसाच्या उजेडात विरून गेल्यासारखी वाटत होती. एखादं वाईट स्वप्न सकाळी कसं फिकं पडतं, तसं.

त्यानं चहा घेतला, तोंडावर पाणी मारलं, आणि उरलेला रस्ता अक्षरशः कापत आला. दुपारच्या आत तो शहरात शिरला. ट्रॅफिक, हॉर्न, सिग्नल, गर्दी. आयुष्यात कधीच पुण्याच्या ट्रॅफिकमध्ये अडकून त्याला बरं वाटलं नव्हतं. पण आज वाटलं.

फोनला रेंज परत आली होती. नोटिफिकेशन्सचा पाऊस पडला... मेसेज, मिस्ड कॉल, मेल. नॉर्मल आयुष्य. त्यानं एक मोठा श्वास घेतला. झालं. परत आलं सगळं रुळावर.

घरी जायच्या आधी त्यानं गाडी ऑफिसकडे वळवली. का? ते त्यालाही नीट सांगता आलं नसतं. कदाचित स्वतःच्या जागी,

स्वतःच्या माणसांत, स्वतःच्या त्या टेबलाशी बसून त्याला खात्री करायची होती... की हो, मी परत आलोय, सगळं तसंच आहे, मी जिंकलोय.

ऑफिसच्या पार्किंगमध्ये गाडी लावताना त्याला जाणवलं की आपण किती मळकट, थकलेले, खंगलेले दिसत असू. दोन दिवसांची दाढी, चुरगाळलेले कपडे. असो. आत जाऊन कुणाला फार काही सांगायचं नव्हतंच. एक सेल मीटिंग गंडली, ट्रिप वाया गेली, एवढंच म्हणायचं.

लिफ्टमधून तो वर आला. समांतर पब्लिकेशन्सचं काचेचं ते दार ढकललं.

आणि ऑफिसमध्ये पाऊल टाकताच त्याला काहीतरी वेगळं जाणवलं.

गडबड होती. नेहमीपेक्षा जास्तच. फोन वाजत होते, लोक इकडंतिकडं पळत होते, कुणीतरी मोठ्यानं हसत होतं. हवेत एक प्रकारची झिंग होती. सेलिब्रेशनची.

रिसेप्शनवरची मुलगी त्याला बघून उठून उभीच राहिली. "सर! तुम्ही आलात! अभिनंदन सर!"

सिद्धार्थ क्षणभर थबकला. डोक्यावर आठ्या घालून, अभिनंदन? कशाचं?

तेवढ्यात करण धावत आला. त्याचा असिस्टंट. हातात टॅबलेट, चेहऱ्यावर इतका आनंद की तो फुटायचाच बाकी होता.

"सर! कुठं होतात तुम्ही? काल रात्रीपासून फोन ट्राय करतोय, लागतच नव्हता!" करण एका दमात बोलत होता. "सर, इट्स इन्सेन! कम्प्लीट इन्सेन! रातोरात खपलं सगळं!"

"काय खपलं?" सिद्धार्थचा आवाज कोरडा होता.

करणनं टॅबलेट त्याच्यासमोर धरला. "बुक सर! निमिष बोसचं नवीन बुक! 'चक्रव्यूहातील चक्रव्यूह'!"

जमिनीवरचं काहीतरी सिद्धार्थच्या पायाखालून सरकल्यासारखं वाटलं.

"काय बोलतोयस तू?" तो हळू म्हणाला.

"अरे सर, काल रात्री तुम्हीच तर मेल केली ना पीडीएफ!" करण आता जरा गोंधळला. "रात्री बाराच्या सुमारास. कम्प्लीट मॅन्युस्क्रिप्ट. तुमच्याच आयडीवरून. नोटमध्ये लिहिलं होतं, 'ताबडतोब छापा, रिलीज करा, थांबू नका.' आम्ही काय, तुमची ऑर्डर म्हणून रात्रीच प्रिंटरला पाठवली, डिजिटल एडिशन लाईव्ह केलं... आणि सर..." करणचे डोळे चमकले. "सकाळपर्यंत हजारो डाउनलोड्स! प्रिंटच्या कॉपीज पण प्री-बुक झाल्यात दुकानांतून! ट्रेंड करतंय सगळीकडे! आपलं आत्तापर्यंतचं सगळ्यात मोठं लाँच, सर!"

सिद्धार्थ नुसता उभा होता. करणचे शब्द त्याच्या कानांवर आदळत होते, पण आत झिरपत नव्हते.

मेल. काल रात्री. बाराच्या सुमारास.

काल रात्री बाराच्या सुमारास तो कुठं होता? तो... तो त्या घरात होता. त्या टाईपरायटरसमोर. त्या अंधारात. निमिषसमोर.

"मी कुठलीच पीडीएफ पाठवली नाही," तो म्हणाला. आवाज स्वतःलाच परका वाटला.

करण हसला. त्याला वाटलं सिद्धार्थ मस्करी करतोय. "सर, काय बोलताय. तुमच्याच आयडीवरून आलीय मेल. मी स्वतः बघितली. अटॅचमेंट होतं, नोट होती, सगळं होतं."

"दाखव."

करणच्या चेहऱ्यावरचं हसू जरा कमी झालं. त्याला बॉसचा टोन आवडला नाही. पण त्यानं टॅबलेटवर मेल उघडली आणि सिद्धार्थसमोर धरली.

सिद्धार्थनं स्क्रीनकडे बघितलं.

खरंच होती. त्याचाच आयडी. काल रात्री, ११:५८. सब्जेक्ट लाईन: 'चक्रव्यूहातील चक्रव्यूह. फायनल. प्रिंट इमिडिएटली.' खाली अटॅचमेंट. आणि एका ओळीची नोट:

"थांबू नका. हे जगभर पोहोचलं पाहिजे."

सिद्धार्थची बोटं थंड पडली.

ती ओळ. तो शब्दरचनेचा ढंग. ते 'जगभर पोहोचलं पाहिजे.' हे त्यानं लिहिलं नव्हतं. पण ते त्याच्याच आयडीवरून आलं होतं. जेव्हा तो शेकडो किलोमीटर दूर, एका रेंज नसलेल्या जंगलात, फोन 'नो सर्व्हिस' दाखवत असताना, एका भुताटकीच्या घरात अडकला होता.

त्यानं काही पाठवलं नव्हतं. पण काहीतरी त्याच्या नावानं, त्याच्या यंत्रणेतून, बाहेर पडलं होतं. आणि आता ते हजारो लोकांच्या फोनमध्ये, हातांमध्ये, डोक्यांमध्ये शिरत होतं.

"सर? तुम्ही ठीक आहात ना?" करणचा आवाज आता काळजीचा झाला होता. "चेहरा एकदम पांढरा पडलाय तुमचा."

सिद्धार्थनं उत्तर दिलं नाही. त्याची नजर ऑफिसभर फिरली. कोपऱ्यात दोन-तीन जण एका फोनवर वाकून काहीतरी वाचत होते. तो मॅन्युस्क्रिप्ट. एक मुलगी हेडफोन लावून, स्क्रीनवर स्क्रोल करत, गुंगून गेली होती. त्यातच. आणि रिसेप्शनवरची ती मुलगी, जिनं त्याला अभिनंदन केलं होतं... तिच्या डेस्कवर उघडलेल्या लॅपटॉपवर तीच पानं होती.

त्याच्या स्वतःच्या ऑफिसात. त्याच्याच माणसांत. ते आधीच आत शिरलं होतं.

"किती?" त्यानं विचारलं. आवाज जेमतेम निघाला.

"सॉरी सर?"

"किती लोकांपर्यंत गेलंय हे? आत्तापर्यंत?"

करणला प्रश्नातली ती धार जाणवली नाही. तो अजून हवेतच तरंगत होता. त्यानं टॅबलेटवर बोटं फिरवली, आकडे उघडले, आणि एका दमात सांगायला लागला.

"सांगतो सर. ई-बुक... आत्ता या क्षणाला पन्नास हजारच्या वर डाउनलोड्स. नुसत्या रात्रभरात. आणि ग्राफ बघा सर..."

त्यानं स्क्रीन त्याच्याकडे वळवला, वर वर चढत जाणारी एक लाल रेषा. "थांबतच नाहीये. दर मिनिटाला नवीन डाउनलोड."

सिद्धार्थ काही बोलला नाही. करणला वाटलं बॉस इम्प्रेस्ड होऊन गप्प बसलाय. त्याचा उत्साह अजूनच चढला.

"आणि हार्ड कॉपीचं तर विचारूच नका सर. प्रिंट यायला अजून दोन दिवस आहेत, पण प्री-बुकिंग ओपन केलं, आणि..." तो हसला, स्वतःच्याच शब्दांवर विश्वास बसत नसल्यासारखा. "एक लाखाच्या वर, सर. एक लाख प्री-ऑर्डर्स. पुस्तक अजून छापूनसुद्धा झालं नाहीये! दुकानदारांचे फोन येतायत, स्टॉक कधी येणार म्हणून. डिस्ट्रिब्युटर मागं लागलेत, माल आधी आम्हाला द्या म्हणून."

"एक लाख," सिद्धार्थ पुटपुटला. करणला ते ऐकूच गेलं नाही.

"आणि सकाळी एका मोठ्या ऑडिओबुक प्लॅटफॉर्मचा कॉल आला होता सर. त्यांना याचं ऑडिओ व्हर्जन हवंय, अर्जंट. भारीपैकी डील ऑफर केलंय त्यांनी. मी म्हटलं सर आल्यावर फायनल करू." त्यानं श्वास घेतला. "आणि बाहेरून पण... दोन-तीन देशांतून ट्रान्सलेशनच्या इन्क्वायरीज आल्यात. इंग्लिश, हिंदी, अजून कुठल्यातरी भाषेत न्यायचंय त्यांना हे." करणनं मान हलवली, स्वतःच्याच आनंदावर विश्वास बसत नसल्यासारखी. "सर, खरं सांगू का? आपण असलं लाँच

कधीच बघितलं नाही. हे काहीतरी वेगळंच आहे. जणू सगळे फक्त वाटच बघत होते याची."

जणू सगळे फक्त वाटच बघत होते याची.

सिद्धार्थच्या पाठीतून एक थंड लहर सरकली. नेमके तेच शब्द. रानशेंदरीत, त्या ओठ कानापर्यंत ताणणाऱ्या माणसानं हेच म्हटलं होतं. तुमचीच वाट बघत होतो आम्ही.

ते आकडे त्याच्यासाठी आकडे नव्हतेच. पन्नास हजार. एक लाख. ती माणसं होती. एकेक जिवंत माणूस, जो याच क्षणी ते पहिलं पान उघडत होता, ती पहिली ओळ वाचत होता.

सिद्धार्थला अचानक रानशेंदरीतलं ते गाव आठवलं. ती रिकामी माणसं. लूपमध्ये अडकलेली. एकेकाळी तीही कुणीतरी होती. कुणीतरी जिवंत. आत आलेली, अडकलेली, पात्रं बनलेली.

आणि त्याला निमिषचे ते शेवटचे, अर्धवट राहिलेले शब्द आठवले. ते बुक... ते बुक कधीच, कुणालाही ...

वाक्य पूर्ण झालं नव्हतं. पण आता त्याला त्याचा अर्थ कळत होता.

"सर, हे तर चांगलंय ना?" करण विचारत होता, त्याच्या बॉसच्या पांढऱ्या पडलेल्या चेहऱ्याकडे बघत. "आपण वाट बघत होतो ना याचीच... मोठं लाँच... सर?"

सिद्धार्थनं हळूहळू टॅबलेट खाली केला. त्याची नजर खिडकीबाहेर गेली, पुण्याच्या त्या गजबजलेल्या, उन्हानं

भरलेल्या रस्त्यांकडे. जिथं हजारो लोक, याच क्षणी, त्यांच्या फोनवर, त्यांच्या घरांत, ते वाचत असतील.

त्यानं रानशेंदरी-चक्रव्यूह जाळून टाकलं होतं. रस्त्याच्या कडेला. स्वतःच्या हातानं.

पण ते कागदात नव्हतंच.

शेवट

"सर, एक कॉपी बघता का तुम्ही?" करण म्हणाला. "सकाळीच पहिली सॅम्पल प्रिंट बॅच आली आहे. तुमच्या टेबलावर ठेवलीय मी."

सिद्धार्थ करणकडे बघत राहिला. मग हळूहळू, पाय ओढत, तो स्वतःच्या केबिनकडे गेला.

टेबलावर ती पडली होती. एक छापील प्रत. 'चक्रव्यूहातील चक्रव्यूह.' मुखपृष्ठावर एक अंधारी वाट, आणि तिच्या टोकाला एक लाल कौलाचं घर. त्यानं ते कधीच डिझाइन केलं नव्हतं, मंजूर केलं नव्हतं. पण ते तिथं होतं, छापील, खरंखुरं, हातात धरता येण्याजोगं.

त्यानं दार लावलं. खुर्चीत बसला. आणि ते पुस्तक उचललं.

हातात ते जड वाटलं. नव्या कागदाचा, शाईचा वास. तोच... नाही. तो कुबट वास नव्हता. हा साधा, नवा वास होता. त्यानं एक मोठा श्वास घेतला. ठीक आहे. हे फक्त एक पुस्तक आहे.

निमिषनं लिहिलेलं. त्यात त्या गावाबद्दल असेल. त्या लूपबद्दल. कदाचित... कदाचित त्यात काहीतरी असेल जे त्याला कळेल, जे त्याला यातून बाहेर पडायचा मार्ग दाखवेल.

त्यानं शेवटचं प्रकरण उघडलं.

पहिल्या ओळी त्याला माहीत होत्या. ते गाव. तो टाईपरायटर. निमिष. ते सगळं तिथं होतं, शब्दाशब्दात, जसं त्यानं अनुभवलं होतं तसं. वाचताना त्याच्या अंगावर काटा येत होता, पण त्यात आता धक्का नव्हता. हे त्याला अपेक्षित होतं. निमिषनं हे सगळं आधीच लिहिलं होतं, हे त्याला रानशेंदरीतच कळलं होतं.

मग त्यानं पुढं वाचलं. आणि पान उलटलं.

'सिद्धार्थ त्या नव्या रस्त्यावर गाडी हाणत राहिला. मागं बघायची त्याची हिंमत होत नव्हती.'

त्याचं पळणं. ते इथं होतं.

'जंगल पातळ झालं. डांबरी रस्ता आला. त्याला वाटलं तो सुटला. एका पंपावर त्यानं गाडी थांबवली. तिथल्या पोराचे डोळे विचित्र होते, पण त्यानं दुर्लक्ष केलं.'

सिद्धार्थच्या हातातलं पुस्तक थरथरायला लागलं. पंपवाला. त्याचे डोळे. त्यानं ते कुणालाच सांगितलं नव्हतं. एका शब्दानंही नाही. पण ते इथं होतं, छापील.

त्यानं घाईघाईनं पानं उलटली.

'रस्त्याच्या कडेला त्यानं ती डायरी जाळली. जेरी कॅनमधलं पेट्रोल ओतलं. निळसर ज्वाळा उठल्या. त्याला वाटलं विज्ञान जिंकलं. त्याला वाटलं त्यानं हे संपवलं.'

त्याला वाटलं त्यानं हे संपवलं.

ती ओळ त्याच्या डोळ्यांसमोर तरंगत राहिली. ते वाक्य भूतकाळात होतं. जणू त्याचा तो विजय, ती सुटकेची भावना, ती आधीच घडून गेलेली, आधीच नोंदलेली, आधीच हसण्यावारी नेलेली एक छोटीशी गोष्ट होती.

त्यानं अजून पानं उलटली. वेगानं. श्वास जड होत चालला होता.

'दुसऱ्या दिवशी तो पुण्यात पोहोचला. ट्रॅफिकमध्ये अडकून त्याला आयुष्यात पहिल्यांदा बरं वाटलं. तो ऑफिसला गेला. समांतर पब्लिकेशन्सचं काचेचं दार त्यानं ढकललं.'

सिद्धार्थची नजर त्या ओळींवर खिळून राहिली.

हे... हे आज सकाळचं होतं. आत्ताचं. हे अजून... हे तर अजून काही तासांपूर्वीच घडलं होतं. त्यानं छापायला कधी दिलं? हे पुस्तक तर काल रात्री छापलं गेलं. मग आजची सकाळ त्यात कशी?

त्याच्या बोटांना घाम फुटला. पानावरची अक्षरं एकमेकांत मिसळायला लागली. पण तो थांबू शकत नव्हता. त्यानं पुढं वाचलं.

'करण धावत आला. त्यानं पुस्तकाच्या खपाचे आकडे सांगितले. एक लाख प्री-ऑर्डर्स. ऑडिओबुकचा प्रस्ताव. सिद्धार्थचा चेहरा पांढरा पडला. आणि त्या क्षणी त्याला रानशेंदरीतल्या त्या हसणाऱ्या माणसाचे शब्द आठवले.'

पुस्तक त्याच्या हातातून निसटता निसटता वाचलं.

हे आत्ता घडलं होतं. पाच मिनिटांपूर्वी. याच केबिनबाहेर. करण, आकडे, त्याचा पांढरा चेहरा... ती आठवण. हे सगळं, अगदी आत्ताचं, या पुस्तकात होतं. एक लाख प्रतींमध्ये. जगभर पसरलेल्या. हजारो लोकांच्या हातांत. ते सगळे हे वाचत होते. त्याची आजची सकाळ. त्याचा पांढरा चेहरा. त्याची ही धडधड.

सिद्धार्थनं मान वर केली. केबिनच्या काचेच्या भिंतीतून बाहेरचं ऑफिस दिसत होतं. त्यानं तिकडं बघितलं, आणि त्याच्या पोटात अजून एक खड्डा पडला.

बाहेर सगळे जण कामात होते, नेहमीसारखे. पण प्रत्येक स्क्रीनवर तीच पानं होती. प्रत्येक डेस्कवर. कुणी फोनवर, कुणी लॅपटॉपवर, कुणी टॅबवर. तेच पुस्तक. आणि सिद्धार्थ बघत असताना त्याच्या लक्षात आलं, त्या सगळ्यांच्या स्क्रोल करणाऱ्या बोटांची लय एकसारखी होती. एकाच वेळी खाली सरकणारी. जणू ते सगळे एकच ओळ, एकाच क्षणी वाचत होते.

त्यानं नजर हटवली. योगायोग. सगळे एकच ट्रेंडिंग बुक वाचतायत, बस्स. स्क्रोलिंग जुळलं तर त्यात काय एवढं. पण ही समजूत त्यालाच पटत नव्हती.

त्याची नजर परत पुस्तकाकडं गेली. आणि पुढची ओळ.

'बाहेर, काचेपलीकडं, करण त्याच्याकडंच बघत होता. हातात फोन. ओठांवर तेच हसू.'

सिद्धार्थनं झटक्यानं काचेकडं बघितलं.

करण तिथं उभा होता. काचेपलीकडं. त्याच्याकडंच बघत. हातात फोन. ओठांवर तेच हसू.

करणनं हात हलवला, सगळं ठीक आहे ना अशा खुणेनं, आणि परत आपल्या कामाला लागला. साधा करण. रोजचा करण. पण ते पानावर वाचण्याच्या आधी करण तसं करत होता, की त्यानं वाचलं म्हणून करण तसं करत होता... हे आता सिद्धार्थला सांगताच येत नव्हतं.

त्याला आता एका गोष्टीची भीती वाटायला लागली, आणि ती भीती त्याच्या हाडांपर्यंत पोहोचली. तो थरथरत्या हातानं पान उलटणार होता. पण त्याला माहीत होतं... त्याला आतून माहीत होतं... पुढच्या पानावर काय असेल.

त्यानं पान उलटलं.

'सिद्धार्थ त्याच्या केबिनमध्ये एकटा बसला होता. हातात ते छापील पुस्तक. तो शेवटचं प्रकरण वाचत होता. आणि वाचता

वाचता त्याच्या लक्षात येत होतं की तो जे जगतोय, तो प्रत्येक क्षण, या पानांवर आधीच छापलेला आहे.'

सिद्धार्थचा श्वास थांबला.

तो. इथं. आत्ता. या केबिनमध्ये. हे पुस्तक हातात धरून, हीच ओळ वाचत. ते इथं होतं. छापील. त्याच्या डोळ्यांसमोर.

त्यानं रानशेंदरी सोडली नव्हती. कारण रानशेंदरी एक जागा नव्हतीच. पुणं म्हणजे सुटका नव्हती. हे ऑफिस, ही खुर्ची, हा काचेचा दरवाजा, करण, ती रिसेप्शनवरची मुलगी, खिडकीबाहेरचं ते ऊन, ते सगळं... तेसुद्धा पुस्तकातच होतं. तेसुद्धा लिहिलेलं होतं. कल्पना आणि वास्तव यांच्यातली रेषा कुठंतरी विरघळून गेली होती, आणि त्याला ती विरघळताना कळलंही नव्हतं.

बाहेर पडायला जागाच नव्हती. कारण बाहेर असं काहीच नव्हतं. गाव, जंगल, हायवे, पुणं, त्याचं अख्खं आयुष्य... सगळं एकाच पुस्तकाची पानं होती. आणि तो त्यातलं एक पात्र, जे आत्ता, याच क्षणी, स्वतःबद्दलची ओळ वाचत होतं.

सिद्धार्थनं स्वतःचा हात बघितला. तो थरथरत होता. त्यानं तो मुद्दाम स्थिर करायचा प्रयत्न केला, मूठ वळवली, उघडली. हा हात हलला, कारण त्यानं तो हलवला. की... त्यानं तो हलवला, कारण कुणीतरी तसं आधीच लिहून ठेवलं होतं?

त्याला अचानक स्वतःच्या श्वासाची जाणीव झाली. आत. बाहेर. आत. बाहेर. हा श्वास त्याचा होता का? की हाही

कुठल्यातरी पानावर, कुठल्यातरी ओळीत आधीच ठरलेला होता? त्याचं हृदय धडधडत होतं, आणि त्या प्रत्येक ठोक्यामागं आता एक भयंकर शंका होती. हे शरीर माझं आहे का, की हेसुद्धा फक्त शाई आहे?

जे जे त्याला स्वतःचं वाटत होतं, त्याचे विचार, त्याची भीती, त्याचा हा थरकाप, ते सगळं जर कुणीतरी आधीच लिहून ठेवलेलं असेल, तर 'तो' नावाचं काही उरतच नव्हतं. फक्त पानावरची अक्षरं उरत होती, ज्यांना वाटत होतं की ती जिवंत आहेत.

त्यानं पुस्तक मिटलं. जोरात. जणू मिटलं की हे थांबेल.

त्याचे हात थरथरत होते. कपाळावर घाम. छाती धपापत होती. त्यानं डोळे घट्ट मिटले. हे खरं नाही. हे होऊ शकत नाही. एखादं पुस्तक माझा आत्ताचा क्षण कसा लिहू शकेल? हे अशक्य आहे. लॉजिकली अशक्य आहे.

त्यानं डोळे उघडले.

पुस्तक परत त्याच्या हातात उघडं होतं. त्यानं ते मिटलं होतं, पण ते उघडं होतं. आणि शेवटच्या पानावर, त्या शेवटच्या ओळीखाली, त्याच्या डोळ्यांसमोर, नवी अक्षरं उमटत होती. एकेक करून. कुणाच्याही हाताशिवाय.

'त्यानं पुस्तक मिटलं. त्याला वाटलं मिटलं की हे थांबेल. पण ते थांबलं नाही. त्यानं डोळे मिटले, उघडले. आणि बघितलं

की पुस्तक परत उघडं आहे, आणि त्याचा पुढचा श्वास, याच क्षणी, या पानावर लिहिला जातोय.'

केबिनच्या त्या बंद, थंड हवेत, सिद्धार्थला तो वास परत आला.

ओल्या मातीचा. सडलेल्या पानांचा.

रानशेंदरीचा वास. त्याच्या पुण्याच्या ऑफिसात.

वेडाची सुरुवात

किती वेळ तो तसाच बसून होता, त्याला कळलं नाही.

हातातलं पुस्तक त्यानं केव्हाच खाली ठेवलं होतं, टेबलावर, पालथं. पण त्याची नजर अजून त्याच्यावरच होती. जणू मान वळवली, नजर हटवली, तरी ते थांबणार नव्हतं. कारण आता ते फक्त त्या पुस्तकात नव्हतं. ते सगळीकडं होतं.

तो उठला. खुर्ची मागं सरकली. तो केबिनच्या काचेच्या भिंतीपाशी गेला आणि बाहेर बघितलं.

पुणं तिथं होतं. खिडकीच्या त्या मोठ्या काचेतून दिसणारं, उन्हानं भरलेलं, गजबजलेलं पुणं. खाली रस्त्यावर गाड्या सरकत होत्या. फूटपाथवर माणसं चालत होती. एक बाई हातात पिशव्या घेऊन रिक्षाला हात करत होती. एक पोरगं सायकलवरून भरधाव चाललं होतं. कोपऱ्यावर भेळेची गाडी. सगळं नेहमीसारखं. सगळं खरं.

पण आता त्याला माहीत होतं.

हे सगळं... ही बाई, हे पोरगं, ही भेळेची गाडी, हे ऊन... हे सगळं कुठल्यातरी पानावर लिहिलं गेलं होतं. कुणीतरी हे शब्दांत मांडलं होतं, आणि मग ते 'घडत' होतं. ती बाई रिक्षाला हात करत होती कारण तसं लिहिलं होतं. ते पोरगं पडणार होतं की नाही, ते आधीच ठरलं होतं, कुठल्यातरी ओळीत. आणि तो, सिद्धार्थ, इथं या काचेमागं उभा राहून हे बघत होता... कारण तेसुद्धा लिहिलं होतं.

त्याच्या मनात एक वेडसर विचार आला. जर हे सगळं लिहिलेलं असेल, तर कुठंतरी एक चूक असेल. कुठंतरी एक अशी गोष्ट असेल जी बसत नाही. एखादा क्षण जो अजून लिहिला गेला नाहीये. एखादी कड, एखादी फट, जिथून बाहेर पडता येईल.

त्यानं शोधायला सुरुवात केली.

त्यानं त्या रस्त्यावरच्या प्रत्येक गोष्टीकडं बारकाईनं बघितलं. ती बाई. ती रिक्षा. तो सिग्नल. काहीतरी चुकीचं शोधत. काहीतरी जे स्क्रिप्टमध्ये नसेल. पण सगळं... सगळं अगदी जुळत होतं. प्रत्येक गाडी थांबत होती जिथं थांबायला हवी होती. प्रत्येक माणूस वळत होतं जिथं वळायला हवं होतं. कुठंच चूक नव्हती. कुठंच फट नव्हती. कारण फट असूच शकत नव्हती. लेखक चुकत नाही.

त्याच्या कपाळावर घाम जमला.

ठीक आहे, त्यानं विचार केला. बाहेरचं जग सोडा. पण माझे विचार? हे जे मी आत्ता विचार करतोय, हे तर माझं आहे. हे कुणाला कसं कळेल? हे तर इथं, माझ्या डोक्यात आहे, फक्त माझ्या. हे कुणी लिहू शकत नाही.

आणि मग, त्याच्या डोक्यात, एक थंड आवाज उमटला. त्याचाच आवाज. पण त्यानं विचारलेला नसलेला.

हे वाक्यसुद्धा लिहिलेलं आहे.

सिद्धार्थ काचेपासून मागं सरकला.

नाही. हे... हे मी विचार केला. मीच. हा माझा विचार होता की हे लिहिलेलं आहे. हा... हा विचार माझा होता.

आणि हाही.

त्याच्या छातीत काहीतरी आवळलं.

तो स्वतःचेच विचार पकडायचा प्रयत्न करत होता. एखादा विचार, फक्त एक, जो खरंच त्याचा असेल, जो आधी कुठंतरी लिहिला गेला नसेल. तो विचार करायचा थांबवायचा प्रयत्न करत होता, मन रिकामं करायचा, जेणेकरून पुढचा विचार पूर्ण नवीन असेल, अनपेक्षित असेल, फक्त त्याचा असेल. पण ज्या क्षणी तो असा विचार करायचा, त्याच क्षणी त्याला जाणवायचं... की 'विचार थांबवायचा प्रयत्न करणारा सिद्धार्थ' हेसुद्धा कुणीतरी आधीच लिहून ठेवलं असेल. आणि मग 'ते लिहिलं असेल असा विचार करणारा सिद्धार्थ.' आणि मग त्याच्याबद्दल विचार करणारा. एक आरसा, दुसऱ्या आरशासमोर. खोल. खोल. अंतहीन.

तो आपल्याच मनात अडकला होता. आणि त्या मनातल्या प्रत्येक कोपऱ्यात, तो पोहोचायच्या आधीच, कुणीतरी जाऊन बसलं होतं.

त्यानं डोक्याला हात लावला. जोरात दाबलं, जणू त्या हातांनी तो त्याचे विचार आत कोंडून ठेवू शकेल, बाहेरच्या त्या नजरेपासून लपवू शकेल. "बस्स," तो स्वतःशीच पुटपुटला, मोठ्यानं. "बस्स. थांब. विचार करू नकोस."

पण ते बोलणंसुद्धा... तेसुद्धा त्याला जाणवलं... आधीच कुठंतरी छापलं गेलं असेल. एक लाख प्रतींमध्ये. हजारो लोक ते वाचत असतील, याच क्षणी. *'बस्स, तो स्वतःशीच पुटपुटला. थांब. विचार करू नकोस.'* आणि ते वाचून त्यांना कळत असेल की पुढं तो डोक्याला हात लावेल. आणि तो डोक्याला हात लावेल. आणि ते बरोबर निघेल.

त्याला आता धड श्वास घेता येईना.

केबिनचं दार उघडलं. सिद्धार्थ दचकला.

करण डोकावला. "सर..."

आणि सिद्धार्थला ते कळलं. करण पुढं काय म्हणणार, अगदी शब्दाशब्दात. ते त्याच्या डोक्यात आधीच उमटलं, करणच्या ओठांतून बाहेर पडायच्या आधी.

"दोन वाजताची मीटिंग कॅन्सल करायची का, हे विचारायला आलास," सिद्धार्थ म्हणाला, सपाट आवाजात. "आणि मी ठीक दिसत नाहीये, हेही सांगायला."

करण जागीच थबकला. त्याच्या चेहऱ्यावरचं हसू विरलं. "सर... हो... मी अगदी हेच... तुम्हाला कसं कळलं?"

"माहीत होतं." सिद्धार्थ हळू हसला. एक रिकामं, थकलेलं हसू. त्याला हे सगळं माहीत होतं. हा संवाद, करणचे हे शब्द, त्याच्या नजरेतली ही भीती... सगळं आधीच कुठंतरी छापलं गेलं होतं. तो फक्त ते मोठ्यानं वाचत होता.

करण क्षणभर नुसता बघत राहिला. मग हळूच मागं सरकला. त्याच्या नजरेत आता गोंधळ होता, थोडी भीतीही. "सर, तुम्ही... खरंच आराम करा. मी... मी नंतर येतो." आणि दार लावून तो निघून गेला, मागं एक-दोनदा वळून बघत.

सिद्धार्थ एकटाच उरला. परत.

"ठीक आहे," तो मोठ्यानं म्हणाला, रिकाम्या केबिनमध्ये, स्वतःशीच. आवाज थरथरत होता. "ठीक आहे. समजा हे सगळं लिहिलेलं आहे. समजा. पण मी आत्ता, याच क्षणी, काहीही करू शकतो. काहीही. बघ."

त्यानं टेबलावरची पेन उचलली आणि भिंतीवर भिरकावली. ती टणकन आदळली, खाली पडली.

"बघितलं?" तो जवळजवळ ओरडला, स्वतःलाच. "हे मी ठरवलं. हे कुठल्या पानावर नव्हतं. हे मी, माझ्या मर्जीनं केलं!"

आणि त्याच्याच डोक्यात, परत तोच थंड, शांत आवाज. त्याचाच. उत्तर देणारा.

सिद्धार्थनं पेन उचलून भिंतीवर भिरकावली. 'हे मी माझ्या मर्जीनं केलं,' तो ओरडला. त्याला वाटलं त्यानं काहीतरी सिद्ध केलं.

सिद्धार्थ त्या पडलेल्या पेनकडं बघत राहिला. त्याचे ओठ थरथरत होते.

"नाही," तो कुजबुजला. "नाही. नाही. नाही."

'नाही,' तो कुजबुजला. 'नाही. नाही. नाही.'

प्रत्येक 'नाही'च्या मागोमाग, त्याच्या डोक्यात तेच 'नाही' छापलेलं उमटत होतं. तो जे बोलेल ते आधीच तिथं होतं. तो ओरडला तरी, गप्प बसला तरी, रडला तरी... कुठलाही आवाज, कुठलंही पाऊल, त्या पानावरून पुढं जाऊ शकत नव्हतं.

जे काही 'सिद्धार्थ' होतं... त्याची बुद्धी, त्याचं लॉजिक, त्याचा तो तर्कशुद्ध मेंदू ज्याच्या जोरावर त्यानं शून्यातून समांतर उभं केलं होतं, ज्याच्यावर त्याचा सगळ्यात जास्त विश्वास होता... तेच आता त्याच्या विरुद्ध वळलं होतं. कारण त्या बुद्धीनं त्याला हे दाखवून दिलं होतं की ती बुद्धी त्याची नाहीच. प्रत्येक तर्क, प्रत्येक प्रश्न, प्रत्येक 'हे कसं शक्य आहे'... सगळं आधीच पानावर होतं. विचार करणं हेच त्याचं हत्यार होतं, आणि आता तेच हत्यार त्याला कापत होतं.

जो माणूस आयुष्यभर म्हणत आला होता, भूत-बित्त काही नसतं, सगळ्याला कारण असतं, सगळं समजून घेता येतं... तो आता एका अशा गोष्टीसमोर उभा होता, जी त्यानं समजून

घेतली, आणि समजून घेतल्यानंच ती त्याला संपवत होती. कारण इथं समजून घेणं म्हणजे सुटका नव्हती. इथं समजून घेणं म्हणजे आणखी खोल बुडणं.

केबिनच्या काचेत त्याला त्याचं स्वतःचं अंधुक प्रतिबिंब दिसलं. पांढरा पडलेला चेहरा, विस्कटलेले केस, भेदरलेले डोळे. त्यानं त्या प्रतिबिंबाकडं बघितलं, आणि त्याला एका गोष्टीची खात्री वाटली नाही.

तो त्या प्रतिबिंबाकडं बघत होता. की ते प्रतिबिंब त्याच्याकडं?

कोण खरं होतं? काचेमागचा सिद्धार्थ, की पानावरचा?

त्यानं तोंड उघडलं, काहीतरी बोलायला, स्वतःला धीर द्यायला, 'मी खरा आहे, मी जिवंत आहे' म्हणायला.

पण शब्द बाहेर पडायच्या आधी, त्याला कुठंतरी, खोल आत, ती पुढची ओळ वाचता आली.

संसर्ग

बाहेर एक हॉर्न वाजला. लांबलचक. आणि मग थांबला, अर्ध्यावरच कापल्यासारखा.

सिद्धार्थ हळूहळू काचेच्या भिंतीपाशी परत गेला. खाली, पुण्याच्या रस्त्यांकडं बघितलं.

पहिल्यांदा सगळं नेहमीसारखं वाटलं. ऊन, गाड्या, माणसं, इमारती. ते अख्खं विस्तीर्ण शहर, काचेच्या त्या मोठ्या तुकड्यातून दिसणारं. पण काहीतरी बदललं होतं. हवेत एक प्रकारची स्तब्धता होती. शहर श्वास घ्यायचं थांबलं होतं.

मग त्याची नजर खाली, मुख्य रस्त्याकडं गेली.

ट्रॅफिक थांबलं होतं. सिग्नल हिरवा होता, पण एकही गाडी हलत नव्हती. आणि गाड्यांमधली माणसं... ती गाडी चालवत नव्हती. ती खाली बघत होती. प्रत्येक जण. स्टीअरिंगवर, मांडीवर, हातात, फोन धरून. कुणी टॅब. प्रत्येक स्क्रीनवर त्याच ओळी.

त्याची नजर अजून संकुचित झाली. फूटपाथकडं.

तिथं माणसं उभी होती, जिथल्या तिथं. चालता चालता थांबलेली. एका हातात पिशवी, दुसऱ्या हातात फोन. एक रिक्षावाला, त्याच्या रिक्षाशेजारी, मीटरकडं नाही, फोनच्या स्क्रीनकडं बघत. ती भेळवाली. तिची गाडी तशीच, आणि ती तिच्या फोनमध्ये बुडालेली. कुणीच बोलत नव्हतं. कुणीच हलत नव्हतं. अख्खी गल्ली, एकाच मजकुरावर खिळलेली.

सिद्धार्थच्या पोटात गोळा आला. त्यानं नजर अजून जवळ आणली. रस्त्याच्या पलीकडच्या एका माणसावर.

तो माणूस वाचत होता. हळूहळू त्याचं डोकं वर आलं. आणि त्यानं सरळ सिद्धार्थकडं बघितलं, त्या उंच इमारतीच्या

काचेकडं, इतक्या दुरून, अचूक. त्याचे डोळे पांढरे होते. बुबुळं नाहीत. नुसते पांढरे गोळे.

सिद्धार्थ काचेपासून झटक्यानं मागं सरकला.

नाही. नाही. हे इथं नाही. हे पुण्यात नाही. हे त्या गावात होतं. ते तिथंच राहायला हवं होतं.

त्याच्या मागं, केबिनच्या काचेच्या दुसऱ्या बाजूला, ऑफिसमध्ये, एक आवाज आला.

"सर?"

सिद्धार्थ गर्रकन वळला.

काचेपलीकडं करण उभा होता. तोच करण. हातात तोच फोन. पण त्याचा चेहरा आता वेगळा होता. सपाट. कोरा. आणि त्याचे डोळे...

"नाही," सिद्धार्थ कुजबुजला. "करण, नको. तू नको."

करणनं काचेचं दार उघडलं आणि तो आत आला. हळू, यांत्रिक पावलांनी. त्याच्या मागं, अख्खं ऑफिस दिसत होतं. आणि तिथली प्रत्येक व्यक्ती, आपापल्या जागी, आपापल्या फोन-स्क्रीनकडं बघत, थिजलेली. ती रिसेप्शनवरची मुलगी, जिनं सकाळी हसून त्याचं अभिनंदन केलं होतं, ती तिच्या डेस्कवर बसली होती, ताठ, आणि तिचे डोळे पांढरे होते.

सिद्धार्थची नजर त्या ऑफिसभर भिरभिरली, एकेका ओळखीच्या चेहऱ्यावर. मीना, अकाउंट्सची. वीस वर्षं कंपनीत. तिच्या मुलीच्या लग्नाला तो गेला होता. ती आता खुर्चीत ताठ

बसली होती, हातात फोन, स्क्रीनवर तीच पानं, आणि तिचा चेहरा हळूहळू कोरा होत चालला होता, जणू कुणीतरी रबरानं तिचे भाव एकेक करून पुसत होतं. पलीकडं देशपांडे, जुना प्रूफरीडर, चष्म्याआडचे त्याचे डोळे आत्ता आत्तापर्यंत जिवंत होते... आणि सिद्धार्थ बघत असतानाच ते फिरले, वर गेले, पांढरे झाले. एका माणसाचं पात्र बनताना त्यानं प्रत्यक्ष बघितलं. काही सेकंदांचा खेळ. आधी माणूस. मग पान.

"सर," करण परत म्हणाला. पण आता तो करणचा आवाज नव्हता.

तो निमिषचा आवाज होता. तोच, रेडिओतून आलेला, पारावरून आलेला, अथांग आवाज. करणच्या तोंडातून.

"तुम्हाला कळलं ना आता, सर," करण म्हणाला, त्या आवाजात. "बाहेर असं काहीच नाही. कधीच नव्हतं."

सिद्धार्थची पाठ टेबलाला लागली. त्याला अजून मागं जायला जागा नव्हती.

"हे तू नाहीस," तो थरथरत्या आवाजात म्हणाला. "करण, ऐक माझं. लढ याच्याशी. तू अजून आत आहेस, मला माहीत आहे..."

पण करणच्या चेहऱ्यावर काहीच उमटलं नाही. ती तडफड नाही, जी निमिषच्या डोळ्यांत क्षणभर दिसली होती. करण आधीच पूर्ण बुडाला होता. त्याच्यात आता कुणीच उरलं नव्हतं. फक्त ती गोष्ट, त्याच्या जागी बोलणारी.

"लढायचं कुणाशी, सर?" करण... ते... हसलं. "तुम्ही माझ्याशी बोलताय. मी तुमच्याशी. हे सगळं याच पानावर लिहिलंय. तुमचं हे 'लढ' म्हणणं. माझं हे उत्तर. सगळं. आपण फक्त ते वाचतोय."

आणि मग, ऑफिसमधली ती सगळी थिजलेली माणसं, एकाच वेळी, आपापल्या जागी वळली. सगळ्यांचे चेहरे सिद्धार्थकडं. सगळ्यांचे डोळे पांढरे. आणि सगळी एकसुरात, एका आवाजात, निमिषच्या आवाजात बोलली.

"तूही, सिद्धार्थ. आता तुझी पाळी."

सिद्धार्थ तिथंच, टेबलाला टेकून, खाली घसरत बसला. कानांवर हात ठेवले. डोळे मिटले.

त्याला रानशेंदरीतलं ते गाव दिसलं. ती धुणं धुणारी बाई. तो लूपमधला म्हातारा. तो तुटक्या कपातून घोट घेणारा मुलगा. एकेकाळी तीही अशीच जिवंत माणसं होती. कुणीतरी. कुठंतरी. त्यांनीही असंच काहीतरी वाचलं असेल, कुठल्यातरी पानावर स्वतःला सापडलं असेल, आणि मग हळूहळू ते पान बनून गेले असतील.

करण. ती मुलगी. ऑफिसातली सगळी. आणि बाहेर, ते अख्खं शहर. एकेक करून पात्रं बनत होते. आणि तो हे सगळं बघत होता, कारण त्याची पाळी सगळ्यात शेवटची होती. त्याला शेवटपर्यंत जागं ठेवलं होतं, हे सगळं बघण्यासाठी.

आणि हेसुद्धा, त्याला माहीत होतं, याच पानावर लिहिलेलं होतं. त्याचं हे खाली घसरणं. त्याचे कानांवरचे हात. त्याची ही शेवटची, असहाय जाणीव.

तो सगळ्यात शेवटचं पात्र होतं, जे अजून वाचू शकत होतं.

शेवटचं वाक्य

तो आवाज थांबला.

सिद्धार्थनं हळूहळू कानांवरचे हात काढले. डोळे उघडले.

ऑफिस तसंच होतं. पण आता त्यात आवाज नव्हता. कीबोर्ड नाही, फोन नाही, माणसांची कुजबुज नाही. काहीच नाही. एक जड, बधिर शांतता, जी त्या एकसुरातल्या आवाजापेक्षाही भयंकर होती.

आणि ती सगळी माणसं अजून तिथंच होती. करण. मीना. देशपांडे. ती रिसेप्शनवरची मुलगी. सगळी. पण ती हलत नव्हती. कुणी अर्ध्या उठलेल्या अवस्थेत, कुणी खुर्चीत ताठ, कुणी हातात फोन धरलेला. जिथल्या तिथं थिजलेली. मेणाच्या पुतळ्यांसारखी. आणि त्या सगळ्यांचे ते पांढरे डोळे... सगळे त्याच्याकडंच रोखलेले. नुसते बघत. वाट बघत.

जे ऑफिस काही मिनिटांपूर्वी जिवंत होतं, हसत-बोलत होतं, ते आता एक थांबलेलं चित्र होतं. एका पानावर छापलेलं.

आणि त्या चित्रात फक्त एकच गोष्ट अजून हलत होती. श्वास घेत होती. तो.

सिद्धार्थ हळूहळू उभा राहिला. पाय लटपटत होते. त्यानं त्या पांढऱ्या डोळ्यांकडं बघितलं, एकेकाकडं. ती त्याच्याकडंच बघत होती. त्याचीच वाट बघत. कारण आता फक्त तोच उरला होता. शेवटचा.

कुणाशी लढायचं? सगळे तर आधीच गेले होते. कुठं पळायचं? बाहेर तेच होतं, अख्खं शहर, असंच थिजलेलं, असंच पांढऱ्या डोळ्यांचं. कुणाला वाचवायचं? वाचवण्यासारखं आता कुणीच उरलं नव्हतं.

त्याच्या आत जे काही अजून लढत होतं, धडपडत होतं, ते हळूहळू विझत गेलं. भीतीची जागा एका भयाण सुन्नतेनं घेतली. आणि त्या सुन्नतेतून, हळूहळू, एक विचित्र शांतता वर आली.

तो आपल्या खुर्चीपाशी आला आणि बसला. ती पांढऱ्या डोळ्यांची माणसं त्याच्याभोवती, त्याच्याकडंच बघत, स्तब्ध उभी. टेबलावर ते पुस्तक तसंच उघडं होतं. तीच एकमेव सॅम्पल प्रत, जी सकाळी प्रिंटरकडून त्याच्या टेबलावर आली होती. 'चक्रव्यूहातील चक्रव्यूह.' शेवटचं प्रकरण. शेवटचं पान.

आता त्याच्यात लढायचं त्राण उरलं नव्हतं. पळायचं कुठं, हेच नव्हतं. समजून घ्यायचं... ते त्यानं केव्हाच करून झालं होतं, आणि त्यानंच त्याला इथवर आणलं होतं. आता फक्त एकच गोष्ट उरली होती. वाचणं.

त्यानं पानावर नजर टाकली. आणि वाचलं.

'सिद्धार्थनं लढायचं सोडून दिलं. त्याला कळलं की लढणं, पळणं, समजून घेणं, हे सगळं याच गोष्टीचा भाग होतं. आणि आता, शेवटी, त्याला एक विचित्र शांतता वाटली. एखाद्या माणसाला खूप दमल्यावर, झोप लागायच्या आधी वाटते तशी.'

आणि त्याला खरंच तशी शांतता वाटली.

हे विचित्र होतं. इतक्या दहशतीनंतर, इतक्या धडपडीनंतर, आता काहीच उरलं नाही म्हणून, एक प्रकारची मोकळीक होती. ठरवायचं नाही. लढायचं नाही. फक्त... लिहिलं जायचं. निमिषनं रेडिओतून हेच म्हटलं होतं ना. *आत येणं वाईट नाही, सिड. इथं काही ठरवायचं नाही, काही गमवायचं नाही.*

त्यानं पुढची ओळ वाचली.

'त्यानं ठरवलं, आता आपणही लिहायचं.'

सिद्धार्थची नजर त्या ओळीवर थबकली.

लिहायचं?

त्यानं आजूबाजूला बघितलं. टेबलावर, ती पडलेली पेन. जी त्यानं मगाशी भिंतीवर भिरकावली होती. ती आता परत टेबलावर होती. त्याच्या हाताशेजारी. जणू तिथंच ठेवली होती, त्याच्यासाठी.

त्याला आता कळायला लागलं होतं.

निमिषनं हेच केलं होतं. निमिषही असाच, कुठंतरी, एका पानावर अडकला होता. आणि मग तो स्वतःच लिहायला

लागला होता. ही कादंबरी. हे गाव. आणि या कादंबरीनं सिद्धार्थला आत ओढलं होतं. निमिष पात्रातून लेखक बनला होता. आणि आता...

आता त्याची पाळी होती.

तो या गोष्टीतून सुटणार नव्हता. कारण सुटका नव्हतीच. पण तो या गोष्टीचा पुढचा लेखक बनू शकत होता. पुढची ओळ लिहिणारा. पुढच्या कुणासाठीतरी हाच चक्रव्यूह उघडणारा.

त्यानं पेन उचलली.

हात आता थरथरत नव्हता. तीच विचित्र शांतता. त्यानं पेन त्या शेवटच्या पानावर टेकवली, त्या शेवटच्या ओळीखाली, जिथं अजून थोडी कोरी जागा होती.

आणि त्याच क्षणी त्याला जाणवलं... तो जे लिहिणार होता, ते वाचणारं कुणीतरी असेल. कुठंतरी. कुणीतरी हे पुस्तक हातात धरून, किंवा एखाद्या स्क्रीनवर, याच ओळी वाचत असेल. त्याच्यासारखंच. तर्कशुद्ध. खात्री असलेलं की हे फक्त एक गोष्ट आहे, खरं काहीच नाही.

त्या कुणाचा विचार करून सिद्धार्थला हसू आलं.

कारण त्याला आता ती गंमत कळली होती. ज्या क्षणी तू ही ओळ वाचतोयस, त्या क्षणी तू आत आला आहेस. ज्या क्षणी तुला वाटतंय की ही फक्त एक गोष्ट आहे, नेमक्या त्याच क्षणी तू सगळ्यात खोल अडकला आहेस. तो स्वतःही असाच हसला

असता. एका ओळीकडं बघून. हे शक्य नाही, हे फक्त शब्द आहेत, म्हणत.

त्यानं ते हसू दाबायचा प्रयत्न केला, आणि तरी तो हसला.

आणि त्या क्षणी, त्याच्या हातातली पेन हलली.

त्यानं ती हलवली नव्हती. ती आपोआप हलत होती. आणि त्या कोऱ्या जागेवर, त्याच्याच हस्ताक्षरात, एक नवी ओळ उमटत होती. ती तो लिहीत नव्हता. तो फक्त ती बघत होता, उमटताना, स्वतःच्याच हातून.

'त्यानं ते हसू दाबायचा प्रयत्न केला, आणि तरी तो हसला.'

सिद्धार्थ देसाई शेवटचं हसला.

आणि त्याच्या हातातल्या पेननं पुढची ओळ लिहायला सुरुवात केली. तीच ओळ, जी आत्ता, याच क्षणी, तू वाचतो आहेस.

--(समाप्त)—
की
--(सुरुवात)--

काही जबरदस्त नाट्यपूर्ण वाचायचे आहे? खिळवून ठेवणारे? शब्द शब्द थरकाप उडवणारे.

अ त ळ (ज्याचा तळ शोधणे अशक्य असे काही)

लेखक **सत्यजित पाटील**. एकदम तरूण भाषा, विज्ञानाचे जाणकार. ही भयविज्ञानकथा आहे की विज्ञानभयकथा हे तुम्ही ठरवा.

सत्यजित शंकरराव पाटील लिखित 'अतळ' ही कादंबरी एका अथांग, गडद रहस्यावर आधारलेली कॉस्मिक हॉरर (वैश्विक भय) कथा आहे.

मुख्य नायक निलय, एक आधुनिक स्ट्रक्चरल इंजिनिअर, १३ वर्षांनंतर आपल्या निवाळी गावी मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या प्रोजेक्टसाठी परत येतो. त्याचे वडील प्रकाश गुरुजी दररोज न चुकता मंदिरातील देवतेवर अभिषेक करत असतात. मंदिराच्या गाभाऱ्याखाली एक प्राचीन बारव आणि ती झाकणारी अवाढव्य काळी शीळा असते. या शीळेवर पडणाऱ्या पाण्याच्या कंपनांमुळे (Resonance) खाली साचलेले अथांग पाणी सतत हलते राहून त्यातील अनाम ताकद शांत झोपलेली असते.

परंतु, निलय विज्ञानाच्या अहंकारापोटी ती शीळा बाजूला सरकवतो आणि अभिषेकाचे ते तंत्र खंडित करतो. पाणी स्थिर होऊन एखाद्या अथांग आरशासारखे बनते. त्या स्थिर पाण्यात स्वतःचे प्रतिबिंब पाहणारे रघू, प्रथमेश यांसारखे लोक आपली

मानवी चेतना गमावून बसतात. या भयानक संकटातून गावाला कसे वाचवले जाते ते समजेपर्यंत आपण पुस्तक हातातून खाली ठेवू शकणार नाही.

रत्नाकर मतकरी यांच्या गूढ आणि भयनाट्यमयी शैलीच्या धर्तीवर या कादंबरीचे भाषासौंदर्य आकारास येते. लेखकाने आदिम भीती, अथांग अंधार आणि मानवी मनातील अस्वस्थता यांचे अत्यंत गडद व वातावरणीय वर्णन (Atmospheric tone) केले आहे. बुद्धीवाद व तंत्रज्ञान विरुद्ध प्राचीन परंपरा यांतील संघर्ष आणि अनाम ताकदींसमोर मानवी मर्यादा लेखकाने प्रभावीपणे मांडल्या आहेत. दगडी खोलीतील कुबट वास, पाण्याचा प्रतिध्वनी आणि आरशातील अनैसर्गिक हास्य या दृश्यात्मक प्रतिमांमुळे वाचकाच्या मनात थरकाप उडतो. वऱ्हाडी बोलीचा सहज स्पर्श आणि तांत्रिक संज्ञांची नाट्यमय गुंफण लेखकाच्या भाषाशैलीला एक विलक्षण सौंदर्य, उत्कंठा आणि गूढता प्रदान करते.

कादंबरीचे मुख्य सौंदर्यमूल्य म्हणजे अंधश्रद्धा आणि अध्यात्माचे भौतिकशास्त्र, ध्वनिशाशास्त्र (Acoustics) आणि तरंग-प्रतीकांमध्ये केलेले तार्किक रूपांतर होय. जयंत नारळीकर शैलीनुसार यात अंध भीतीऐवजी तर्कशुद्ध कारणमीमांसा, प्रयोगशीलता आणि शास्त्रीय विश्लेषणाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. घटनांमागील कार्यकारणभाव

(Causality) शोधणे, सुलभ संवाद आणि विज्ञानाची उत्कंठावर्धक मांडणी यांमुळे ही कादंबरी मराठी विज्ञानकथा विश्वात एक वस्तुनिष्ठ साहित्यकृती ठरते. यात कल्पनाविलास आणि वैज्ञानिक तत्त्वे यांचा सुंदर समतोल साधला आहे.

नक्की वाचा आणि आपला अभिप्राय लेखकांना कळवा.

क्लिक कताच उघडेल.